## लोकशाहीचा अर्थ समजून घेण्याची दिशा
सुहास पळशीकर

## न्यायालयाचा अवमान नावाचे पुरातन गूढ
प्रतापसिंह साळुंके

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१६ जानेवारी २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

## सूरज येंगडे यांच्या दीर्घ मुलाखतीचा पहिला भाग



## बराक ओबामा यांच्या दीर्घ मुलाखतीचा पहिला भाग




MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
जर साथ असेल MS-CIT ची, तर खात्री उज्ज्वल भविष्याची !
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT करा आणि जॉब रेडी व्हा !
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१६ जानेवारी २०२१
वर्ष ७३ / अंक - ३०
संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ **कुमार केतकर ७५ वर्षांचे झाले**
...संपादकीय

७ **'अ प्रॉमिस्ड लॅन्ड' या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद**
...बराक ओबामा

१४ **दलितांचे दुःख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत**
...सूरज येंगडे

२१ **लोकशाहीचा अर्थ समजून घेण्याच्या दिशा**
...सुहास पळशीकर

२७ **न्यायालयाचा अवमान नावाचे पुरातन गूढ**
...प्रतापसिंह साळुंके

३४ **अंनिसपूर्वीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर**
...प. रा. आर्डे

४१ **प्रतिसाद**
...अरुण वि. कुकडे, प्रभा पुरोहित,
...लखनसिंग कटरे

संपादकीय

# कुमार केतकर ७५ वर्षांचे झाले

मागील ५० वर्षे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात पत्रकार-संपादक या नात्याने कार्यरत असलेले कुमार केतकर कालच्या ७ जानेवारीला ७५ वर्षांचे झाले आहेत. वयाचा अमृतमहोत्सव आणि पत्रकारितेतील कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव असा हा योग म्हणता येईल. सेवाज्येष्ठता आणि कार्यश्रेष्ठता या दोन्ही निकषांवर, आज हयात असलेल्या महाराष्ट्रातील पत्रकार-संपादकांमध्ये केतकरांचेच नाव अव्वल नंबरवर घ्यावे लागते. सुरुवातीच्या काळातील दोन दशके इंग्रजी पत्रकारितेत, प्रामुख्याने 'द टाइम्स ऑफ इंडिया' व 'इकॉनॉमिक टाइम्स' या वृत्तपत्रांमध्ये ते कार्यरत राहिले. वयाची पन्नाशी जवळ आली तेव्हा ते महाराष्ट्र टाइम्सचे संपादक झाले, तिथे सहा वर्षे राहिले. त्यानंतर एक वर्ष लोकमतचे संपादक आणि मग आठ वर्षे लोकसत्ताचे संपादक. त्यानंतरची चार-पाच वर्षे दिव्य मराठीचे संपादक. म्हणजे मराठी पत्रकारितेतील त्यांची कारकीर्द दोन दशकांची राहिली. मागील दोन-अडीच वर्षे ते काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार म्हणून कार्यरत आहेत. आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात डाव्या पक्ष-संघटनांमध्ये सक्रीय होते. ग्रंथाली या वाचनसंस्कृतीच्या चळवळीतही त्यांचा सहभाग राहिला. मात्र त्यांची ओळख पत्रकार-संपादक आणि वक्ते-भाष्यकार अशीच राहिली. 'विचारवंत' हा शब्दप्रयोग गांभीर्याने वापरायचा ठरवला तर तो केतकरांना लावता येईल. कारण ज्याच्याकडे काही एक निश्चित व निर्णयात्मक असा दृष्टिकोन आहे आणि त्या दृष्टिकोनातून केलेल्या मांडणीचे काहीएक प्रभावक्षेत्र निर्माण झाले आहे, त्या व्यक्तीला 'विचारवंत' ही संज्ञा वापरता येते आणि म्हणून केतकरांना ती संज्ञा बहाल करता येईल.

पत्रकार आणि त्यातही मोठ्या दैनिकाचा संपादक म्हटले की 'जॅक ऑफ ऑल ॲन्ड मास्टर ऑफ नन्' हे गृहीत धरलेले असते. पण त्यातील फार थोडे संपादक असे असतात की, त्यांना 'मास्टर ऑफ नन्' असे म्हणता येणे अवघड होऊन जाते, कुमार केतकर हे अशा फार थोड्यांपैकी आहेत. राजकारण, समाजकारण, साहित्य, संस्कृती, अर्थकारण, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती या सर्व प्रमुख क्षेत्रांत वाचक-श्रोत्यांना मुशाफिरी घडवून आणण्याइतकी ताकद त्यांनी कमावलेली आहे. त्यामुळे त्यांचा संचार अनेकविध क्षेत्रांतील व्यक्ती, संस्था, संघटना यांच्यामध्ये राहिला आहे. त्यांच्या अग्रलेखांची व लेखांची डझनभर मराठी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. 'बदलते विश्व' आणि 'त्रिकालवेध' या पुस्तकांत त्यांचा गाभा व आवाका दिसतो. त्यांनी उत्साह दाखविलेला नाही, (किंबहुना उत्साह दाखवणाऱ्यांना होकार दिलेला नाही), अन्यथा त्यांची आणखी डझनभर तरी पुस्तके प्रकाशित झाली असती. लोकसत्ता व महाराष्ट्र टाइम्समधील त्यांचे लेख व अग्रलेख इतक्या विपुल प्रमाणात असंग्रहित आहेत की, विशिष्ट थिम्स घेऊन ते संग्रहित करायचे ठरवले तर दहा-बारा पुस्तके सहज आकाराला येतील. अर्थातच, उत्तम दर्जाचे, वाचनीय व आजही कालसुसंगत असे लेखन निवडले तरी! याशिवाय, त्यांनी विविध व्यासपीठांवरून केलेल्या भाषणांची संख्या काही हजारांमध्ये भरेल. दूरचित्रवाणीवरील चर्चा, मुलाखती, संवाद यांचा हिशोब वेगळा करावा लागेल.

इतके सर्वव्यापी असलेल्या केतकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे, विचारांचे व कार्याचे काही कवडसे पकडायचे ठरले तरी अनेकजण अचंबित होतात. ज्यांच्या प्रत्येक लहान-मोठ्या भाषणात व लेखनात 'काल-आज-उद्या' यांचा संगम असतोच असतो, अशा दुर्मिळ लोकांमध्ये त्यांचा समावेश करावा लागतो. शिवाय, बहुविद्याशाखीय अभ्यास करण्याच्या प्रक्रियेचा पुढचा टप्पा म्हणून प्रत्येक प्रश्नाचा/समस्येचा विचार स्थानीय, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यांमध्ये करण्याची सवय क्वचित काही लोकांना असते, त्यातही केतकरांचा समावेश करावा लागतो. या सर्वांच्या जोडीला सतत कार्यक्षम व कार्यमग्न राहणे आणि तेही उत्साहाने, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रधान वैशिष्ट्य राहिले आहे. अशी कार्यमग्नता ठेवूनही त्यांच्या वर्तन-व्यवहारात उमदेपणा कायम कसा राहतो, याचे अनेकांना आश्चर्य वाटते.

केतकरांच्या चाळीस वर्षांच्या पत्रकार-संपादक कारकिर्दीमध्ये सर्वोच्च कालखंड म्हणून ते महाराष्ट्र टाइम्स व लोकसत्ता या दैनिकांमध्ये संपादक होते, त्याचाच उल्लेख करावा लागेल. १९९५ ते २०१० हाच तो दीड दशकांचा कालखंड. दोन मोठ्या वृत्तसमूहांची ही दोन मोठी व प्रभावशाली दैनिके असल्याने त्या दैनिकांच्या मुख्य संपादकांची ताकद खूपच जास्त परिणाम करत असते. अन्य सर्व क्षेत्रांत तर ती परिणाम करीत असतेच, पण राजकारणातही खूप चांगल्या प्रकारे हस्तक्षेप करीत असते. अर्थातच त्या संपादकाकडे तेवढे नैतिक बळ असावे लागते, बौद्धिक आवाका प्रचंड असावा लागतो, नि:स्पृह वृत्ती भिनलेली असावी लागते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोणतीही किंमत चुकविण्याची तयारी ठेवणारा निर्भयपणा असावा लागतो. इतके सारे अजब रसायन संपादकांच्या व्यक्तिमत्त्वात भिनलेले नसेल तर, कितीही मोठे व प्रभावशाली दैनिक असूनही काही उपयोग होत नाही. आणि म्हणूनच मागील चार-पाच दशकांचा विचार केला तर केतकरांच्या आधी माधवराव गडकरी व गोविंदराव तळवलकर, केतकरांचे समकालीन अरुण टिकेकर आणि केतकरांच्या नंतरचे गिरीश कुबेर इतकीच नावे ठळकपणे पुढे येतात. वरील निकषांवर अन्य लहान वा प्रादेशिक दैनिकांचा विचार केला तर 'मराठवाडा'चे अनंतराव भालेराव आणि 'महानगर'चे निखिल वागळे व आणखी दोन-चार नावे निघतील.

१९९१ नंतरच्या दीड दशकाला मराठी पत्रकारितेतील 'टिकेकर-केतकर पर्व' असे म्हणता येईल. १९ व्या शतकाच्या अखेरच्या पाव शतकातील दीड दशक (१८८१-१८९५) मराठी पत्रकारितेतील टिळक-आगरकर पर्व म्हणून ओळखले जाते; त्या पर्वाचा प्रभाव त्यानंतर काही दशके तरी मोठ्या प्रमाणात राहिला. त्या पर्वाशी टिकेकर-केतकर पर्वाची तुलना करण्याचा हेतू इथे नाही. मात्र हे अधोरेखित केले पाहिजे की, टिकेकर हे आगरकर स्कूलचे तर केतकर हे टिळक स्कूलचे म्हणता येतील. अर्थातच दोन्ही स्कूलचे म्हणून विशेष असे महत्त्व आहेच. ज्याच्या व्यक्तिमत्त्वाला जे योग्य ठरेल ते त्याने केले/करावे एवढे शहाणपण अंगी बाणवले असेल तर, त्या दोहोंमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवण्याचा किंवा एकाने दुसऱ्याला तुच्छ लेखण्याचा किंवा वाळीत टाकण्याचा वेडेपणा उद्भवत नाही.

तर मुद्दा असा की, या दीड दशकात टिकेकर व केतकर ज्या सातत्याने अग्रलेख व लेख लिहीत होते आणि आपापल्या वृत्तपत्रांतून जे आशय-विषय चव्हाट्यावर आणत होते, तो साराच प्रकार रोचक आणि रोमांचक होता. शिवसेना व भाजप यांचा उत्कर्ष, काँग्रेसची वेगवान घसरण, समाजवादी व कम्युनिस्ट यांचा नको तितका ऱ्हास आणि देभरात सर्वत्र लहान-मोठ्या प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व असा तो राजकीय कालखंड होता. शिवाय, देशात आर्थिक उदारीकरण पर्व अवतरल्यानंतरचा तो काळ असल्याने उद्योग, व्यापार, साहित्य, कला, क्रीडा, तंत्रज्ञान इत्यादी सर्व क्षेत्रांत कमी-अधिक चांगले व वाईट बदल दिसू लागले होते. त्यामुळे सामाजिक संस्था-संघटना व चळवळी, आंदोलने यांच्यातही कोलाहल निर्माण झाला. शेती व शिक्षण क्षेत्रांवर इष्ट-अनिष्ट असे दूरगामी परिणाम झाले. याच काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर व भारतीय उपखंडात बरीच उलथापालथ चालू होती. परिणामी, सर्वच समाजघटकांच्या आशा, अपेक्षा, आकांक्षा वाढीस लागल्या होत्या. जात, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग या प्रकारच्या अस्मिताही अधिक टोकदार होत होत्या. त्या काळाचे प्रतिबिंब टिकेकर-केतकर यांच्या लेखनात व त्यांच्या वृत्तपत्रांत ठळकपणे दिसत होते. तिथे ते दर्पणाची भूमिका पार पाडत होते आणि दिग्दर्शनाचीही! त्यामुळे वाचन-लेखन करू इच्छिणाऱ्या त्या दीड दशकांतील तरुणाईला टिकेकर व केतकर या दोन स्कूल आहेत असे वाटत असे. दोन्हींचीही आवश्यकता व अपरिहार्यता मान्य होत असे.

तर मुद्दा असा की, केतकरांची पत्रकारिता टिळकांशी नाते सांगणारी होती हे लक्षात घेतले तर केतकरांकडे कसे पहावे हे समजून घेता येईल. टिळकांवर त्यांच्या हयातीत आणि मृत्यूनंतर शंभर वर्षांनीही वेगवेगळ्या कारणांनी टीका करणारा वर्ग होताच; तरीही वस्तुस्थिती हीच उरते की, विसाव्या शतकाच्या पहिल्या पाव शतकात आणि देशाचा स्वातंत्र्यलढा खऱ्या अर्थाने सुरू झाला त्या काळातही राष्ट्रीय स्तरावर पोहोचलेले पहिले महाराष्ट्रीय नेते लोकमान्य टिळक हेच होते. (नंतर हे स्थान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मिळाले) अगदी तसेच कुमार केतकर यांच्या भूमिका व त्यांची मांडणी यासंदर्भात त्या काळात आणि आजही विविध प्रकारची टीका होत असली तरी, एकविसाव्या शतकाच्या पहिल्या पाव शतकात मराठी पत्रकारितेतील कार्यासाठी राष्ट्रीय स्तरावर ओळख असलेला संपादक म्हणून केतकरांचेच नाव घ्यावे लागेल.

कुमार केतकर यांनी घेतलेल्या सामाजिक भूमिकांविषयी प्रतिगामी शक्ती वगळता कोणी आक्षेप घेतले नाहीत. अन्य क्षेत्रांतील त्यांच्या भूमिकांविषयीही फारसे वाद निर्माण झाले नाहीत. कॉन्सपीरसी थिअरीवर अतिरिक्त विश्वास आणि अराजकाची सातत्याने दाखवलेली भीती यामुळे त्यांच्यावर काही प्रमाणात टीका झाली. मात्र त्यांच्या राजकीय भूमिकांविषयी त्यांचे अन्य घटकांशी असलेले नाते कायम 'लव्ह-हेट' स्वरूपाचे राहिले आहे. म्हणजे मार्क्सवादाशी व डाव्या विचारांशी घट्ट नाते सांगणारे केतकर कम्युनिस्टांना जवळचे वाटले नाहीत, याचे कारण डाव्यांची पोथीनिष्ठता, ठोकळेबाजपणा व जागतिकीकरणविरोधी भूमिका यांवर केतकरांनी सतत टीका केली. एक पुरोगामी लेखक-विचारवंत म्हणून समाजवाद्यांमधील विविध गटांना केतकर जवळचे वाटायचे, पण इंदिरा गांधी परिवार व १९७५ ची आणीबाणी यांचे समर्थन ज्या हिरीरीने केतकर करतात, ते समाजवाद्यांना कायम खटकत राहिले. काँग्रेस पक्षाच्या विचारांचे व गांधी-नेहरू यांच्या वारशाचे जोरदार समर्थन केतकर करायचे, पण सर्वच लहान-थोर काँग्रेसजनांवर ते ज्या पद्धतीने प्रहार करायचे, त्यामुळे बहुतांश काँग्रेसवाले त्यांच्यापासून दूर राहणे पसंत करायचे. केतकर यांनी सर्वाधिक कठोर टीका केली ती भाजप व संघ परिवारावर आणि हिंदुत्ववादी संघटनांवर; ते केतकरांचा द्वेषच करायचे, पण केतकर काय बोलतात व लिहितात हे मात्र आवर्जून वाचायचे; किंबहुना असा एखादा पत्रकार-संपादक आपल्या विचाराचा नाही, याचा त्यांना हेवा वाटायचा. तर अशा चारही प्रमुख राजकीय प्रवाहांतील लोकांना केतकरांविषयी आकर्षणही वाटत होते आणि कोणत्या ना कोणत्या कारणाने रागही होता.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेतली तर काही लोकांना असे वाटेल की, केतकर हे नेमके आहेत तरी कोण? पण असा प्रश्न अन्य कोणाबद्दल उपस्थित करून शंका-कुशंका व्यक्त केल्या किंवा त्यांच्या धारणांविषयी संशय व्यक्त केला तर ते समजू शकते. मात्र पत्रकारिता हा धर्म आहे, असे मानणाऱ्या संपादकांबद्दल असा प्रश्न उपस्थित होत असेल तर तो त्यांचा गौरव मानायला हवा, तेच त्यांचे सर्वांत मोठे यश मानायला हवे. त्या अर्थाने कमालीचे यशस्वी ठरलेल्या कुमार केतकर या संपादकाला पुढील आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी साधना साप्ताहिकाच्या वतीने मन:पूर्वक शुभेच्छा!

---

## १ जानेवारीपासून साधनाच्या वर्गणीत वाढ

साधना साप्ताहिकाचे वर्षभरात मिळून ४८ अंक प्रकाशित होतात, त्यात तीन दिवाळी अंक (बालकुमार, युवा, मुख्य) आणि अन्य पाच विशेषांक असतात. हे सर्व अंक दर आठवड्याला वर्गणीदार वाचकांना पोस्टाने पाठवले जातात. वर्षभरातील या घरपोच अंकांसाठी वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी भरण्याची सोय असते. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षांनंतर या वर्गणीत थोडी वाढ केली जाते. त्यामुळे १ जानेवारी २०२१ पासून साधनाची वार्षिक द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ९०० रुपये, १८०० रुपये, २७०० रुपये अशी आहे. ही वर्गणी चेक, कॅश, बँक ट्रान्सफर इत्यादी मार्गाने भरता येते, त्यासाठी आवश्यक तपशील साधनाच्या प्रत्येक अंकात अनुक्रमणिकेच्या पानावर असतात.

बराक ओबामा

# 'अ प्रॉमिस्ड लॅन्ड' या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद

(भाग १)

**प्रश्न** – कोविड-१९ ही महामारी सुरू झाल्यानंतरच्या पाच-सहा महिन्यांच्या काळात आपण जे मृत्यूचे तांडव पाहिले आणि विध्वंस पाहिला आहे, त्याबद्दल तुम्ही ट्रंप यांना कितपत दोष द्याल?

– कोणीही राष्ट्राध्यक्ष असते, तरी त्यांना ही परिस्थिती हाताळणे कठीण गेले असते. अतिशय जबाबदारीने वागलेले देश आपण बघत आहोत– त्यांनी सर्व पावले योग्य प्रकारे उचलली, तरीदेखील तेथील रुग्णसंख्या वाढत गेली. याचे कारण, या रोगाशी सामना करण्याची ही आपली पहिलीच वेळ आहे. हा असा विषाणू आहे, जो अधिकाधिक नुकसान करत जातो. हा विषाणू इबोलाइतका संहारक नाही, म्हणजे हा वेगाने पसरत नाही, मात्र प्रचंड किंमत वसूल करतो. यासंदर्भात कॅनडाकडे पाहणे योग्य ठरेल. त्यांच्याकडेही अनेक मोठ्या अडचणी आहेत, पण त्यांचा मृत्यूदर आपल्यापेक्षा ६१ टक्क्यांनी कमी आहे. याची अनेक कारणे आहेत. उदा. कॅनडात सर्वांना आरोग्यसेवा उपलब्ध आहे, काही भागात लोकसंख्येची घनता खूप कमी आहे. पण दोन्ही देश एकाच खंडात असून, दोन्हीकडे एकूण परिस्थितीही सारखी आहे. त्यामुळे आपली आणि त्यांची तुलना करता येण्यासारखी आहे.

'आपण विज्ञानाचा पाठपुरावा करू, हे संकट गांभीर्याने घेऊ' असे व्हाईट हाऊस सुरुवातीपासून म्हणत राहिले असते, त्यांनी डॉ.फाऊची (ॲलर्जी व संसर्गजन्य रोग प्रतिबंधक संस्थेचे संचालक) हे जे काही सांगत होते त्याप्रमाणे वागायचे ठरवले असते, मुखपट्टी घालण्यासारख्या प्राथमिक स्वरूपाच्या प्रतिबंधक उपायांमध्ये राजकारण आणले नसते, सर्व व्यवहार पूर्ववत् करण्याची घाई केली नसती आणि माध्यमांमधून व अन्य मोठ्या स्रोतांद्वारे 'या महामारीची तीव्रता कमी आहे' असे सांगितले नसते; तर अनेकांचे प्राण वाचले असते आणि परिस्थितीवर पक्के नियंत्रण राहिले असते. रोग्यांच्या संपर्कात

> आता माझा आशावादी दृष्टिकोन सांगतो. धर्मश्रद्ध आणि परंपरानिष्ठ मंडळींमध्ये असा एक प्रवाह आहे ज्याला मूलतः आपल्या जीवनाने त्याला पूर्वी असलेला जो अर्थ आणि हेतू होता तो आता गमावलेला आहे असे वाटते. त्यांना तो परत प्रस्थापित करायचा आणि एक प्रकारची आध्यात्मिक दृष्टी परत आणायची आहे. या मंडळींबरोबर एका समान भूमिकेवर एकत्र येणे शक्य आहे, अशी माझी धारणा आहे. त्यामुळे मला काही एक आशावाद वाटतो. ही अशी मंडळी आहेत ज्यांचा सामाजाचे नेतृत्व केले पाहिजे, काळजी घेतली पाहिजे तसेच आणि समाजातील दुर्बलांची काळजी घेतली पाहिजे यावर विश्वास आहे. या बिगर-भौतिक प्रेरणा या त्यांच्यात आणि डाव्यांमध्ये या दोघांमध्ये आहेत. पण फरक हा आहे की, डावी मंडळी बिगर-धार्मिक चौकटीमध्ये या प्रेरणांची मांडणी करतात.

आलेल्या व्यक्तींचा शोध घेणे आणि चाचण्या घेण्याबद्दलची नियमवाली तयार करणे, हे काम लवकर केले असते तर रोगाचे इतके तीव्र उद्रेक सर्वत्र दिसले नसते. शिवाय देशाच्या काही भागात महामारीची तीव्रता कमी करण्यात यश मिळू शकले असते.

आताची चांगली बातमी अशी आहे की, नवे अध्यक्ष ज्यो बायडेन यांचे कार्यालयप्रमुख रॉन क्लाएन हे असणार आहेत. मी अध्यक्ष होतो त्या काळात ते इबोला विषाणूच्या संदर्भातील उपाययोजनांचे प्रमुख होते. अशा मोठ्या आणि महत्त्वाच्या सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नांची हाताळणी कशी करायची, हे त्यांना चांगले माहीत आहे. या समस्येशी सामना करण्यासाठी सर्वोत्तम अशा वैज्ञानिकांना व तंत्रवैज्ञानिकांना आणि संघटनात्मक उपाययोजना प्रत्यक्षात आणू शकतील अशा व्यक्तींना त्यांनी स्वतःभोवती गोळा करून ठेवलेले आहे. त्यामुळे लशीचे चांगले परिणाम लवकर दिसू लागतील. पण लशीचे योग्य प्रकारे वितरण करणे आणि या महामारीच्या सुरुवातीच्या काळात प्रसृत झालेली चुकीची माहिती व चुकीचे संदेश यामुळे निर्माण झालेले अविश्वासाचे / संशयाचे वातावरण दूर करणे, हे मोठे आव्हानात्मक काम आहे. आपण त्यात यशस्वी होऊ. एकूण परिस्थिती कठीणच असणार होती, पण आपण ती अधिक कठीण करून ठेवली आहे.

**प्रश्न –** ट्रम्प व बायडेन यांच्याकडे सत्तेचे हस्तांतरण होताना निर्माण झालेल्या समस्येबद्दल काय सांगाल?

– माझ्या आधीचे अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू.बुश आणि माझ्यात अनेक मतभेद होते, पण त्यांनी व त्यांच्या प्रशासनाने सत्तेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासंदर्भात खूप सौजन्य दाखवले. आताच्या निवडणुकीनंतर सर्वांत क्लेशदायक बाब म्हणजे, डोनाल्ड ट्रंप यांचा चिडचिडेपणा आणि याबाबत त्यांना उघडपणे दोष देण्याची इतर रिपब्लिकन नेत्यांची अनिच्छा यामुळे वाया गेलेला काळ.

**प्रश्न –** आता तुमच्या नव्या पुस्तकाबद्दल बोलू. तुमच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकिर्दीतील अशा कोणत्या बाबी आहेत, ज्यांची माहिती हे पुस्तक लिहायला लागेपर्यंत तुम्हाला नव्हती?

– हे पुस्तक लिहून झाल्यावर मागे वळून पाहिले, तेव्हा असे लक्षात की– माझ्या अध्यक्षपदाच्या संपूर्ण कारकिर्दीत माझ्या मतांमध्ये कमालीचे सातत्य होते. हे पुस्तक लिहायला सुरुवात केली तेव्हा माझ्या मनात कारकिर्दीचा प्रवास कसा व कोणत्या दिशेने झाला, याबद्दल एक साधारणतः समज तयार होतीच; शिवाय मला यातून काय सांगायचे आहे, याची चौकटदेखील तयार होती. त्यामुळे लिखाण करीत असताना मला असे कधीच वाटले नाही की, 'अरे, याबद्दल मी विचारच केला नव्हता!' आणि आताही मला तसे वाटत नाही. मात्र, मागे वळून पाहताना एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. ती अशी की– मी राष्ट्राध्यक्ष होण्याच्या कल्पनेलाच झालेल्या विरोधाचा उगम साराह पेलिन यांनी निवडणूक प्रचारादरम्यान केलेल्या वक्तव्यांमध्ये असून, टी–पार्टी [१] चळवळीद्वारे तो प्रकट स्वरूपात पुढे आला आणि पुस्तकाचा शेवट ज्या ओसामा बिन लादेनच्या मृत्यूच्या हकिगतीने होतोय, तिथपर्यंतच्या कालखंडात तो विरोध कायम राहिला.

**प्रश्न –** तुमच्या राष्ट्राध्यक्षपदाच्याचा कारकिर्दीदरम्यान हे स्पष्ट झाले नव्हते?

– आम्ही त्या वेळी कामात खूप व्यग्र होतो, विविध समस्यांवर सर्व लक्ष केंद्रित केले होते. मला असे वाटते होते की, आपण आपल्या भावना व्यक्त करू नयेत. म्हणजे राष्ट्राध्यक्षांनी खासगीत रडगाणी गावीत, सार्वजनिकरीत्या तसे करू नये, असे मी स्वतःला बजावले होते.

**प्रश्न –** आता अब्जाधीश आणि राष्ट्राध्यक्ष...

– आमच्या समोर ज्या काही अडचणी होत्या किंवा आम्ही ज्या काही अडचणींचा सामना करीत होतो, त्यापेक्षा अधिक गंभीर अडचणींशी लोक संघर्ष करीत आहेत, अशी आमची धारणा होती वस्तुस्थिती हीच आहे, ही खूणगाठ आम्ही आमच्या मनाशी पक्की केली होती. पण मी जेव्हा ज्यो विल्सन घटनेसंदर्भात लिहिले, तेव्हा अमेरिकेच्या संसदेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करीत असताना कनिष्ठ सभागृहाचे एक सदस्य 'तुम्ही खोटं बोलताय' असे मध्येच ओरडून म्हणाले...

**प्रश्न –** ते अभूतपूर्वच होते.

– असे याआधी कधीच घडले नव्हते. याबद्दलचा आमचा एकूण दृष्टिकोन 'हां चला, आता पुढच्या कामाला लागू या' असा होता. पण पुस्तक लिखाणादरम्यान मनात विचार आला, 'ही घटना समाजाच्या पोटात काही तरी घडत आहे, आकार घेत आहे आणि वाढत आहे याचे द्योतक तर नाही ना?' ट्रंप यांची कारकीर्द मध्यावर असताना मी लिखाण करीत होतो. मला असे दिसले की, माझ्या

राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात ज्या अनेक गोष्टी घडल्या, त्यातून ट्रंप यांच्या कार्यकाळात काय घडणार याचे एक प्रकारे सूचनच होत होते.

**प्रश्न –** तुमच्या पुस्तकातून हे स्पष्ट दिसते की, तुमच्यासाठी साराह पेलिन [२] या येऊ घातलेल्या विध्वंसक झंझावताच्या अग्रदूत होत्या, तर टी-पार्टी चळवळीच्या उदयाची ठिणगी पेटविणारे सीएनबीसीचे पत्रकार सँटेल्ली यांचा क्रमांक पेलिन यांच्यानंतर लागतो. मग बाकीची मंडळी येतात.

– आता हे सगळे घडत आहे तेव्हा तुम्हाला असे वाटू लागते की, रिपब्लिकन पक्षात किंवा उजव्या विचारांच्या चळवळीत हा असा प्रवाह कायमच होता. या प्रवाहाचा माग घेता तो जॉन बर्च सोसायटीइतका [३] किंवा गोल्डवॉटर [४] यांनी १९६४ मध्ये जो काही प्रचार केला, तितका जुना आहे. पण त्याच वेळी असेदेखील वाटू लागते की– हे सर्व आता अस्तंगत झाले आहे किंवा तो प्रवाह कधीच मागे पडला आहे आणि आपण आता त्याच्या खूप पुढे आलो आहोत.

**प्रश्न –** पण राष्ट्राध्यक्षपदावर तुमची निवड होणे आणि नंतरची तुमची कारकीर्द पाहता, आता ते सर्व मागे टाकून अमेरिका पुढे जात आहे, असे मानले जात होते.

– बरोबर आहे ते. पण या सगळ्या गोष्टी त्या प्रकारच्या शक्तीतील काही घटकांना चालना देतात किंवा मुक्त करतात, असे म्हणता येईल. मॅकेन [५] यांच्या प्रचारसभा आणि पेलिन यांच्या प्रचारसभांमधील वातावरणाची व त्यांच्या-त्यांच्या प्रभावाची तुलना करा. त्या दोन्ही वेळा रिपब्लिकन पक्षाचा जो पाठीराखा वर्ग आहे, त्याच्यात संचारलेला उत्साह आणि उत्सुकता अशी नुसती तुलना तर करा. अस्मितांचे राजकारण, मूलनिवासीवाद, कट-कारस्थाने यांना केंद्रस्थानी ठेवून केल्या जात असलेल्या आवाहनांना ज्या प्रमाणात आता चालना मिळत आहे त्याचे ते सूचन होते असे मला वाटते. माझे लिखाण जसजसे पुढे सरकत गेले तसतसे आता जे काही घडत आहे, त्याचे धागेदोरे अधिक अधिक स्पष्ट होत गेले.

सिनेटच्या [६] कार्यपद्धतीची एकूण चौकट आणि विशेषतः फिलिबस्तर (filibrrver) [७] हा नियम यांच्यामुळे आम्हाला कोणतेही मोठे पाऊल उचलता येत नव्हते, त्यामुळे एक प्रकारचा संशययुक्त निराशावाद किंवा अविश्वासाचे वातावरण उदयाला येऊ लागले होते. तसेच २००८ मध्ये मोठा विजय मिळवूनदेखील किंवा एका मोठ्या संकटाच्या काळातही (संसदेत प्रचंड बहुमत असूनसुद्धा) कायदे संमत करून घेता येणे कठीण असते, याची जाणीव मला हे पुस्तक लिहीत असताना झाली. मिच मॅकॉनेल [८] यांच्या वागणुकीमुळे २०११ पर्यंत आम्हाला हे सगळे जरा जास्तच कळले होते. पण मॅकॉनेल आणि सिनेटमधील त्यांच्या पक्षाचे सहकारी इतक्या लवकर सगळ्या गोष्टी बंद पाडायला लागतील किंवा अडवणुकीसाठी अडवणूक करण्याचे प्रमाण इतके वाढेल व तो पायंडाच पडून जाईल याचा अंदाज येणे कठीण होते.

**प्रश्न –** कोणत्याही मागण्या कितीही प्रमाणात मान्य केल्या तरी आरोग्यसुविधांविषयक विधेयकाबाबत चक ग्रासली [९] पाठिंबा देणार नाहीत, हे तुम्हाला मॅक्स बाकस [१०] यांना दाखवून द्यावे लागले; तो प्रसंग मला आता आठवतो.

– तोपर्यंत हे सगळे माझ्या लक्षात आले होते, पण मॅक्स यांच्या लक्षात आलेले नव्हते. ही बाब मी लिहायला सुरुवात केली, तेव्हा ती मला उमजलेली होतीच. पण लिहीत असताना अशी अनेक उदाहरणे आठवणीतून पुढे येत गेली. रश लिंबॉ [११] आणि फॉक्स न्यूज [१२] हे एकत्र आल्यामुळे (खरे पाहिले तर सर्व उजव्या विचारांच्या माध्यमांच्या प्रभावळीमुळे) रिपब्लिकन पक्षाच्या पाठीराख्या वर्गाचे स्वरूप इतके बदलून गेले होते की, रिपब्लिकन पक्षाच्या प्रत्येक संसद सदस्याला आणि राज्यपातळीवर निवडून आलेल्या प्रत्येकाला असे वाटू लागले होते की, माझ्याशी व डेमॉक्रॅटिक पक्षाशी सहकार्य करणे राजकीय दृष्ट्या परवडणारे नाही. ताठरपणाव्यतिरिक्त अन्य कोणतीही भूमिका ते घेऊ शकत नव्हते. कट-कारस्थानाबद्दलची सर्व मांडणी (ती खोटी आहे, हे त्यांना माहीत होते) त्यांना चालवून घ्यावी किंवा सहन करावी लागत होती. आजची परिस्थिती पाहता, ते साहजिक म्हणावे लागेल.

आताची निवडणूक ज्यो बायडेन आणि कमला हॅरिस यांनी बऱ्यापैकी निर्णायक रीत्या जिंकलेली आहे. हा काही जोरदार विजय नाही, पण २०१२ मध्ये माझ्या बाजूने जितका स्पष्ट कौल होता, तितकाच स्पष्ट कौल या वेळी त्यांच्या बाजूने आहे. निर्वाचित पदांवर असलेल्या रिपब्लिकनांपैकी जवळपास प्रत्येकाला हे माहीत आहे. त्यामुळे निकालानंतरच्या पहिल्या एक-दोन दिवसांमध्ये 'मतदान प्रक्रियेमध्ये गैरप्रकार झाले', असा कांगावा कोणीही केला नाही. त्यासाठी ट्रंप यांच्या इशाऱ्याची या मंडळींनी वाट पाहिली.

**प्रश्न –** द अ‍ॅटलांटिकमध्ये अ‍ॅन अप्पलबाऊम आणि इतर काही जण या दूषित कृती–वक्तव्यांबद्दल लिहीत आहेत. या अपराध–गुन्ह्यांमधील इतरांच्या सहभागा–बद्दलच्या मुद्यावर लिहीत आहेत. मला हे जाणून घेण्यात रस आहे की, डोनाल्ड ट्रंप यांच्यापेक्षा हुशार असलेली मंडळी, म्हणजे– लिंडसे ग्रॅहॅम, मार्को रुबियो यांच्यासारख्या–राजकारणी लोकांची भूमिका याबद्दल तुम्हाला काय वाटत आहे?

– गेल्या चार वर्षांच्या काळात मला सर्वाधिक आश्चर्य कशाचे वाटले असेल तर याचे. डोनाल्ड ट्रंप यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची वागण्याची पद्धत याचे मला आश्चर्य वाटले नाही. २०१६ च्या आधीदेखील हे सगळे स्पष्टच होते. त्यांच्यात फार मोठा बदल होईल, अशी आशा मला वाटत नव्हती.

पण रिपब्लिकन पक्षातील प्रस्थापित मंडळी– ज्या लोकांनी वॉशिंग्टनमध्ये बरीच वर्षे घालवलेली आहेत आणि ही मंडळी, राजकीय व्यवस्थेसंदर्भात काही संस्थात्मक मूल्यांवर व पायंड्यांवर आमचा विश्वास आहे असे सांगत होती– इतक्या सहजपणे गुडघे टेकतील, असे मला वाटलेच नव्हते. जॉन मॅकेन यांच्याबद्दल विचार केला तर– आता माझे त्यांच्याशी कितीही मतभेद असले तरी व्लादिमीर पुतिन यांच्याशी नको इतकी सलगी ट्रम्प यांनी केली, याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नसते किंवा आपल्या गुप्तचर संस्थांनी लावलेल्या अन्वयार्थाऐवजी रशियाने लावलेला अन्वयार्थ पसंत केला नसता. रिपब्लिकन पक्षातील मंडळींनी सगळ्या संदर्भातील त्यांच्या पूर्वीच्या भूमिका १८० अंशात बदलल्या, ही बाब चिंतेची आहे.

आता पुढे जे सांगणार आहे, ते याआधीदेखील सांगितले आहे. रिपब्लिकन पक्षाची– उजवा विचारप्रवाह म्हणा– एक अडचण आहे. ती म्हणजे, त्यांच्या पाठीराख्या वर्गाचा एकूण दृष्टिकोन उजव्या विचारांच्या माध्यमांनी घडवलेला आहे. त्यामुळे मुळात झाले काय आहे तर– निर्वाचित असलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या सदस्यांना असे वाटते की, आपल्याला राजकारणात टिकायचे असेल तर या कट–कारस्थानांच्या कथांना, ठामपणे केल्या जाणाऱ्या तद्दन खोट्या विधानांना; तसेच डोनाल्ड ट्रंप, रश लिंबॉ आणि तत्सम मंडळींनी तयार केलेल्या कल्पित कथांना संमती दिली पाहिजे. अशी संमती का द्यायची, तर या सगळ्यावर लोकांचा विश्वास आहे म्हणून.

**प्रश्न –** सँटेल्ली यांनी सीएनबीसीवर जे काही केले– नव्या बॉस्टन टी पार्टीची हाक दिली– त्याला तुम्ही भंकसपणा असे म्हटले आहे.

– आता तुम्ही ते सर्व चित्र पाहिले तर ती नौटंकी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. सेलिब्रिटी अ‍ॅप्रेंटिसपेक्षा [१३] हे काही वेगळे नव्हते. निव्वळ करमणूक. पण त्यात एक फरक आहे आणि तो मला सँटेल्लींची क्लिप पाहताना व आता पुस्तक लिहीत असताना पुन्हा लक्षात आला. तो म्हणजे– हे सगळे शिकागो बोर्ड ऑफ ट्रेडमध्ये [१४] चालले होते. या सर्व व्यापारी मंडळींना जे काही सांगितले गेले, ते सर्व खरे आहे असे त्यांना वाटत होते. उदा. ‘आम्ही’ पीडित आहोत, ‘आमच्यावर’ अन्याय होत आहे. आता ‘आम्ही म्हणजे नेमके कोण?’ तर, त्याची व्याख्या कशीही आणि हव्या त्या पद्धतीने केली जात आहे. तर, ‘आम्ही’ म्हणजे श्वेतवर्णीय अमेरिकी लोक किंवा श्वेतवर्णीय कामगार किंवा परंपरावादी मंडळी. ‘आमच्यावर’ अन्याय होत आहे– ही भावना लक्षणीय आहे. आणि आता तर अब्जाधीश व मोठ्या कंपन्यांचे सीईओ यांनादेखील ‘आपण पीडित आहोत’, असे वाटायला लागले आहे. पीडित असल्याच्या या भावना किती तीव्र होत्या आणि ज्या प्रकारच्या संतापाची व अन्यायाची भावना यांचा प्रचार–प्रसार पेलिन अन् सँटेल्ली यांनी चालवलेला होता, ती भावना लोक किती लवकर स्वीकारतील हे उमजण्याची प्रक्रिया तशी रोचक होती.

तेव्हा या सर्व भाव–भावनांची अभिव्यक्ती टी–पार्टी चळवळीमार्फत झाली आणि ती अभिव्यक्ती सच्ची होती. अनेक वर्षे वाढत नसलेले पगार आणि विविध शहरांमधून उद्योगांच्या स्थलांतरामुळे रोजगाराच्या संधी घटण्यामुळे लोकांच्या मनात निर्माण झालेले नैराश्य व हताशपणाची भावना यामध्ये याची कारणे आहेत. हे नैराश्य व हा हताशपणा काही खोटा नाही, तो खरा आहे. प्रस्थापित मंडळी आपला गैरफायदा घेत आहेत, असे लोकांना वाटत आहे. समाजातले आपले स्थान आपण गमावत आहोत, आपली अस्मिता हरवत चाललो आहोत, हीदेखील लोकभावना आहे. मात्र या संतापाचा आणि नैराश्य व हताशपणा या भावनांचा वापर करीत, लोकांना चुकीच्या दिशांना वळवता येऊ शकते, हे मला माझ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळातील सुरुवातीच्या दिवसांमध्ये स्पष्ट होऊ लागले होते.

**प्रश्न –** ट्रंप यांना ज्यांनी मते दिली, त्या सगळ्यांना

सरसकट निकालात न काढता; ट्रंप नावाचा हा जो काही फेनॉमिना आहे, तो तुम्ही स्वतःला समजावून सांगितला आहे काय?

– ट्रंपसारख्या व्यक्तीला आपल्या राजकारणात महत्त्व मिळू शकले, याचे मला आश्चर्य वाटत नाही, असे मी म्हणेन. ट्रम्प हे जसे या सगळ्या बदलांचे दृश्य लक्षण आहेत, तसेच ते त्यांचे त्वरकदेखील आहेत. पण आपल्या देशात एखादा लोकानुरंजवादी विचारांचा नेता तेव्हा पुढे येणे अपरिहार्य होते असे मानायचे असेल, तर यांच्यापेक्षा आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा नेता पुढे येईल, अशी माझी अपेक्षा होती.

**प्रश्न –** म्हणजे ट्रम्प यांच्यासारखी अपक्व आणि बालिश व्यक्ती तुम्हाला अपेक्षित नव्हती?

– हो. आता तुम्ही भूतकाळातील लोकानुरंजनवादी नेत्यांचा विचार केलात... उदा. ह्युई लाँग[१५] ते काही उजवे नव्हते. लोकानुरंजवादी नेत्याचा पक्का उत्तम नमुना होते, पण त्यांची वास्तवाशी नाळ पक्की जुळलेली होती. ते ज्यांना आपल्याभोवती संघटित करीत होते, त्यांच्या जीवनाची त्यांना पक्की जाण होती. एवढेच नाही तर, त्यांची या लोकांबद्दलची समज खरीखुरी आणि बावनकशी होती. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना तुच्छ लेखणारी एखादी व्यक्ती त्याच लोकांचे लक्ष वेधून घेईल आणि लोकांचा पाठिंबा मिळवेल, अशी कल्पना मी कधीच केली नव्हती. त्यामुळे मला या सगळ्याचे आश्चर्य वाटते. पुढे जे काही मांडत आहे ते... अमेरिकन संस्कृतीतील आदर्श नायकाचे जे रूप आपल्यासमोर होते, त्याचा मी जेव्हा विचार करतो; तेव्हा जॉन वेन, गॅरी कूपर, जिमी स्टुअर्ट, क्लिंट ईस्टवुड[१६] आदी नावे माझ्या डोळ्यांसमोर त्या वेळी वागण्या-बोलण्याची एक चौकट होती, यावर मी नेहमी भर देतो. मी आफ्रिकी-अमेरिकन असेन, पण आफ्रिकी आहे आणि त्याचबरोबर मी अमेरिकनदेखील आहे. अमेरिकन असणे हा माझ्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. पुरुषांनी कसे वागावे याची जी चौकट आहे, ती १९३० व १९४० च्या दशकात आणि त्याआधीच्या काळात उगम पावली. पुरुष आश्वासन पाळणारा असावा, त्याने जबाबदारी घ्यावी, तो तक्रार करणारा नसावा, तो दादागिरी करणारा नसावा किंबहुना, तो दादागिरी करणाऱ्यांपासून दुर्बलांचे संरक्षण करणारा असावा. त्याने सामाजिक समस्यांबद्दल आपण कसे जागरूक आहोत हे दाखविण्याच्या प्रवृत्तीबद्दल कोणाच्या भावना दुखावणार नाहीत अशा पद्धतीने बोलले आणि वागले पाहिजे. याबद्दल जागरूक असण्याच्या आणि तशा आग्रही प्रवृत्तीबद्दल नाराज असाल, पुरुषांनी पुरुषांसारखे वागले पाहिजे असे मानणारे असाल, पितृसत्तेबद्दल सातत्याने केल्या जाणाऱ्या तक्रारींचा तुम्हाला कंटाळा येत असेल; तर तुमचा आदर्श हा काही रिची रिचसारखा[१७] तक्रारखोर, खोटारडा व सगळ्याची जबाबदारी टाळणारा असणार नाही, अशी माझी धारणा होती.

एकूणच आपल्या संस्कृतीतील टीव्हीची जी ताकद आहे, त्याचे हे द्योतक आहे. आता सगळे माझ्या लक्षात येत नाही, कारण मी फारसा टीव्ही पाहत नाही. रिॲलिटी शो अर्थातच पाहत नाही, त्यामुळे आजूबाजूला जे फेनॉमिना पुढे येतात ते मला कळत नाहीत. पण माझ्या मते, हे जे काही घडत आहे त्याचा अर्थ– एकूणच लोकमतामध्ये काहीएक बदल झाला आहे. खरे सांगायचे तर पुरुषांनी कसे वागले पाहिजे, या ज्या काही धारणा आहेत आणि अशा वागण्याची जी म्हणून गुणवैशिष्ट्ये सांगितली जातात (जी खास पुरुषांची म्हणून आहेत, असे मानले जात असे) त्यांचा मी चाहता आणि प्रशंसक आहे. तुम्ही जेव्हा आपल्याकडील 'द ग्रेटेस्ट जनरेशन'चा[१८] विचार करता, तेव्हा तुमच्यासमोर त्याग हा गुण उभा राहतो.

**प्रश्न –** काही बाबींचा विचार केला तर एका अर्थाने 'ट्रंप अजिबात नको', असे मानणारे जे परंपरानिष्ठ विचारांचे लोक आहेत त्यापैकी तुम्ही एक आहात, असे माझे एक सहकारी म्हणतात.

– ही मांडणी मी समजू शकतो. सचोटी, प्रामाणिकपणा, जबाबदारी घेण्याची तयारी आणि या जबाबदारीची जाणीव, ही जुन्या वळणाची साधीसुधी मूल्यं, यांचा मी चाहता आहे. माझे आईकडचे आजी-आजोबा कान्सास राज्यातले. हे सगळे तिकडून आलेले आहे. जे अमेरिकन सैनिक नॉर्मंडीत लढले– त्यात माझे अंकल[१९] चार्लीदेखील होते. ज्या लष्करी तुकड्यांनी बुखेनवॉल्डच्या नाझी छळछावणीचे काही भाग मुक्त केले, त्यापैकी एकात ते होते. त्यांच्या मर्यादा कोणत्या का असेनात, पुरुष म्हणून तुम्ही काय करू शकता व काय करू शकत नाहीत आणि तुम्हाला कोणत्या भावना असाव्यात वा असू नयेत, याबाबत त्यांना जे काही सांगितले गेले आणि भाव-भावना व्यक्त करण्याबाबतीत त्यांच्यावर जी बंधने होती, यामुळे स्त्रियांशी असलेल्या त्यांच्या नात्यांमध्ये जो एक समतोल हवा होता, तो नव्हता. या सगळ्याचे त्यांच्या-त्यांच्या आयुष्यातील प्रमाण

अधिक-उणे किती का असेना- या मंडळींनी त्याग केला. त्यांनी याबद्दल कधीही बढाया मारल्या नाहीत, त्यांनी आपण इतरांना फसविणारे किंवा इतरांचा गैरफायदा घेणारे आहोत, अशी आपली ओळख जगाला आवर्जून कधीच सांगितली नसती. तेव्हा तुमच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे झाले तर लोकानुरंजनवादाला केवळ अमेरिकेतच नाही तर जगभर पाठिंबा मिळू शकतो, याचे मला आश्चर्य वाटत नाही. या सगळ्याचा जागतिक दृष्टीने विचार करण्याची प्रवृत्ती हवी.

**प्रश्न –** म्हणजे लोकानुरंजनवाद ज्या प्रकारच्या व्यक्तीद्वारे पुढे आला, त्याचे तुम्हाला आश्चर्य वाटते?

– हो. आणि जन-संस्कृतीमधील काही असे घटक आहेत. त्यांचे हे द्योतक आहे. हे घटक माझ्या लक्षात आले नाहीत. हे सगळे बदल रोचक आहेत. ट्रंप यांना २०२० च्या निवडणुकीत कृष्णवर्णीय पुरुषांकडून मिळणारा पाठिंबा गेल्या वेळच्या प्रमाणात वाढला. एखाद्या एकट्या-दुकट्या रॅप कलाकाराने ट्रंप यांना पाठिंबा दिला, याबद्दल लोक लिहीत आहेत. आता जर तुम्ही हे रॅप संगीताचे व्हिडिओ ऐकलेत? ते कशाबद्दल आहेत? तर, ते महागडे आणि भपकेबाज कपडे-दागिने घालण्याबद्दल, स्त्रियांना मिळविण्याबद्दल, पैसे मिळविण्याबद्दल आहेत. डोनाल्ड ट्रंप यांचे यशस्वी व्यक्ती असण्याचे जे मापदंड आहेत, तेच अनेक रॅप वापरत आहेत. सगळे कसे महागडे असणे, यावर भर. हे सगळे अप्रत्यक्षपणे लोकांना सुचवून ते त्यांच्या मनात भरले जाते आणि मग हे सगळे सांस्कृतिक वातावरणात पाझरत जाते.

मिशेल [२०] आणि मी आम्ही दोघेही वेगवेगळ्या ठिकाणी लहानाचे मोठे झालो. कुटुंबाच्या उत्पन्नाचा निकष लावला तर आम्ही दोघे निश्चितपणे कनिष्ठ मध्यमवर्गीय कष्टकरी वर्गातले होतो. एखादी गोष्ट किंवा वस्तू नाही म्हणून तुम्ही नालायक आहात किंवा तुमची काडीचीही किंमत नाही, या भावनेतून आमच्याकडे पहिले जात नसे. मिशेल आणि मी याबद्दल अलीकडेच बोलत होतो. अमेरिकन समाज नेहमीच श्रेणीबद्ध होता- गरीब आणि श्रीमंत. आणि केवळ आर्थिक स्तरांची श्रेणीबद्धता नाही, तर वांशिक गटांचीदेखील. पण मी लहानाचा मोठा होत असताना श्रेणीबद्धता ठळकपणे जाणवत नसे. मग आपण 'लाईफस्टाइल्स ऑफ द रिच अँड फेमस' [२१] पाहायला लागलो आणि तुमच्या पायाशी यश लोळण घेत असेल तर ठीक, नाही तर तुम्हाला काहीच किंमत नाही, ही भावना प्रबळ झाली. हा जो आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेला सांस्कृतिक बदल आहे, त्याचे ट्रंप हे एक उत्तम उदाहरण. एका अर्थाने 'ट्रंप अजिबात नको' असे मानणारी जी परंपरानिष्ठ विचारांची मंडळी आहेत त्यांपैकी मी एक आहे, असा मगाशी तुम्ही उल्लेख केला. तुमचे हे निरीक्षण अगदी अचूक नाही, पण परंपरानिष्ठतेचा जो एक विचारव्यूव्ह आहे, त्याच्यातल्या काही पैलूंबाबत मला सहानुभूती आहे आणि त्याचे कारण माझी एकूण मनोवृत्ती.

कोणत्या अर्थाने मला तसे वाटते हे सांगायचे झाले तर मी काही फक्त आणि फक्त भौतिकवादी नाही. मी आर्थिक नियतीवादी नाही. आता भौतिक समृद्धी महत्त्वाची नाही असे नाही, पण आपल्या मालकीच्या विविध वस्तू, पैसा आणि उत्पन्न यापलीकडेदेखील काही तरी आहे असे मला वाटते- म्हणजे आपण समाजाचे घटक आहोत हे आपण विसरत चाललो आहोत, अशी आधुनिक समाजावर धर्माच्या दृष्टिकोनातून टीका केली जाते ती मला इथे मला अभिप्रेत आहे.

आता माझा आशावादी दृष्टिकोन सांगतो. धर्मश्रद्ध आणि परंपरानिष्ठ मंडळींमध्ये असा एक प्रवाह आहे ज्याला मूलतः आपल्या जीवनाने पूर्वी असलेला जो अर्थ आणि हेतू होता तो आता गमावलेला आहे असे वाटते. त्यांना तो परत प्रस्थापित करायचा आणि एक प्रकारची आध्यात्मिक दृष्टी परत आणायची आहे. या मंडळींबरोबर एका समान भूमिकेवर एकत्र येणे शक्य आहे, अशी माझी धारणा आहे. त्यामुळे मला काही एक आशावाद वाटतो. ही अशी मंडळी आहेत ज्यांचा 'समाजाचे नेतृत्व केले पाहिजे, काळजी घेतली पाहिजे आणि समाजातील दुर्बलांची काळजी घेतली पाहिजे' यांवर विश्वास आहे. या बिगर-भौतिक प्रेरणा त्यांच्यात आणि डाव्यांमध्येही आहेत. पण फरक हा आहे की, डावी मंडळी बिगर-धार्मिक चौकटीमध्ये या प्रेरणांची मांडणी करतात.

तुम्ही तरुण पिढीकडे पाहिलेत, मलिया आणि साशाच्या [२२] पिढीकडे पाहिलेत, तर त्यांच्यात हे सगळे अधिक ठळकपणे दिसते. त्यांना आपल्या जीवनात- आयुष्यातून काय मिळवायचे आहे, यावर ते अधिक बोलतात, व्यक्त होतात. अमक्या-अमक्या तारखेपर्यंत मी वॉल स्ट्रीटवर पोहोचलेलो असेन किंवा प्रस्थापित झालेलो असेन असे त्यांना वाटण्याची शक्यता कमी आहे. आपण कोण आहोत, आपली ओळख काय आहे, हे ती मंडळी या भौतिक निकषांच्या आधारे निश्चित करताना तितक्या

प्रमाणात दिसत नाहीत. हे सगळे मला अधिक आशावादी बनविते.

(भाग २ व ३ पुढील दोन अंकांत)

**अनुवाद : अभय दातार,** नांदेड

abhaydatar@hotmail.com

(The Atalantic या इंग्रजी नियतकालिकात १६ नोव्हेंबरच्या अंकात, **जेफ्री गोल्डबर्ग** यांनी घेतलेली ही मुलाखत आहे.)

**टीपा–**

१. टी पार्टी चळवळ– पत्रकार रिक सँटेल्ली यांच्या आव्हानामुळे ओबामांच्या धोरणांना विरोध करण्यासाठी सुरू झालेली अति–उजवी चळवळ. अमेरिकेच्या राज्यक्रांतीची ठिणगी ठरलेल्या १७७३ च्या बॉस्टन टी–पार्टीच्या नावातून प्रेरणा घेत हे नाव धारण केले. रिपब्लिकन पक्षात मोठा दबदबा आणि प्रभाव. सरकारी खर्चात कपात करून देशाच्या अर्थसंकल्पातील आर्थिक तूट कमी करणे, खासगी क्षेत्रावर कमीतकमी निर्बंध असणे, आदी मुद्यांवर भर.

२. साराह पेलिन– २००८ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या उप–राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार. अलास्का राज्याच्या माजी राज्यपाल. प्रचारादरम्यान आपले अज्ञान प्रकट करणारी अनेक वक्तव्ये तसेच ओबामांवर अनेक वाह्यात आरोप.

३. जॉन बर्च सोसायटी– १९५८ मध्ये स्थापन झालेली उजवी संघटना–संस्था. साम्यवादास कट्टर विरोध हे शीतयुद्धाच्या काळातील त्याचे प्रमुख वैशिष्ट्य. शासनाचे अधिकार कमी करावेत हा अलीकडच्या काळातील मुख्य मुद्दा.

४. बॅरी गोल्डवाटर– रिपब्लिकन पक्षाचे नेते आणि १९६४ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत पक्षाचे उमेदवार. प्रचारात कृष्णवर्णीयांच्या विरोधातील वंशद्वेशी भावनांचा सुप्त पद्धतीने पुरस्कार. तत्कालीन राष्ट्राध्यक्ष आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे उमेदवार लिंडन जॉनसन यांच्याकडून जोरदार पराभव.

५. जॉन मॅकेन– २००८ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार

६. सिनेट– अमेरिकी संसदेचे वरिष्ठ सभगृह.

७. Filibuster सिनेटच्या कामाजाच्या नियमावलीतील एक चमत्कारिक नियम. सभागृहात चर्चेसाठी आलेल्या विधेयकावर सदस्यांना कितीही वेळ बोलत राहता येते. त्यामुळे एखादे विधेयक हाणून पाडायचे झाल्यास एकटा–दुकटा विरोधी सदस्यदेखील तासन्तास बोलत राहून तसे करू शकतो. यास filibustering असे संबोधले जाते. चर्चा लांबविण्याचा हा यत्न थांबवून कामकाज पुढे न्यावयाचे असेल तर तसा ठराव करता येतो, पण त्याला ६० सदस्यांचा पाठिंबा आवश्यक. इतक्या प्रमाणात पाठिंबा मिळविणे अनेक वेळा शक्य नसते, कारण बहुतांश वेळा इतके बहुमत राष्ट्रध्यक्षांच्या पक्षाकडे नसते.

८. मिच मॅकॉनेल– २००६ पासून सिनेटमधील रिपब्लिकन पक्षाचे गट–नेते आणि २०१५ पासून सिनेटमध्ये पक्षाला बहुमत असल्यामुळे आजतागायत सिनेटमधील बहुमत पक्षाचे नेते.

९. चक ग्रॅसली– रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ सिनेट सदस्य. ओबामांच्या पहिल्या कार्यकाळात सिनेटच्या अर्थविषयक समितीतील रिपब्लिकन पक्षाचे सदस्य. सध्या सलग सदस्यत्वाचा सर्वाधिक कार्यकाळ असलेले सदस्य.

१०. मॅक्स बाकस– डेमॉक्रॅटिक पक्षाचे सिनेट सदस्य आणि ओबामांच्या पहिल्या कार्यकाळात सिनेटच्या अर्थविषयक समितीचे अध्यक्ष. नंतर अमेरिकेचे चीनमधील राजदूत.

११. रश लिंबॉ– सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय रेडियो कार्यक्रमाचे सादरकर्ते. आपल्या रश लिंबॉ शोमधून उजव्या विचारांचा जोरदार प्रचार.

१२. फॉक्स न्यूज– माध्यम सम्राट रुपर्ट मरडॉक यांच्या मालकीची दूरचित्रवाहिनी. बातम्या आणि इतर कार्यक्रमांमधून उजव्या विचारांचा प्रचार–प्रसार करते अशी प्रतिमा.

१३. सेलेब्रिटी ॲप्रेंटिस– डोनाल्ड ट्रंप सादर करीत असलेला एक रियालिटी शो. विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्ती आपापसात स्पर्धा करून विजयी होण्यासाठी प्रयत्न करतात, असे या कार्यक्रमाचे स्वरूप.

१४. शिकागो बोर्ड ऑफ ट्रेड– शिकागो शहरात स्थित अमेरिकेतील एक महत्त्वाचा वायदे बाजार.

१५. ह्युई लाँग– लुईसियाना राज्याचे राज्यपाल आणि नंतर त्याच राज्यातर्फे सिनेटवर निवड. दीर्घकाळ लुईसियाना राज्याच्या राजकारणावर पोलादी पकड. राजकीय कारकीर्द अत्यंत वादग्रस्त. १९३५ मध्ये हत्या.

१६. हॉलिवुडमधील प्रख्यात नट. रांगड्या, धीरगंभीर आणि शूर नायकाच्या भुमिकाबद्दल प्रसिद्ध.

१७. रिची रिच– याच नावाच्या कार्टुन सिरीजमधील अतिश्रीमंत मुलगा आणि प्रमुख पात्र–नायक. ओबामांनी जी त्याची म्हणून गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत, ती या कार्टुन सिरीजमधील रिची रिचमध्ये अजिबात नाहीत.

१८. 'द ग्रेटेस्ट जनरेशन'– शब्दशः सर्वोत्तम पिढी. १९३० च्या महामंदीच्या काळात लहानची मोठी झालेल्या आणि पुढे तरुणपणी दुसऱ्या महायुद्धात लढलेल्या पिढीला 'द ग्रेटेस्ट जनरेशन' असे संबोधले जाते.

१९. अंकल चार्ली–चार्ल्स पेन. ओबामांच्या आजी मॅडेलिन दनहॅम यांचे बंधू. दुसऱ्या महायुद्धात सहभाग.

२०. मिशेल ओबामा– ओबामांच्या पत्नी.

२१. 'लाईफस्टाईल्स ऑफ द रिच अँड फेमस' (Lifestyles of the Rich and Famous)– लोकप्रिय अमेरिकी टीव्ही कार्यक्रम. यात लोकांना विविध क्षेत्रांतील अतिश्रीमंत व्यक्तींच्या खर्चिक जीवनशैलीचे जवळून दर्शन घडवून दिले जात असे.

२२. मलिया आणि साशा– मलिया ओबामांची थोरली कन्या तर नताशा उर्फ साशा धाकटी कन्या.

सूरज येंगडे

# दलितांचे दुःख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत

(भाग १)

उदारमतवादी लोकशाहीची चिकित्सा करणारे आंबेडकर पौर्वात्य आणि युरो-अमेरिकी प्रकल्पांसाठीही अडचणीचे ठरतात. अतिसंसदीय लोकशाहीसमोर ते प्रश्नचिन्हं उपस्थित करतात. ते स्पष्टपणे समाजवादी होते; पण आपण गरीब व पिचलेल्यांच्या अधिकारांचे पाठीराखे असल्याचा झेंडा ते सगळीकडे मिरवत राहिले नाहीत. आणि आपण कोणाचे तरी रक्षणकर्ता आहोत, अशा बंदिस्त व्याख्यांमध्ये त्यांना स्वतःला अडकवून घ्यायचं नव्हतं. ते त्या पलीकडे जातात आणि मग ते धर्माची धुरा हाती घेतात. अशा प्रकारच्या अंतिम उद्दिष्टामुळे त्यांना एका विशिष्ट कप्प्यात बसवणं अवघड जातं. ते तुमचेही नसतात किंवा दुसऱ्याही कोणाचे नसतात. ते त्यांच्या लोकांसाठी उभे आहेत आणि असे उभे ठाकलेले आंबेडकर अत्यंत खरेखुरे आहेत.

डॉ.सूरज येंगडे यांनी लिहिलेलं 'कास्ट मॅटर्स' (२०१९) हे पुस्तक सध्या गाजत आहे. त्याचसोबत 'द रॅडिकल इन आंबेडकर' (२०१८) या पुस्तकाचे ते सह-संपादक राहिले आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये ते सदरलेखनही करतात. हार्वर्ड केनेडी स्कूलमध्ये प्रारंभिक 'पोस्टडॉक्टरल फेलो' म्हणून ते सध्या कार्यरत आहेत. 'बॉर्डरलाइन्स' या संकेत-स्थळाच्या शौना रॉड्रिग्ज यांच्याशी साधलेल्या प्रस्तुत संवादामध्ये सूरज यांनी दलित विचारविश्व, दलित चित्रपट व राजकारण यांच्या गेल्या दोन दशकांमधील प्रवासाविषयी बहुआयामी चर्चा केली आहे. कोलंबिया विद्यापीठाने २०१८ मध्ये पहिल्यांदा 'आंबेडकर व्याख्यानमाले'चं आयोजन केलं, तेव्हा या संवादाची सुरुवात झाली. त्यानंतर २०१९ मध्ये दलित चित्रपट महोत्सवावेळी संवादाचा काही भाग पार पडला आणि २०२० मध्ये कोरोनाच्या जागतिक साथीदरम्यान हा संवाद ऑनलाइन स्वरूपात पूर्णत्वास गेला.

इथे एकत्रितपणे हा संवाद प्रकाशित होतो आहे. या मुलाखतीचे चार भाग केले आहेत. आंबेडकरांच्या रूपात चिकित्सक दलित व कृष्णवर्णीय लोकांच्या विचारांचा संयोग कसा होतो, याची चर्चा सूरज यांनी 'आंबेडकरांविषयी' या पहिल्या भागात केली आहे. भारतामध्ये व भारताबाहेर 'दलित' या संज्ञेतून कोणता बोध होतो, यावरही त्यांनी सदर भागात मांडणी केली आहे. 'जात : एक पद्धती' या दुसऱ्या भागामध्ये त्यांनी 'कास्ट मॅटर्स' या त्यांच्या पुस्तकातील बहुचर्चित संकल्पनांसंदर्भात संवाद साधला आहे. तिसऱ्या, 'समकालीन राजकारण' या भागामध्ये त्यांनी दलित-मुस्लिम ऐक्य, पंतप्रधान मोदींचं नेतृत्व आणि भारतातील राजकीय कैद्यांचा प्रश्न याबद्दल मत व्यक्त केलं आहे. 'दलित चित्रपट' या चौथ्या भागामध्ये त्यांनी भारतीय चित्रपटांवर विचार व्यक्त केले असून, दलित चित्रपटांची ताकद आणि 'दलित चित्रपट महोत्सवा'सारख्या मंचांची गरज यांबद्दल प्रतिपादन केलं आहे.

एक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी...

**प्रश्न –** डॉ.आंबेडकर कोलंबिया विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर शतकभराने कोलंबिया विद्यापीठाने पहिल्या 'आंबेडकर व्याख्यानमाले'चं[१] आयोजन केलं. ही व्याख्यानमाला ऐतिहासिक महत्त्वाची आहे, असं तुम्हाला वाटतं का?

– होय, अर्थातच! मला वाटतं, आंबेडकरांना आता उचित न्याय मिळतोय. शंभर वर्षांनी हे घडणंदेखील अतिशय प्रतीकात्मक आहे आणि हा शंभर वर्षांचा काळ भरून काढणं ही आपली जबाबदारी आहे. आंबेडकर १९५६ मध्ये मरण पावले आणि त्यानंतर त्यांच्याविषयी फारसं ऐतिहासिक विश्लेषण झालेलं नाही. त्यांच्याविषयी बहुतांशाने राजकीय अर्थनीतीच्या दृष्टिकोनातून लिहिलं गेलं. या पार्श्वभूमीवर कोलंबिया विद्यापीठातल्या व्याख्यानांमध्ये आम्ही आंबेडकरांच्या राजकीय सिद्धांतांकडे पाहण्याच्या विविध दृष्टिकोनांविषयी चर्चा केली. आम्हाला यातून आंबेडकरांचं व्यामिश्र विश्लेषण समजून घ्यायचं होतं आणि अकादमिक ज्ञानविश्वात न आढळणारे आंबेडकर साकारायचे होते.

**प्रश्न –** आंबेडकरांना जागतिक विचारवंत म्हणून स्थान मिळायला इतका काळ का जावा लागला असेल?

– मला वाटतं, त्यांना बाजूला सारण्यात आलं. मुळात ते अस्पृश्य होते, त्यामुळे त्यांची साधी सावली– किंबहुना त्यांची उपस्थितीच जातीयवादी मनांसाठी विटाळ ठरत होती. जातिव्यवस्थेच्या ठोस रचनेनुसार आंबेडकरांचा जन्म शेतात राबण्यासाठी आणि जमीनदाराच्या घरात कष्ट करण्यासाठी झालेला होता, तीच त्यांची नियती होती. पण त्यांनी तर या सर्व रचनेलाच आव्हान दिलं.

या रचनेला आव्हान देत असतानाच त्यांनी सदिच्छेचे राखणदार असल्याचा दावा करणाऱ्या लोकांनाही आव्हान दिलं. गांधी, जीना आणि तत्सम मंडळींचा दंभस्फोट त्यांनी केला; तसंच हिंदू महासभा व पुराणवादी, सनातनी गटांवरही हल्ला चढवला. त्यांचे विचार समजून घेताना आपण त्यांच्या आसपासच्या लोकांचाही विचार करणं गरजेचं आहे. या लोकांचा संपन्न वारसा व परंपरा त्यांना लाभल्या होत्या. आंबेडकर काहीएक मांडणी करतात, तेव्हा ते स्वतःच्या उपस्थितीची ऐतिहासिकता स्पष्ट करून सांगत असतात आणि मोडून पडलेल्या जमातींबद्दल ते बोलत असतात. अस्पृश्यता कशी उदयाला आली, याचा सिद्धांत त्यांनी आपल्यासमोर मांडला. इथे (कोलंबिया विद्यापीठात) त्यांनी त्यांचा अभिजात प्रबंध[२] लिहिला, जातीविषयीचं ते एक प्रभावी विधान आहे आणि अनेक लोकांना ते अजूनही स्वीकारता आलेलं नाही.

या सगळ्या कारणांमुळे अकादमिक विश्वातला त्यांचा प्रवेश कोणीही खिशात घालावा, अशा लुंग्यासुंग्यासारखा नव्हता. ते ज्या लोकांचं प्रतिनिधित्व करत होते, अशा लोकांची विशिष्ट साचेबद्ध हास्यचित्रं उभी केली जातात; पण आंबेडकर त्या चित्राला छेद देणारे होते. यामुळे त्यांची उपस्थिती अकादमिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि आंतरवैयक्तिक संबंधांच्या पातळीवरसुद्धा धोकादायक ठरते.

इतका काळ का गेला, ते कोलंबियाला विचारा. कोलंबिया विद्यापीठाने दलितांकडे काणाडोळा केला. आंबेडकर इथे आले तसे आणखी दलित यावेत, यासाठी निश्चित दिशेने प्रयत्न व्हायला हवे होते. कोलंबिया विद्यापीठासारख्या अवकाशांनी मान्यता दिली असती, तर आम्हालाही आंबेडकरांच्या बौद्धिक कारकिर्दीच्या जवळपास जायचा प्रयत्न करणारी कामगिरी करता आली असती. पण कोलंबिया विद्यापीठाच्या अटी स्वार्थी होत्या आणि पौर्वात्य विद्याशाखांच्या प्रतिनिधित्वाचा दावा करणारे– मुख्यत्वे ब्राह्मण– लोकही स्वार्थीच होते.

उदारमतवादी लोकशाहीची चिकित्सा करणारे आंबेडकर पौर्वात्य आणि युरो-अमेरिकी प्रकल्पांसाठीही अडचणीचे ठरतात. अतिसंसदीय लोकशाहीसमोर ते प्रश्नचिन्हं उपस्थित करतात. ते स्पष्टपणे समाजवादी होते; पण आपण गरीब व पिचलेल्यांच्या अधिकारांचे पाठीराखे असल्याचा झेंडा ते सगळीकडे मिरवत राहिले नाहीत. आणि आपण कोणाचे तरी रक्षणकर्ता आहोत, अशा बंदिस्त व्याख्यांमध्ये त्यांना स्वतःला अडकवून घ्यायचं नव्हतं. ते त्या पलीकडे जातात आणि मग ते धर्माची धुरा हाती घेतात. अशा प्रकारच्या अंतिम उद्दिष्टामुळे त्यांना एका विशिष्ट कप्प्यात बसवणं अवघड जातं. ते तुमचेही नसतात किंवा दुसऱ्याही कोणाचे नसतात. ते त्यांच्या लोकांसाठी उभे आहेत आणि असे उभे ठाकलेले आंबेडकर अत्यंत खरेखुरे आहेत.

**प्रश्न –** 'द रॅडिकल इन आंबेडकर'[३] या पुस्तकाबद्दल आम्हाला काही सांगाल का?

– आंबेडकरांची १२५ वी जयंती जगभर साजरी होत

होती, तेव्हा या प्रकल्पाची सुरुवात झाली. दलितांचा तिरस्कार करणारी राज्यसंस्था आंबेडकरांवर मालकी सांगते– किंबहुना, ती आंबेडकरांवर प्रेम करत असल्यासारखं दिसतं. याचं काय करायचं, हा प्रश्न मला छळत होता. याला कॉर्नेल वेस्ट यांनी 'आंबेडकरांचं सुगंधीकरण' किंवा 'आंबेडकरांचं सँटाक्लॉजीकरण' असं संबोधलं आहे. यात सँटाक्लॉज येतो नि भेटवस्तू देऊन निघून जातो, पण अधिसत्तेला प्रश्न विचारत नाही; त्यामुळे त्याचा भपकेबाजपणा तेवढा दिसतो. आम्हाला असं अर्थातच नको होतं.

या उद्देशाने आम्ही या क्षेत्रातील अभ्यासकांशी– विशेषतः तरुण दलित अभ्यासकांशी– संपर्क साधला. या क्षेत्रातल्या अनेक जान्यामान्या व्यक्तींशी आम्ही संपर्क साधला. राजकीय सिद्धांत लिहिताना किंवा कोलंबियासारख्या ठिकाणी शिकवताना आपण आंबेडकरांकडे दुर्लक्ष केलं, ही वस्तुस्थिती समजून घेण्याची संधी निवृत्तीच्या जवळ आलेल्या अनेकांना या निमित्ताने मिळणार होती.

आम्हाला आंबेडकरांना एखाद्या बौद्धिक घेट्टोपुरतं बंदिस्त ठेवायचं नव्हतं; उलट, एक विचारवंत म्हणून आंबेडकरांची तपासणी लोकांनी करावी, अशी आमची इच्छा होती. अशी अडीच वर्षांची निर्मितिप्रक्रिया पार पडल्यावर 'रॅडिकल इन आंबेडकर' पुस्तक तयार झालं. तो प्रवास आनंददायी होता. शिवाय, प्रदेश अभ्यास (एरिया स्टडीज्)– उदाहरणार्थ, आंबेडकर व आफ्रिका– विस्तारण्याचीही माझी इच्छा होती. 'आंबेडकर आफ्रिकेशी संवाद साधू शकतात का?' असा प्रश्न विचारणारं एक प्रकरणही आमच्या पुस्तकात आहे. स्वातंत्र्यसंघर्ष आणि त्या संदर्भात लोक कोणकोणते तोडगे शोधतात, यामध्ये आम्हाला जास्त रस होता. आम्हाला केवळ आंबेडकरांची गौरवगाथा काढायची नव्हती; त्यांची चिकित्सक तपासणी व्हावी, अशी आमची इच्छा होती. पण हे केवळ पहिलं पाऊल होतं. त्या तपासणीमध्ये सुधारणा करणं, हे दुसरं पाऊल.

**प्रश्न –** आंबेडकर व आफ्रिका यांचा एकत्रित विचार कसा करता येईल किंवा भारताबाहेरचे विचारवंत व चळवळी यांच्याशी संवादी ठेवून आंबेडकरांच्या राजकीय विचाराचा विस्तार कसा करावा, याबद्दलची चर्चा गेल्या काही दशकांमध्ये अधिकाधिक जोरकसपणे होताना दिसते आहे. दलित व चिकित्सक कृष्णवर्णीय यांच्या विचारांचा मीलनबिंदू म्हणून आंबेडकरांकडे कसं पाहावं?

– काळ्या लोकांच्या संघर्षाच्या प्रश्नाशी आंबेडकर झगडताना दिसतात.[४] वासाहतिक साम्राज्याकडे त्यांनी गोऱ्यांच्या नजरेने पाहिलं नाही. काळ्या लोकांचे दस्तावेज व संघर्ष यांचा आधार ते निश्चितपणे घेतात. अमेरिकेतील काळ्या लोकांचा संघर्षदेखील आंबेडकरांची दखल घेतो आहे. कारण जिथे प्रकाशाचं अस्तित्वच नाही, काहीच तळपणं शक्य नाही, अशा कृष्णविवरामध्ये हा माणूस तळपताना दिसतो. आंबेडकर स्वतःला तिथे बंदिस्त ठेवत नाहीत, ते त्या पलीकडे जातात. अशा वेळी ते दक्षिण आफ्रिकेतील संघर्षाचा संदर्भ घेताना दिसतात. अमेरिकेतल्या काळ्या लोकांच्या संघर्षाचाही संदर्भ ते घेतात. जगभरातून लोक आंबेडकरांची भेट घेत असत. जपानमधील कथित अस्पृश्य ठरलेला समूह बुराकुमिन, त्यांचे नेते जिचिरो मात्सुमोटो यांना आंबेडकर माहीत होते आणि भविष्यातील व्यूहरचनांची चर्चा करण्यासाठी ते आंबेडकरांना भेटल्याचं दिसतं.[५]

काळ्या बौद्धिक विचारविश्वात काय सुरू आहे, हे समजून घेण्यात आंबेडकर बराच रस घेतात. त्यांनी ड्यू बोय यांना १९४६ मध्ये पत्रही लिहिलं होतं [६] आणि ड्यू बोय यांचं सर्व लेखन आपण वाचल्याचंही त्यात नमूद केलं होतं. हे अतिशय महत्त्वाचं आहे. त्या वर्षी ड्यू बोय यांनी नुकतीच 'एनएएसीपी'च्या (नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेन्ट ऑफ कलर्ड पीपल : वांशिक भेदभावाचं निर्मूलन करणं आणि राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक अधिकारांमधील समता साधणं– या उद्देशाने अमेरिकेत १९०९ मध्ये स्थापन झालेली संस्था) नेतृत्वाची धुरा खाली ठेवली होती. त्यांचं 'द सोल्स ऑफ ब्लॅक फोक' [७] पुस्तक प्रकाशित होऊन ४० वर्षं झाली होती. ड्यू बोय यांनी 'हार्लेम'बद्दल (काळ्या लोकांची घेट्टोसदृश वस्ती) लिहिलं, काळ्या शरीराची कला व सौंदर्यीकरण याबद्दल लिहिलं. ते धर्माकडे पाठ फिरवत होते.

काळा (ब्लॅक) व दलित या कोटींच्या (कॅटेगरी) मीलनबिंदूचा संकल्पना म्हणून विचार करणं शक्य आहे. पण याचा सांकल्पनिक विचार करत असतानाच आपण या समुदायांच्या कामगिरीचा अनुभवजन्य पुरावादेखील लक्षात घ्यायला हवा. त्याला ऐतिहासिक आधार द्यायला हवा. काय घडलं याच्या याद्या इतिहासकारांनी आपल्याला दिलेल्या आहेत, पण या दोन समुदायांची तुलनात्मक परिप्रेक्ष्यातून ऐतिहासिक मांडणी पुरेशी झालेली नाही.



यासाठी गंभीर सैद्धान्तिक विचार गरजेचा आहे.

द्यू बोय यांनी १८९७ मध्ये केलं त्याप्रमाणे आंबेडकरांनीही वांशिक तर्क नाकारला. जात आणि वंश हे पूर्वग्रहदूषित गट असल्यामुळे ते एकत्रितरीत्या कार्यरत असू शकतात, हा विचार स्वीकारण्याबाबत ते इच्छुक दिसत नाहीत; पण ते आपल्याला मुक्तिदायी राजकारणापलीकडे कुठे तरी नेत होते.[८] ते ऐतिहासिक नियमांच्या उच्चाटनासाठी मशागत करू पाहत होते. आपण आंबेडकरांचं लेखन वाचतो, तेव्हा त्यांच्यासमोरची ही बहुविध उद्दिष्टं लक्षात ठेवणं गरजेचं आहे. अशा प्रकारे काळा विचार विभिन्न संदर्भांना आकर्षित करणारा कसा ठरू शकतो, हे आपल्याला दिसतं. इसाबेल विल्करसन, कॉर्नेल वेस्ट, केव्हिन ब्राउन यांच्यासारख्या आंबेडकरांचं लेखन वाचणाऱ्या अनेक आफ्रिकी-अमेरिकी विचारवंतांनी, मान्य केलं आहे. मी पदवीचा अभ्यास करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला गेलो, तेव्हा माझा मुख्य उद्देश हादेखील होता.

**प्रश्न –** दलित या संज्ञेबद्दल भारताबाहेर असलेली समजूत आणि भारतीय राजकारणामधील या संज्ञेची प्रस्तुतता यात काही भेद आहे का?

– भारतामध्ये नि भारताबाहेरसुद्धा दलित या संज्ञेचा एकच अर्थ लावला जातो, असं मला वाटतं. दलित ही मुक्तिदायी कोटी आहे. ती काही अचल स्वरूपाची संज्ञा नाही. कोटींमध्ये संयुक्त स्वरूपाचं एक जग असतं आणि त्याला वैश्विक आवाहकता असते. दलित ही काही अंकित स्वरूपाची कोटी नाही. ती अधीन नाही, असहाय नाही, मरू घातलेली नाही आणि ती जुलूमशहालाच तेवढं समस्या म्हणून पुढे करत नाही. दलित ही कोटी व्यक्तिगत गतकाळांपुरती मर्यादित राहत नाही, तर जातीयवादी राजवटींखाली दबलेल्या लोकांना एकत्र आणते. जगभरातील दडपलेल्यांना एकत्र आणू पाहणारं आवाहन 'दलित' या कोटीतून केलं जातं.

दलित पँथरने केलेल्या दलित या शब्दाच्या व्याख्येमध्ये स्त्रिया, भूमिहीन शेतमजूर, जगभरातील दडपले गेलेले लोक यांचाही समावेश होता. धार्मिक उतरंडींनी दडपल्या गेलेल्यांसाठी दलित हा शब्द वापरला जावा, अशी या व्याख्येमधील अट होती. ज्यू धर्म असो, युरोपीय ख्रिस्ती धर्म असो, इस्लाम असो, की भारतातले धर्म असोत- धार्मिक कलहातून आधुनिक-प्रबोधनोत्तर काळात मानवता अस्तित्वात आली. दलित या शब्दाचा अर्थ प्रेम, काळजी, आदर असाही होतो. अस्पृश्यांना आदर नि प्रतिष्ठा दिली गेली नाही. आमचा संघर्ष आदर व प्रतिष्ठेसाठी आहे. स्वतःच्या ॲकॅडमिक कामगिरीच्या खुणा मिरवतानाही आपण ॲकॅडमिक लोकांच्या पायाशीच असतो. 'दलित' ही कोटी आपल्याला त्या पलीकडे जाऊन संवाद व चर्चेला

वाव देते. जुलूम करणाऱ्या लोकांशी संवाद करणं गरजेचं आहे. आम्हाला संवाद साधता आला नाही, तरी आम्ही आमचा संघर्ष थांबवणार नाही.

आमच्या आजी-आजोबांनी आमच्यात रुजवलेल्या थोर प्रेमाच्या तत्त्वज्ञानाची तत्त्वं- विशेषतः अत्यंत नाजूक क्षणी प्रेमाची देवाण-घेवाण करण्याचं तत्त्व- आम्ही मानतो. अशा प्रकारच्या प्रेमाच्या भाषेकडे आणि मानवतेसाठी त्याचा अर्थ काय आहे याकडे जगाचं लक्ष वेधणं म्हणजे दलित. हजारो वर्षांचा जुलूम, बलात्कार, शरीरांची विटंबना या सगळ्यावर आपण एके दिवशी मात करू, अशी आशा आपल्याला वाटते, त्यामुळे दलित ही कोटी जुलूम करणाऱ्यांशी संवाद साधते. स्वातंत्र्यासाठी गरजेची असणारी मोकळी हवा दलितांना लाभत नाही- ते परावलंबित्वाच्या नि बंधनाच्या हवेत श्वासोच्छ्वास करत राहतात आणि तरीही स्वतःचं सुजाणपण जपतात. आपण कालबाह्य प्रारूपांच्या पलीकडे जाणं गरजेचं आहे, हे आपण जगाला सांगायला हवं.

आंबेडकर याचंच प्रतिनिधित्व करतात. हे पुरेसं जहाल नाही, असं लोक म्हणत असतात. पण बंदुका घेऊन सगळ्यांवर बॉम्बफेक करत राहण्याचा विचार आपण केला, तर ते बुद्धाच्या जहाल विचाराविरोधात नि क्रांतिविरोधात जाणारं असेल. अशाने युद्धाचं नेतृत्व न करता युद्ध लावून दिल्यासारखं होतं.

**प्रश्न –** आंबेडकरांवरील प्रकल्प आणि आंबेडकरांचे प्रकल्प कृतिशील चळवळीपासून वेगळे मानता येतील का? विशेषतः जागतिक आस्थाविषयांशी जोडलेल्या प्रकल्पांबद्दल असं मानणं शक्य आहे का?

– नाही. आंबेडकर म्हणजे काही प्रचंड निधी आणि उदार आश्रयदातृत्वाच्या आधारे आरामखुर्चीत बसून पुस्तकांचं उत्पादन करत राहणारे अभ्यासक नव्हते. आंबेडकरांचं लेखन म्हणजे भावनांचं लेखन आहे. मंदिरप्रवेशासाठी लोकांच्या मोर्चाचं नेतृत्व करत असताना आंबेडकर ज्ञानाचं उत्पादन करत होते. दिल्ली किंवा मनमाडमध्ये कामगारांचं नेतृत्व करत असताना आंबेडकरांचं ज्ञान मांडलं जात होतं. मजूर पक्षासोबत ते शोषित लोकांना साथ द्यायला उभे असताना त्यांचं ज्ञान निपजत होतं. नागपूरमध्ये १९४० मध्ये झालेल्या अनुसूचित जातीय महिला परिषदेमध्ये स्त्रियांना संघटित करत असताना आंबेडकर ज्ञाननिर्मिती करत होते. आंबेडकरांच्या वाङ्मयातला प्रत्येक शब्द गतिमानता दाखवतो. त्यांचं लेखन स्थिर व कुंठित नाही. त्यांचं लेखन वाचताना त्यांच्या सोबत सायकलवर बसून चालल्यासारखं वाटतं. ते आपल्याला त्यांच्यासोबत कुठे तरी प्रवासाला, विचारांच्या सान्निध्यात घेऊन चाललेले असतात. याचा अनुभव घेत असतानाच पुढे जात राहणं, हे वैशिष्ट्य आंबेडकरांच्या लेखनात आहे. सिद्धांताच्या मार्क्सवादी आर्थिक अर्थनिर्णयनाचा ते शोध घेतात, आपल्याला काय म्हणायचं आहे आणि आपली कशाशी असहमती आहे याचं स्पष्टीकरण ते जगासमोर मांडतात. ते बुद्धाच्या कोणत्याही सनातनी अर्थबोधाहून अधिक बौद्धविचारी होते. ते मूलतः युद्धभूमीचं प्रतिनिधित्व करतात- त्यात शत्रूवर नेम धरून असणाऱ्या सैनिकावर नजर रोखलेली असते. निष्ठूरता, धमक्या व हिंसाचाराची टांगती तलवार यांना सामोरं जात असतानाही आंबेडकरांनी स्वतःच्या लोकांकडून त्यांना मिळालेली शहाणीव कृतीत उतरवून दाखवली.

**प्रश्न –** हे खूप चांगलं उत्तर आहे; यात आंबेडकरांचं त्यांच्या लोकांमधलं स्थान स्पष्ट करत असतानाच, ब्राह्मणी राष्ट्रवादाबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. दलितांच्या आत्म-प्रतिपादनांशी व्यापक असहमती दर्शवण्याचं काम या राष्ट्रवादाने केलं. आंबेडकर वसाहतवादविरोधी असतानाही राष्ट्रवादाची चिकित्सा कशा रीतीने करतात?

– आंबेडकर ऐतिहासिक गुन्ह्यांच्या नोंदी करत होते. या गुन्ह्यांच्या याद्याच ते तयार करत होते. त्यांना जॉन डुईच्या विचारांची सखोल जाण होती. ऐतिहासिक गुन्ह्यांसंदर्भातील या विचारप्रक्रियेला ते भविष्याच्या अनुषंगाने वळण देऊ पाहतात. ते युरोपीय राजवटींचीही चिकित्सा करतात. युरोपीय विचारवंतांनी केलेल्या प्रयत्नांना दाद देत असतानाच आंबेडकर त्यांना उत्तरदायीदेखील ठरवत असल्याचं त्यांच्या लेखनातून दिसतं. मार्क्ससारख्या काही आघाडीच्या विचारवंतांना त्यांनी उत्तरदायी ठरवल्याचं दिसतं आणि त्यांच्यावर ते टीकाही करतात. ब्रिटिश राजवट भारतीयांना महायुद्धात ढकलत होती, म्हणून या राजवटीवर आंबेडकरांनी टीका केली. त्यांना हे स्वीकारार्ह वाटत नव्हतं. त्यांनी लंडनला जाऊन चर्चिल यांनादेखील हे सांगितलं. तर, भारतामध्ये संरचना आणि संस्कृती अशा दोन्ही पातळ्यांवर होणाऱ्या अवनतीच्या सूक्ष्म रूपांवर ते हल्ला चढवतात. परंतु, अखेरीस नाझी जर्मनीविरोधातील युद्धाला त्यांनी पाठिंबा दिला.

साम्राज्यवादी आणि राष्ट्रवादी अशा दोघांवरही आंबेडकर टीका करत असल्यामुळे त्यांच्यावर सहजपणे वसाहतोत्तर विचारवंत म्हणून शिक्का मारणं शक्य होत नाही. आंबेडकर विविध गोष्टींबद्दल बोलत असल्यामुळे इतर याद्यांचा शोध अभ्यासकांना घ्यावा लागतो. खरं म्हणजे, आता 'वसाहतोत्तर' ही संकल्पनाच बरीचशी कालबाह्य झालेली आहे, त्याऐवजी 'चिकित्सक दलित सिद्धांत' (क्रिटिकल दलित थिअरी) असा शब्दप्रयोग करायला हवा. आंबेडकरांचा अर्थ लावताना केवळ एकच ध्येय व एकच लक्ष्य विचारात घेतलं, तर त्यांच्यावर काहीसा अन्याय केल्यासारखं होईल. यात अनेक अंतर्विरोध आहेत. एक विशिष्ट गोष्ट साध्य करणं हा आंबेडकरांच्या शोधप्रवासाचा उद्देश नाही, तर आत्तापर्यंत झालेली प्रत्येक चूक दुरुस्त करून तो विषम भवितव्याच्या दिशेने जाणं– हा उद्देश आहे. आपल्याला ताठ मानेने उभं राहून एकमेकांसह जगता यावं, यासाठी त्यांनी संविधानामध्ये समतोल दृष्टी असावी, असा आग्रह धरला.

हे स्वातंत्र्योत्तर काळातल्या नवउदारमतवादी राजवटीलाही स्वीकारार्ह वाटलं नाही, कारण त्यांना लोक विशिष्ट चौकटींमध्येच बंदिस्त ठेवायचे होते. नवउदारमतवादाने जमातीय युद्धांद्वारे स्वतःची धोरणं राबवली. आंबेडकरांनी यावर सातत्याने प्रश्नचिन्हं उपस्थित केली आहेत. आंबेडकरांच्या वतीने बोलत असल्याचा दावा करणाऱ्या इतर विचारांना या टप्प्यावर आपण नाकारणं गरजेचं आहे.

**प्रश्न –** आंबेडकरांसोबतचा तुमचा प्रवास तुमच्या ॲकॅडमिक मार्गक्रमणेसाठी कितपत महत्त्वाचा राहिला?

– मी एका दलित झोपडपट्टीमध्ये वाढलो. एका टप्प्यावर ती वसाहत झोपडपट्टी नसून 'दलित हार्लेम' असल्याचं मला जाणवलं. नव्या ठिकाणी येऊन तुमचं विश्व निर्माण करणं– तुमची संस्कृती, कला, कुटुंब व नातेसंबंधांचे अर्थ, तुमची अर्थव्यवस्था रुजवणं– यातून आलेली हिंसा, इत्यादी तिथे होतं. वस्तीत आंबेडकरांचं नाव घरोघरी घेतलं जात असे आणि ते अजूनही आमचे उत्तुंग मार्गदर्शक राहिले आहेत. त्यांच्यामुळे आम्हाला व्यापक आंबेडकरी राजकारणाबद्दल विचार करण्याची शिस्त लागली. शिवाय, सावित्रीबाई फुले होत्या. त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केलंच, शिवाय आमच्यावर प्रेम केलं, आमचं संगोपन केलं. ग्रामीण–निमशहरी झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या दलित स्त्रियांना श्रेय द्यायला हवं. दलित स्त्रियांचं प्रेम, त्याचप्रमाणे दलित पित्यांचं प्रेम, यामुळे हा समुदाय अतिशय दृढ नात्याने बांधला गेला आहे. एकावर केलेला हल्ला हा तिथे सर्वांवर केलेला मानला जातो. दलितांनी स्वतःसाठी एक सुरक्षित अवकाश हक्काने मिळवलेला आहे, पण अंतर्गत हाणामारीसुद्धा होते. अगदी ओबडधोबड पातळीवर हे घडताना मी स्वतः पाहिलेलं आहे.

अशा वातावरणात मी वाढलो. अतिशय मोहवणारं आणि जिवंतपणा असलेलं वातावरण होतं. दररोज सकाळी विहारांमधून आंबेडकरी गीतं– आंबेडकर–बुद्ध–भीम गीतं– लावली जात. विठ्ठल उमप, प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे आणि अशा अनेकांनी उत्कृष्टरीत्या गायलेल्या या गाण्यांमधूनही मला मार्गदर्शन मिळालं. माझ्या अनुभवांमागची राजकीय ऊर्जा या गाण्यांमधून मिळाली. आधुनिक तंत्रज्ञानीय भाषेत ज्याला 'स्व' असं म्हणतात, त्याची जडण–घडण यातून झाली.

आंबेडकरांच्या लेखी कृतिशील तत्त्वज्ञानाला प्राधान्य होतं. अनेक लोक आधी तत्त्वज्ञानाकडे जातात आणि मग सिद्धांतांचं उपयोजन करतात. आम्हाला ही चंगळ परवडणारी नव्हती. आमच्यासमोर समस्या उभ्या ठाकत; तेव्हा आंबेडकरांनी अमुक केलं होतं, असा दाखला देणारा उतारा आम्ही पाहतो आणि 'अरे! खरंच?' असं म्हणतो. आम्हाला चिकित्सक होण्यासाठीची चौकट आंबेडकरांनीच पुरवली आणि आंबेडकर अधिकाधिक आमच्यात उतरावेत यासाठी आम्ही त्यांच्याबद्दलही चिकित्सक असायला हवं. आंबेडकर माझ्यासाठी अगदी सहजपणे बोलतात. जवळपास प्रत्येक दलित व्यक्ती आंबेडकरांकडे स्वतःच्या ताकदीवर उभा असलेला आदर्श म्हणून पाहते– दलित कोणत्याही धर्मात गेलेले असले तरी त्यांनी हे नातं टिकवलेलं आहे. त्यामुळेच सक्षम बौद्ध नीतिमत्ता असलेलं इहवादी व्यक्तिमत्त्व म्हणून आंबेडकर टिकून आहेत. म्हणूनच ॲकॅडमिक विश्वाने त्यांची अधिक दखल घ्यायला हवी. आमचा शोधही त्याच दिशेचा आहे. या आघाडीवर कोलंबिया विद्यापीठाने निराशाजनक कामगिरी केली आहे.

**प्रश्न –** हिंदू उजव्या विचारसरणीच्या लोकांनी आणि हिंदू उजवे नसलेल्यांनी आंबेडकरांचा अपहार केल्याबद्दल तुम्ही भाष्य कराल का? विभिन्न हितसंबंध पुढे नेण्यासाठी आंबेडकरांचा वापर कसा होतो?

– वैश्विक मूल्यांबद्दल बोलणाऱ्या विचारवंतांची भुरळ

अशीच असते; कारण वैश्विक मूल्यं कालावकाशामध्ये बंदिस्त नसतात, ही मूल्यं चौकटीबाहेरच्या खुणा वापरतात. आंबेडकरांची वैश्विक मूल्यं कायमच उपलब्ध होती, पण जातीयवादी ॲकॅडमिक विश्व त्यांच्यापर्यंत पोचलं नव्हतं. आंबेडकर अल्पसंख्याकांच्या अधिकारांविषयी, भारतातील राजकीय पक्षांच्या निर्मितीविषयी, सामाजिक व कायदेशीर न्यायाविषयी, आर्थिक अवकाशाविषयी आणि राष्ट्राच्या विकासाविषयी बोलत होते. त्यांनी प्रतिनिधित्वाबद्दल, अनुसूचित जाती आयोगाच्या निर्मितीबद्दल, संविधान–निर्मितीबद्दल आणि अखेरीस बौद्ध धर्माबद्दल लिहिलेलं आहे. आज डुईविचाराच्या मंडळींना 'आंबेडकर डुईविचाराचे होते' असा दावा करायचा असतो, बौद्धांना 'आंबेडकर बौद्ध होते' असा दावा करायचा असतो, मार्क्सच्या अभ्यासकांना आंबेडकरांमधल्या मार्क्सवाद्यावर हक्क सांगायचा असतो आणि तत्त्वज्ञांना आंबेडकरांमधला कान्टवादी हवा असतो; तर काळ्या विचाराच्या अभ्यासकांना आंबेडकरांचं ज्ञानशास्त्र काळ्या विचाराकडे कललेलं असल्याचा दावा करायचा असतो. यामुळे– विशेषतः ते मानवी दडपणुकीच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करत असल्यामुळे– आंबेडकर अनेकांना उपलब्ध होतात. इथे 'मानवी' या शब्दावर मला जोर द्यायचा आहे, कारण आंबेडकरांनी नमूद केल्याप्रमाणे, दडपशाही मानवी किंवा निम्न–मानव मानल्या जाणाऱ्यांपलीकडेही जाते. मानवासाठीच्या या अनन्य सूत्राचा त्यांनी दंभस्फोट केला आणि निम्न–मानवांना नव्याने मानव मानता येईल, अशा रीतीने त्यांनी स्वतःची भूमिका उभारली.

इथे उजव्यांचेही हितसंबंध आहेत आणि डाव्यांचेही आहेत. आंबेडकरांच्या वाटेला गेल्यावर ती वाट संपत नाही. ब्राह्मण्याच्या प्रकल्पाला दलितांकडून आव्हान मिळण्याची शक्यता असल्यामुळे उजव्यांना आंबेडकरांवर हक्क सांगायचा असतो. उजव्यांना दलितांशी लढणं शक्य नसेल, तर ते त्यांना स्वतःमध्ये सामील करून घेण्याचा प्रयत्न करतात. दलितांचं ठोस प्रतिपादन चिरडणं शक्य नसल्यामुळे उजव्यांनी त्यांच्या शत्रूलाच त्यांचा सर्वांत घनिष्ठ मित्र करून टाकलं आहे. डाव्यांनाही आंबेडकरांचा अपहार करायचा असतो, कारण दलित त्यांच्या प्रकल्पासाठीही धोकादायक असू शकतात, हे डाव्यांना कळलं आहे. भारतामध्ये डावी चळवळ दलितांच्या आधारे उभारली गेली.

कामगारवर्ग, मजूर, शेतकरी व कष्टकरी जनता कोण आहे? त्यांना जात आहेच की! दलित लढायला तयार असतात– तुम्ही त्यांना कोणताही रंग द्या किंवा कोणत्याही कप्प्यात घाला, तिथे तुम्हाला विद्रोह दिसेल; हेच दलितत्वाचं सार आहे. त्यांनी स्वतःचा कलंक समर्पित करून आंबेडकरांना जगापुढे नेलं. व्यापक जनतेला आंबेडकरांचा आदर्श उपलब्ध झाला, यामागे दलितांचा त्याग आहे. दलित कवी, आत्मचरित्रकार, कलावंत, मंचीय कलाकार, भीमगीतं गाणारे गायक आणि आंबेडकरांवर मुख्य लक्ष केंद्रित केलेले– अशा प्रति–सांस्कृतिक अवकाशालाही याचं श्रेय द्यायला हवं.

(भाग २ व ३ पुढील दोन अंकांत)

अनुवाद : प्रभाकर पानवलकर

**सूरज येंगडे,** अमेरिका

suraj.yengde@gmail.com

**टिपा :**

1. https://icls.columbia.edu/events/inaugural-ambedkar-lectures-global-ambedkar/
2. Castes in India- http://www.columbia.edu/itc/mealac/pritchett/00ambedkar/txtšambedkaršcastes.html
3. The Radical in Ambedkar : Critical Reflections, Edited by Suraj Yengde and Anand Teltumbde, Penguin Books, October 2018.
4. Race and Caste Matters : International Connections- https://www.youtube.com/watch?v=IWhtmLivT8s
5. At Japan Convention, Dalit and Burakumin People Foge Solidarity- https://thewire.in/caste/at-japan-convention-dalit-and-burakumin-people-forge-solidarity
6. Letter from B. R. -mbedkar to W. E. B. Du Bois, ca. July 1946- https://credo.library.umass.edu/view/full/mums312-b109-i132
7. The Souls of Black Folk, W. E. B. Du Bois- https://www.gutenberg.org/files/408/408-h/408-h.htm
8. On Global Caste and Blackness- https://www.youtube.com/watch?v=7lRmVudZmnI

'बॉर्डरलाइन्स' या संकेतस्थळावर २३ नोव्हेंबर २०२० रोजी प्रकाशित झालेल्या शौना रॉड्रिग्ज यांनी घेतलेल्या मुलाखतीचं हे मराठी भाषांतर आहे. इंग्रजीतील मुलाखतीचा दुवा : https://www.borderlines-cssaame.org/posts/2020/11/23/dalit-is-the-new-political-and-epistemic-horizon-an-interview-with-suraj-yengde

लोकशाहीची वाटचाल :
जागतिक आव्हानाचा क्षण?

सुहास पळशीकर

# लोकशाहीचा अर्थ समजून घेण्याच्या दिशा

(भाग एक)

इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ.श्रद्धा कुंभोजकर, या कार्यक्रमाचे अध्यक्ष असलेले माझे मित्र प्राध्यापक राजा दीक्षित, यानिमित्ताने जवळपास आठ-दहा महिन्यांनंतर विद्यापीठाच्या परिसरामध्ये आल्यानंतर समोर बसलेले या इतिहास विभागातील काही संशोधक व माझे सगळे प्राध्यापक मित्र आणि या कार्यक्रमाला ठिकठिकाणांहून उपस्थित असलेले सर्व जण...

सर्वप्रथम इतिहास विभागाचे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मी आभार मानतो. लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानानिमित्त मला निमंत्रित केले आणि या विषयावर व्याख्यान द्यायला सांगितले, यासाठी मी त्यांचा मनापासून आभारी आहे. हे व्याख्यान देत असताना जी जोखीम आहे, तिची मला जाणीव आहे. याचं कारण असं की, तुम्ही ऐकणारे अनेक जण जे मला अदृश्य आहात. त्यातले अनेक जण इतिहासाचे विद्यार्थी असतील, प्राध्यापक असतील, अभ्यासक असतील अशी शक्यता आहे. त्यामुळे या भाषणादरम्यान मी इतिहासाच्या कोणत्या चुका करतो, याची यादी करायला कदाचित एव्हाना तुम्ही उत्सुक असाल. मी इतिहासाचा विद्यार्थी नाही, राज्यशास्त्राचा आहे. राज्यशास्त्र हा एकूण विषयच जणू काही लोकशाहीभोवती रचलेला आहे, असं आपण मानलं; तर राज्यशास्त्राकडे आणि म्हणून प्रचलित व जुन्या राजकीय प्रक्रियांकडे कसं पाहता येईल, हे पाहण्याचा मी प्रयत्न करत असतो. आता मी जे बोलणार आहे, ते त्याच दृष्टिकोनातून. आताच्या भाषणाचं दडपण असण्याचं दुसरं कारण अर्थातच स्वाभाविक आहे. ते असं की, डॉ.श्रद्धा कुंभोजकर म्हणाल्या त्याप्रमाणे एका दिग्गजांच्या स्मृतीसाठीचं हे व्याख्यान आहे. आणि त्यांनीच मुद्दाम मला याची जाणीव करून दिली की, याआधी त्या व्याख्यानाला अनेक मोठ्या लोकांना त्यांनी बोलावलेले आहे; आता त्यांच्यावर मला बोलाविण्याची वेळ आली आहे!

> फुले आणि टिळक यांच्यामध्ये नेमका फरक कुठे येतो? तर फुल्यांच्या हे लक्षात येतं की, व्यक्तींना व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतरच लोकशाहीची सुरुवात आपल्याला करावी लागेल. याउलट, लोकमान्य त्यांच्यानंतरच्या काळात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला परकीय सत्तेविरुद्ध लढण्यासाठी व लोकांची शक्ती इथं उभी करण्यासाठी 'लोक' नावाचा एक समुदाय इथं उभा करतात; पण त्यासाठी व्यक्ती हे एकक आधी घडवणे त्यांना आवश्यक वाटत नाही. या दोन मुद्द्यांचा उल्लेख मी अशाकरता करतो की, त्यामुळे लोकशाही ही एकाच रस्त्याने जाते आणि तिची तोंडओळख करून घेत असताना फक्त व्यक्ती म्हणजे काय व व्यक्तींचे अधिकार म्हणजे काय, अशा क्रमानेच आपण जायला पाहिजे असं नाही.



जॉन स्टुअर्ट मील



थॉमस पेन

अलीकडे लोकमान्यांच्या मृत्यू शताब्दीच्या निमित्ताने लोकसत्ताच्या एका विशेष अंकामध्ये मी जे लिहिलेले आहे– तो धागा जर तुम्ही लक्षात घेतलात, तर लोकमान्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान द्यायला मी अगदीच चुकीचा माणूस नाही, इतपत विश्वास तुम्हाला वाटू शकेल. ते असं की– विसाव्या शतकामध्ये भारतामध्ये महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून, अखख्या भारतामधील लोकांना संघटित करून लोकशाही नावाची गोष्ट देशात आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या काही मोजक्या दूरदृष्टी असलेल्या नेत्यांमध्ये लोकमान्यांचा समावेश होतो. त्यांची लोकशाहीची कल्पना मर्यादित होती का– याबद्दल नक्कीच चर्चा होऊ शकते. पण आज मी लोकमान्यांबद्दल बोलणार नाही; तर यानिमित्ताने लोकमान्यांनी या देशामध्ये लोकशाहीच्या ज्या कामाला सुरुवात केली तीच लोकशाही जगभरात कशी वाढली, विस्तारली आणि तिचं आता काय झालं आहे, काय होतं आहे याचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

**सतत विस्तारणारा अर्थ**

लोकशाहीचा हा आढावा अवघड आहे. याचं कारण असं की, मुळात लोकशाही हा विषय सगळ्यांना एका अर्थाने सोपा वाटणारा असतो. कदाचित तुमच्यापैकी अनेकांच्या मनामध्ये हा प्रश्न येत असेल की, लोकशाहीवरती ऐकण्यासारखं आणि बोलण्यासारखं काय आहे? याचं कारण लोकशाहीइतका लोकप्रिय आणि सगळ्यांना मान्य असलेला दुसरा कुठलाही विषय नसतो. किंबहुना, निदान गेल्या काही दशकांमध्ये तरी लोकशाहीचा गंभीरपणे प्रतिवाद फारसा कोणी करताना तुम्हाला दिसणार नाही. रस्त्यावरच्या माणसापासून विद्यापीठांमधल्या तज्ज्ञांपर्यंत कोणालाही जर विचारलं, तर लोकशाही कशी चांगली असते हेच सगळे जण सांगण्याचा प्रयत्न करतात. दुसरीकडे लोकशाहीची अडचण अशी असते की, ती लोकांच्या मनामध्ये भरमसाट अपेक्षा निर्माण करून ठेवते. त्याचं कारण लोकशाही ही फुग्यासारखी तुम्ही फुगवाल तेवढी फुगू शकते, तिच्यात तुम्ही भराल ते अर्थ भरले जाऊ शकतात. राजा दीक्षितांचा परिचय करून देताना ते कवी असल्याचं सांगितलं, त्यामुळं त्यांना कदाचित ही काव्यात्मक उपमा आवडेल. लोकशाही ही क्षितिजासारखी असते की, ते जवळ आलंय असं म्हणेपर्यंत क्षितिज दूर जातं आणि तुम्ही सतत वाटचाल करत राहता. लोकशाही ही अशी वाटचाल आहे की, जिच्यामध्ये तुम्ही सातत्याने नवी मूल्यं भरता आणि त्या दिशेने प्रयत्न करता, तुमचा समाज घडवता. तो समाज चार पावलं पुढं गेला की, तुमच्या असं



जोतिराव फुले



लोकमान्य टिळक

लक्षात येतं की- लोकशाही आणखीन दूर आहे, कारण तोपर्यंत समाजाने लोकशाहीची व्याख्या आणखी विस्तारलेली-वाढवलेली असते! नेमक्या याच कारणामुळे लोकशाहीचं मूल्यमापन करणं ही गोष्ट अवघडसुद्धा होते.

**आधुनिक संदर्भ**

ती अवघड आणखी एका कारणासाठी आहे आणि त्याचं स्पष्टीकरण करून मग मी मूळ भाषणाला सुरुवात करणार आहे. ते स्पष्टीकरण असं की, लोकशाही ही आधुनिक कल्पना आहे की प्राचीन आहे याच्यामध्ये अभ्यासकांमध्ये वाद होऊ शकतात. इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये ते विशेष असतील. अगदी लोकशाहीच्या व्याख्येबद्दल जर आपण बोलायला लागलो, तर लगेच आपल्याला अथेन्सची आठवण येते. कुणाला रोमन प्रजासत्ताकांची आठवण येईल, कुणाला भारतातील गणराज्ये किंवा भारतातील संघ आठवतील. मी त्यांच्याबद्दल बोलणार नाही आणि त्याचं एक कारण जसं माझं अज्ञान हे आहे, तो माझा विषय नाही. तसंच त्याचं दुसरं एक महत्त्वाचं तात्त्विक कारण आहे आणि ते असं की- व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही गोष्टींचे अर्थ प्राचीन काळात वेगळे होते, आज ते वेगळे आहेत. त्यामुळे लोकशाहीसुद्धा कोणत्या अर्थाने आपण आज तिच्याकडे बघतो, घेतो, नाकारतो किंवा स्वीकारतो याचे संदर्भ बदलेले आहेत. त्यामुळे माझ्या भाषणाचा मुख्य भर राहणार आहे- तो ज्याला ढोबळ अर्थाने आधुनिक काळ म्हणता येईल, त्या काळामध्ये लोकशाहीने काय केलं, लोकशाहीचं काय झालं याच्याबद्दल मी बोलणार आहे.

साधारणपणे चार भागांमध्ये बोलण्याचा माझा मानस आहे. सुरुवातीला लोकशाहीकडे कसे पाहता येईल, लोकशाहीचे अर्थ कसे पाहता येतील याचं संक्षेपाने मी सूचन करीन. त्यानंतर त्याहून जास्त संक्षेपाने आधुनिक काळात लोकशाहीचा विस्तार कसा झाला, हे मी तुम्हाला सांगेन. या व्याख्यानाच्या शीर्षकाचा जो उत्तरार्ध आहे, त्याच्याकडे तिसऱ्या भागात मी वळणार आहे. तो म्हणजे- आज लोकशाहीला ओहोटी लागली आहे का? लोकशाहीच्या आव्हानाचा क्षण आलेला आहे का? खरं तर मला चौथा महत्त्वाचा विषय वाटतो. तो विषय असा की, लोकशाहीपुढं ही आव्हानं आलेली आहेत, लोकशाहीला जी ओहोटी लागते असं कदाचित आपल्यापैकी अनेकांना वाटतंय, त्याची कोणती स्पष्टीकरणं देता येतील? ही सगळी चर्चा विस्ताराने करायची म्हटली, तर हा मोठा म्हणजे कदाचित एका पूर्ण कोर्सचा- म्हणजे

अभ्यासक्रमाचा जसा विषय असतो तसा विषय असेल. त्यामुळे मी बरीच विधानं सूत्ररूपाने करणार आहे.

### व्यक्ती आणि लोकशाही

लोकशाही कशाला म्हणायचं? किंवा लोकशाहीच्या अर्थाची तोंडओळख जरी करून घ्यायची म्हटलं, तर ती कशी करून घेता येईल? हा पहिला किचकट पण सोपा वाटणारा प्रश्न.

याचं कारण असं की, लोकशाही म्हटलं की आपल्या डोळ्यांपुढे थॉमस पेनचे 'राइट्स ऑफ मॅन' किंवा जॉन स्टुअर्ट मिल आणि त्यांनी व्यक्तीचे अधिकार काय सांगितले याच्यापासून मुद्दे उभे राहायला सुरुवात होते. एक लक्षात ठेवा की, ज्या समाजांमध्ये समाजामधल्या व्यक्ती या सुट्या व्यक्ती बनण्याची प्रक्रिया आधीच सुरू झाली- ज्याला इंग्रजीमध्ये individuation असं म्हणता येईल- तिथेच लोकशाहीबद्दलचे सिद्धांत मांडायला आधी सुरुवात झाली. त्यामुळे लोकशाहीच्या अनेक सिद्धांतांमध्ये व्यक्ती ही मध्यवर्ती मानली गेलेली आहे. भारतातसुद्धा हे झालं नाही असं नाही. उदाहरणार्थ- भारतामध्ये समुदायांच्या म्हणजे जातींच्या जाचांमधून व्यक्तींना सोडवून त्यांना सुटं केल्याशिवाय इथं लोकशाही आणता येणार नाही, याचं भान आलेला पहिला भारतीय विचारवंत म्हणून आपल्याला कोणाकडे पाहायचं असेल, तर एकोणिसाव्या शतकामध्ये जोतिराव फुल्यांनी जी भूमिका घेतली तिच्याकडे आपल्याला पाहावं लागेल. त्यांच्या हे लक्षात आलं होतं की, व्यक्ती हा घटक मूलभूत आहे. ते पाश्चात्त्यांच्याही लक्षात आलेलं होतं, पण भारताचा संदर्भ जोतिबांच्या पुढे वेगळा होता. तो असा की, व्यक्तीला व्यक्ती म्हणून जोपर्यंत प्रतिष्ठा प्राप्त होत नाही, तोपर्यंत लोकशाहीमधील 'लोक' घडू शकणार नाहीत, साकार होणार नाहीत. मी आधी माझ्या ज्या लेखाचा उल्लेख केला, त्याच्यामध्ये मी हे प्रतिपादन केलेलं आहे की- फुले आणि टिळक यांच्यामध्ये नेमका फरक कुठे येतो? तर फुल्यांच्या हे लक्षात येतं की, व्यक्तींना व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतरच लोकशाहीची सुरुवात आपल्याला करावी लागेल. याउलट, लोकमान्य त्यांच्यानंतरच्या काळात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला परकीय सत्तेविरुद्ध लढण्यासाठी व लोकांची शक्ती इथं उभी करण्यासाठी 'लोक' नावाचा एक समुदाय इथं उभा करतात; पण त्यासाठी व्यक्ती हे एकक आधी घडवणे त्यांना आवश्यक वाटत नाही. या दोन मुद्यांचा उल्लेख मी अशाकरता करतो की, त्यामुळे लोकशाही ही एकाच रस्त्याने जाते आणि तिची तोंडओळख करून घेत असताना फक्त व्यक्ती म्हणजे काय व व्यक्तींचे अधिकार म्हणजे काय, अशा क्रमानेच आपण जायला पाहिजे असं नाही.

काही मध्यवर्ती सूत्रे विकसित करीत लोकशाही ही संकल्पना विकसित होत गेली आहे.

### मर्यादित शासन

साधारणपणे जगभरात आधुनिक काळात काय झाले? तर आपल्याला असं दिसतं की, राजकीय द्वंद्व जे आहे, ते आपण सामान्य माणसं आणि ज्यांना अधिकार असतात ते अधिकारी यांच्यामध्ये आहे. त्यामुळे संकल्पनेच्या पातळीवरून लोकशाहीची जी सुरुवात होते, ती मर्यादित शासन या नावाची जी राज्यशास्त्रामध्ये संकल्पना मांडली जाते (लिमिटेड गव्हर्नमेंट) तिथून होते. राज्य तर पाहिजे, पण ते राज्य तुम्हाला डोईजड होऊन चालणार नाही. म्हणून काय करायचं? ज्यांना अधिकार द्यायचे, ते त्यांना मर्यादित पद्धतीने कसे मिळतील ते बघायचं. त्याच्यासाठी म्हणून संविधान असलं पाहिजे. साधारणपणे जे राजकीय विचारांचा व राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात, ते म्हणतील की- हे तुम्ही जे सांगता, ते लॉकसारख्या विचारवंतापासून सुरू झालं. त्यातून कल्पना जी पुढे आली ती अशी की, हे लेखी स्वरूपात कुठे तरी लिहून ठेवलं पाहिजे की- राज्यकर्त्यांना कोणते अधिकार आहेत आणि कोणते अधिकार नाहीत. त्यातून संविधान (constitution, राज्यघटना) ही कल्पना उदयाला आली. या राज्यघटनेबरोबर उदयाला आलेली दुसरी कल्पना म्हणजे- त्या संविधानाबद्दल तुम्हाला प्रेम असायला पाहिजे, आदर असायला पाहिजे आणि त्या संविधानाप्रमाणे वागण्याची तुमची तयारी असायला पाहिजे. सैद्धांतिक भाषेत याला constitutionalism किंवा संविधानवाद, घटनावाद असं म्हटलं गेलं. म्हणजे नुसते संविधान-घटना असून उपयोगाची नाही, तर ती संहिता तुम्ही आत्मसात केली पाहिजे. ती तुमच्या राजकारणाची प्रेरणा असली पाहिजे. या दोन्हीं गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत-मर्यादित शासन आणि संविधान.

### नियंत्रण आणि संतुलन

याखेरीज नंतर मॉन्टेस्क्यू यांसारख्यांनी मांडलेला विचार काय आहे? की मुळात जर सत्ता एका ठिकाणी राहिली नाही– आणि हा एका अर्थाने राजेशाहीचा प्रतिवाद होता, सत्ता जर एका ठिकाणी राहिली नाही– जर काम करणाऱ्या आणि सत्ता वापरणाऱ्या लोकांमध्ये ती वाटली गेली, सत्ता–विभाजन झालं तर कुणीही डोईजड होणार नाही. त्यातूनच अमेरिकेची राज्यघटना ज्या वेळेला तयार झाली, त्या वेळी विकसित झालेलं जे तत्त्व आलं ते म्हणजे– 'checks and balances', म्हणजे सत्तेवर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने सर्व सत्ताधारी यंत्रणांमध्ये समतोल साधणे. 'Ambition must counteract ambition.' ज्याच्याकडे सत्ता असते अशा प्रत्येक संस्थेला किंवा व्यक्तीला महत्त्वाकांक्षा निर्माण होतात. त्या महत्त्वाकांक्षांवर कुरघोडी करण्याची स्पर्धा करणाऱ्या दुसऱ्या महत्त्वाकांक्षा तुम्ही मुद्दामहून निर्माण केल्या की, त्यांची आपापसांत स्पर्धा आपोआपच लागते आणि व्यक्तींचे अधिकार शाबूत राहतात. नियंत्रण आणि संतुलन हे तत्त्व त्यातून साकारलं. हे संरचनात्मक पातळीवर राजकारणात आणण्याचा प्रयत्न अमेरिकेच्या संविधानाने केला. या पद्धतीने संरचनात्मक पातळीवर वेगवेगळे प्रयोग करून मग त्याच्यामध्ये थेट आतापर्यंतचे आणि स्वित्झर्लंडमध्ये होत असलेले अनेक प्रयोग जे आहेत– ज्यांना प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रयोग जे म्हटलं जातं– त्यांचा समावेश करता येईल. असे सर्व प्रयोग हे लोकशाहीमध्ये समाविष्ट होतात.

त्याच्यातला एक विचार मार्क्सचासुद्धा होता. याचं कारण मार्क्सने ही भूमिका एकोणिसाव्या शतकामध्ये मांडलेली आपणाला दिसते. ती अशी : जर तुम्हाला फ्रेंच राज्यक्रांतीची जी घोषणा होती– स्वातंत्र्य, समानता व बंधुभाव– ती आणायची असेल तर समानता आणि बंधुभाव या केवळ संवेदना म्हणून येऊन चालणार नाहीत; तर संरचनात्मक पातळीवरती त्या कशा येतील आणि म्हणून विषमतामूलक संरचना कशा नष्ट करता येतील, हे पाहिलं पाहिजे. हा विचार पाश्चात्त्य विचारांमध्ये आधुनिक काळामध्ये फार जरी लोकप्रिय झाला नसला, तरी त्याचा प्रभाव नक्की पडलेला आहे.

### सार–रूप तत्त्वं

अलीकडच्या काळामध्ये म्हणजे गेल्या पन्नास–साठ वर्षांमध्ये– खरं तर गेल्या तीन दशकांमध्ये– या सगळ्या आतापर्यंतच्या ज्यांना क्लासिकल असं म्हटलं जाईल, त्या वैचारिक परंपरेचं सार काढून त्याच्यातून काहीएक सहमती लोकशाहीच्या अर्थाविषयीची निर्माण करण्याचे प्रयत्न झालेत. त्या सहमतीमध्ये काही वेळेला टोकाला–बाजूला ठेवलेले, पण काही वेळेला त्या सहमतीमध्ये समाविष्ट झालेले विचार जे आहेत; त्यामुळे UNDP असेल किंवा 'International Institute for Democracy and Electoral Assistance' या नावाची जी आंतरराष्ट्रीय संघटना आहे (IIDEA), अशा अनेकांनी लोकशाहीची तीन तत्त्वं सांगितलेली दिसतात. एक म्हणजे– उत्तरदायित्व. ज्यांच्याकडे सत्ता आहे, ते नागरिकांना जबाबदार असले पाहिजेत. (Accountability). दुसरे म्हणजे– सहभाग. नागरिकांचा निर्णयप्रक्रियेत शक्य तिथे आणि शक्य तेवढा सहभाग असायला पाहिजे. तिसरं म्हणजे– transparency. सहभागाबरोबरच सरकारचा कारभार हा पारदर्शक असला पाहिजे. परंतु ह्या तत्त्वांपेक्षा जास्त व्यापक भूमिका आहे ती एका स्वीडिश विद्यापीठामध्ये व्ही–डेम नावाचा जो प्रकल्प सध्या चालू आहे आणि ज्याचे अनेक जण उदाहरण देत असतात, त्या 'Varieties of Democracy' या प्रकल्पाची. त्यांनी लोकशाहीची पाच अंगं सांगितलेली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे लोकशाहीमध्ये निवडणुका, व्यक्तिस्वातंत्र्य किंवा उदारमतवाद, समानता, सहभाग आणि विचारविनिमय म्हणजे 'deliberation' अशी पाच तत्त्वं समाविष्ट होतात.

### पाच किचकट प्रश्न

हे सगळे विचार जर लक्षात घेतले तर असं लक्षात येईल की, लोकशाहीला जी खरी माथेफोड करावी लागते, ते खरे गुंतागुंतीचे प्रश्न याच्यात लपलेले आहेत. पण ते स्पष्टपणे पुढे येत नाहीत. ते प्रश्न कुठले आहेत ते सांगतो आणि पुढे जातो.

पहिला प्रश्न असतो की, लोकशाहीतील लोक कोण असतात? शब्द वापरायला सोपा आहे पण लोक कोण असतात, त्याच्यात कुणाचा समावेश होतो? एके काळी हा प्रश्न विचारला गेला होता की, त्याच्यात बायकांचा समावेश होतो का? आणि त्याचं उत्तर नकारार्थी दिल जात होतं. एके काळी प्रश्न विचारला गेला होता की, याच्यात गुलामांचा समावेश होतो का? आणि त्याचं उत्तर नकारार्थी दिलं जात

होतं. एके काळी हा प्रश्न असाही विचारला जात होता की, जिथे वसाहती आहेत आणि त्या वसाहतीतील प्रजा लोकांमध्ये समाविष्ट होते का? दादाभाईंनी हा प्रश्न विचारला होता. त्याचंही उत्तर त्यांना नकारार्थी दिलं गेलं होतं. त्यामुळे लोक कोण आहेत आणि लोक ही कल्पना तुम्ही किती व्यापक व समावेशक करू शकता, हा लोकशाहीचा व्यवहार आणि विचारामधला डोकेफोड करायला लावणारा एक प्रश्न असतो.

लोकशाहीमधला दुसरा जो प्रश्न असतो, तो म्हणजे – लोक आणि कारभारी– म्हणजे जे सरकारे चालवतात ते लोक– यांचे संबंध नेमके कसे असले पाहिजे? त्यांना तुम्ही मायबाप सरकार म्हणणार का? त्यांना तुम्ही तुमचे पालक म्हणणार का? त्यांना तुम्ही तुमचे आश्रयदाते म्हणणार का? का तत्त्वतः म्हणतात त्याप्रमाणे खरोखर ते तुमचे नोकर असतात? नेमके कसे संबंध असले पाहिजेत ? तुम्ही त्यांना साहेब म्हटलं पाहिजे का? तुम्ही त्यांना ‘जी हुजूर!’ म्हटलं पाहिजे का? तुम्ही त्यांचा पहिल्या नावाने उल्लेख केलात, तर त्यांचा अपमान होतो का? तुम्ही त्यांच्यावर टीका केलीत, तर त्यांचा अपमान होतो का? हे प्रश्न लोकशाहीमध्ये मध्यवर्ती असतात. त्याची उत्तरं तुम्ही कशी देता, यावर तुम्हाला लोकशाहीचा कोणता अर्थ अभिप्रेत आहे, हे ठरत असते.

तिसरा प्रश्न असतो तो म्हणजे, प्रतिनिधित्व म्हणजे काय भानगड आहे? तुम्ही प्रतिनिधी निवडून पाठवता. प्रतिनिधित्व करता येतं का? कुणी कोणाचं प्रतिनिधित्व करायचं? पुरुषांना बायकांचं प्रतिनिधित्व करता येतं का? प्रत्येक जातीचं किंवा प्रत्येक जमातीचं प्रमाणशीर प्रतिनिधित्व असायला पाहिजे का? हे प्रश्न दिसायला सोपे दिसतात. सैद्धांतिक पातळीवर प्रतिनिधित्व ही कल्पना भारदस्त दिसते. पण क्षणभर विचार केल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की, लोकशाही राबवणे किंवा लोकशाहीचा आराखडा तयार करणे अवघड आहे. याचं हेही एक कारण आहे की– प्रतिनिधित्व म्हणजे काय आणि प्रतिनिधित्व करता येते का, प्रतिनिधी हे तुमच्या वतीने निर्णय घेतात का, तुम्ही सांगितलेल्या गोष्टीच फक्त त्यांनी केल्या पाहिजेत का, ते तुमचे दूत असतात का– असे अवघडातून अवघड प्रश्न यातून तयार होतात.

चौथा प्रश्न असतो तो म्हणजे– हे सगळं कशासाठी चालले आहे? तर, सत्ता नियंत्रणात ठेवण्यासाठी चाललं आहे. ही सत्ता काय असते? सत्ता कशाला म्हणायचं? मगाशी मी मार्क्सचा उल्लेख केला तो एवढ्यासाठीच. राजकीय सत्तेबद्दल आपण उत्साहाने बोलतो की, ती नियंत्रणात असली पाहिजे. आर्थिक सत्तेचं काय? पुरुषसत्तेचं काय? जातीच्या सत्तेचं काय? गोऱ्यांच्या काळ्यांवर असलेल्या सत्तेचं काय? म्हणजे जर लोकशाही म्हणजे, सत्तेचं समान वाटप किंवा सत्तेत वाटा किंवा सत्तेत सहभाग असेल, तर या सगळ्या सत्तांमध्ये सगळ्यांना वाटा असायला पाहिजे. तो असेल की नसेल, हा चौथा प्रश्न लोकशाहीच्या अर्थाच्या संदर्भात येतो.

आणि सरते–शेवटी लोकशाहीच्या अर्थाच्या संदर्भात येणारा जो पाचवा प्रश्न आहे, तो म्हणजे– व्यवहारात लोकशाही चालवत असतांना संस्था, नियम, निर्बंध याचं काय करायचं? अराज्यवादी किंवा anarchist (म्हणजे खरे तर सत्ताविरोधवादी) असे जे लोक असतात ते असं म्हणतील की, सगळ्या संस्थाच बाजूला काढा. त्याने भागेल का आपलं? आणि जर संस्था ठेवल्या, तर मग त्या कशा चालवल्या पाहिजेत? संस्थांचं नेमकं स्थान काय आहे? लोकशाहीमध्ये संस्था का महत्त्वाच्या असतात? संसद असेल, न्यायालय असेल किंवा अगदी नोकरशाही असेल; यासारख्या संस्था लोकशाहीत का महत्त्वाच्या असतात? हे पाच प्रश्न म्हणजे लोकशाहीचा अर्थ असं जर धरून तुम्ही चाललात, तर आपण कशाबद्दल बोलतोय, याच्याबद्दल तुमच्या मनात स्पष्टता राहील.

(भाग २ व ३ पुढील दोन अंकांत)

**सुहास पळशीकर,** पुणे
suhaspalshikar@gmail.com

(दि.२ डिसेंबर २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात सुहास पळशीकर यांनी लोकमान्य टिळक स्मृतिव्याख्यान दिले. संपूर्ण भाषणाचे रेकॉर्डिंगवरून **शब्दांकन** करण्याचे काम **सतीशकुमार पडोळकर,** हिन्दी विषयाचे व्याख्याते, लोणीकाळभोर यांनी केले आहे. ते भाषण लेखस्वरूपात प्रसिद्ध करताना लेखकाने त्याचे संपादन करून आवश्यकतेप्रमाणे त्यात नव्याने भर देखील घातली आहे.)

प्रतापसिंह साळुंके

# न्यायालयाचा अवमान नावाचे पुरातन गूढ

जगभरातील न्यायालयांनी न्यायालयीन अवमानाला कसे हाताळले याचा धांडोळा घेतला असता, आपल्याला असे जाणवते की, न्यायालयावरील टीकेबाबत पाश्चात्त्य न्यायालये अतिसंवेदनशील नाहीत. ब्रिटिश न्यायाधीश लॉर्ड डेंनिंग यांनी महानगर पोलीस आयुक्त प्रकरणात असे स्पष्ट केले की, जरी न्यायालयीन अवमानप्रकरणी न्यायालयांना सदर खटले चालविण्याचा अधिकार असला तरी तो त्यांनी कधीच वापरता काम नये. याचे कारणही त्यांनी दिले होते. अशा प्रकरणांमध्ये न्यायाधीशांना व्यक्तिगत रस असू शकतो. त्यामुळे प्रशासन कायद्याच्या नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार स्वतःचे हितसंबंध गुंतलेले असतील अशा प्रकरणात ती व्यक्ती न्यायाधीश असू शकत नाही. यामुळे शक्यतो न्यायालयीन अवमानप्रकरणी न्यायालयांनी आपले अधिकार न वापरणेच अधिक हिताचे आहे.

सन १९८७ मध्ये इंग्लंडमध्ये स्पायकॅचर या खटल्याचा निकाल लागला. तो निकाल अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करणारा असल्याचे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे होते. त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या या निकालावर काही तिखट प्रतिक्रिया उमटल्या. लोकभावनेचे प्रतिबिंब वर्तमानपत्रांमध्ये पाहायला मिळाले नसते, तर नवलच! ‘डेली मिरर’ या नियतकालिकामध्ये एक व्यंगचित्र छापले होते. त्या व्यंगचित्रात या प्रकरणी निकाल देणाऱ्या न्यायमूर्तींना उलटे लटकताना दाखविले होते. या व्यंगचित्राचे शीर्षक होते– ‘मूर्ख म्हातारे’. या व्यंगचित्रावरून व शीर्षकावरून बराच गदारोळ झाला. न्यायालयीन वर्तुळातही या व्यंगचित्राविषयी नाराजी व्यक्त झाली. अनेकांनी या नियतकालिकाला न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी दखल घेऊन, शिक्षा देऊन ‘धडा’ शिकविला पाहिजे– असे बोलले गेले. या खटल्यात निकाल देणाऱ्या न्यायाधीशांपर्यंत ते प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे पोहोचविण्यातही आले. निकाल देणाऱ्या न्यायमूर्तींपैकी एक असणारे न्यायमूर्ती टेम्पल्टन यांनी मात्र अशा प्रकारे या नियतकालिकावर कुठल्याही प्रकारे न्यायालयीन अवमानाचा खटला चालवायला नकार दिला. उलट, आपल्या सहकाऱ्यांना ते म्हणाले, ‘‘माझे वय ६० पेक्षा अधिक आहे, त्यामुळे मी म्हातारा आहे हे तथ्य आहे. त्यामुळे आम्हाला म्हातारे म्हणणे याला कायद्याच्या परिभाषेत 'statement of fact' म्हणजे तथ्य कथन करणे म्हटले जाऊ शकते. आम्ही मूर्ख आहोत असे त्यात म्हटले आहे, तो त्या व्यक्तीचा दृष्टिकोन आहे, ज्याला कायद्याच्या परिभाषेत 'statement of opinion' म्हणजे आपले मत कथन करणे म्हटले जाऊ शकते.’’ न्यायमूर्ती टेम्पल्टन यांनी म्हटले की, ब्रिटनमध्ये असा कोणताही कायदा अस्तित्वात नाही, ज्याद्वारे 'statement of fact' किंवा 'statement of opinion' साठी ब्रिटनच्या नागरिकाला शिक्षा दिली जाऊ

शकते. ‘डेली मिरर’ या नियतकालिकाला धडा शिकविला जावा, अशी अनेकांची ‘सुप्त’ इच्छा दस्तुरखुद्द ज्या न्यायाधीशांचा अवमान केला असे बोलले जात होते, त्यांनीच त्याला कडाडून विरोध केल्यामुळे फळास जाऊ शकली नाही. न्यायालयाची स्वतःवरील टीकेबाबत उदारमतवादी असण्याची हीच परंपरा ब्रिटिश न्यायालयांनी समकालीन परिस्थितीतही कायम राखली आहे. ब्रेक्झिटच्या प्रकरणात २०१६ मध्ये न्यायालयाचा निकाल आल्यानंतर ‘डेली मेल’ या दैनिकाने ब्रेक्झिटचा निकाल देणाऱ्या तीन न्यायाधीशांचे छायाचित्र छापले आणि त्याचे शीर्षक होते– 'Enemies of People' म्हणजे लोकांचे शत्रू. या शीर्षकावरूनही बराच गहजब झाला. परंतु न्यायाधीश आणि न्यायव्यवस्थेने अत्यंत समजूतदारपणे या सगळ्या प्रकाराकडे ‘दुर्लक्ष’ करून न्यायालयाच्या अवमानप्रकरणी आपली ‘प्रतिष्ठा’ पणाला लावून शक्ती खर्च केली नाही, हे नक्कीच कौतुकास्पद होते.

हे फक्त ब्रिटन किंवा पाश्चात्त्य देशांमध्येच घडत होते, असे नाही; तर भारतातही या प्रकारचा उदारमतवाद न्यायालयांकडून व न्यायाधीशांकडून दाखविला जात होता. न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर हे भारताचे सरन्यायाधीश १९६४ ते १९६६ या कालावधीत होते. त्या काळात मुंबईतील एका दैनिकातून एक पत्रकार सरन्यायाधीश पी.बी. गजेंद्रगडकर यांच्यावर अत्यंत आक्रमकपणे टीका करणारे लेख सातत्याने लिहीत होता. काही वेळा त्या लेखांची भाषा सभ्यता आणि सार्वजनिक जीवनातील शिष्टाचार यांची तमा न बाळगणारी होती. अनेक लेखांमध्ये त्यांच्या उद्देशांवर शंका घेतली होती. सर्वोच्च न्यायालयातील त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी त्यांना न्यायालयाच्या अवमान प्रकरणी त्या पत्रकार आणि दैनिकाविरुद्ध कारवाई करण्याचा सल्ला दिला. ते सरन्यायाधीश असल्याने आपल्या सहकारी न्यायाधीशांना तसे करण्यासाठी ते उद्युक्त करू शकत होते, परंतु असे घडले नाही. ते सरन्यायाधीश म्हणून १९६६ मध्ये निवृत्त झाल्यानंतर मुंबईत एका सार्वजनिक कार्यक्रमात त्या पत्रकाराची व न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांची भेट झाली. त्या पत्रकाराने स्वतःची व तो ज्या दैनिकात काम करायचा त्याची ओळख करून दिली. न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांच्या लक्षात आले की, आपल्याविरुद्ध सातत्याने लिहिणारा हाच तो पत्रकार. त्या वेळी त्या पत्रकाराने एक प्रश्न विचारला की, मला नेहमी याचे कुतूहल वाटते की, तुम्ही सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश असताना खरे तर तुम्हाला माझ्याविरुद्ध न्यायालयाच्या अवमान प्रकरणी खटला चालविणे सहज शक्य होते, परंतु तुम्ही असे कधीही केले नाही. याचे कारण काय होते? त्या वेळी न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांनी हसून असे सांगितले, ‘‘मी जर उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असतो आणि मी जर चूक केली असती, तर देशात सर्वोच्च न्यायालय नावाची यंत्रणा माझी चूक दुरुस्त करण्यासाठी अस्तित्वात आहे. परंतु माझी अडचण ही होती की, मी सर्वोच्च न्यायालयाचा केवळ न्यायाधीश नव्हतो, तर मी सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश होतो आणि सरन्यायाधीश म्हणून जर मी काही चूक केली तर माझी चूक दुरुस्त करणारी यंत्रणा या देशात अस्तित्वात नाही. तुम्ही माझ्यावर केलेली टीका ही न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर म्हणून नव्हती, तर व्यक्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांच्यावर होती. परंतु पी.बी. गजेंद्रगडकर ही व्यक्ती देशाच्या सर्वोच्च स्थानावर म्हणजे सरन्यायाधीश पदावर बसलेली होती. त्यामुळे व्यक्तीवर केलेल्या टीकेमुळे तसे करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा करण्यासाठी त्या व्यक्तीने धारण केलेल्या पदाचा वापर करणे मला अयोग्य वाटले. मी सार्वजनिक आयुष्यात असल्याने या प्रकारच्या टीकेसाठी तयार असले पाहिजे. या देशातील प्रत्येक व्यक्तीला मी करत असलेल्या कामाबाबतीत आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे, तो मी माझ्या पदाचा वापर करून हिरावून घेता काम नये. म्हणून मी तुमच्यावर कसलीही कारवाई केली नाही, कारण तसे करणे मला अयोग्य वाटले.’’ आपण धारण करत असलेले पद आणि त्याच वेळी त्या पदासोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या याचे अचूक भान असले की, न्यायालयांचे वर्तन कसे असते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून आपल्याला या घटनेकडे पाहता येते.

न्यायालयाच्या अवमान कायद्याला पारतंत्र्याच्या काळातील १७२६ च्या सनदेची पार्श्वभूमी आहे, ज्यामुळे भारतात चार प्रेसिडेन्सींची म्हणजे इलाखे यांची निर्मिती करण्यात आली. ज्या ब्रिटनमध्ये या कायद्याचा उगम झाला, तिथे या कायद्याला आठ शतकांचा इतिहास आहे. या कायद्याच्या प्राथमिक अवस्थेत राजा न्यायदानाचे काम करायचा. त्यानंतर ही जबाबदारी राजाने नियुक्त केलेल्या न्यायाधीशांकडे देण्यात आली. त्यामुळे न्यायाधीशांचा



न्यायमूर्ती पी. बी. गजेंद्रगडकर



न्यायमूर्ती शरद बोबडे

अवमान हा एका अर्थाने राजाचा अवमान, असे समजले जात होते. राजा हा न्यायदानाचे काम करत असताना त्याचा अवमान करणारी व्यक्ती राजाच्या अधिकारांना आव्हान देते आहे, असे समजले जाई. त्यामुळे न्यायालयाचा अवमान हा गंभीरतेने घेतला जाई. पण काळ बदलत गेला. राजेशाही, सरंजामशाही, हुकूमशाही, एकाधिकारशाही अशा अनेक अवस्थांमधून उन्नत होत अखेर लोकशाही ही व्यवस्था कमीत कमी दोष असणारी शासनव्यवस्था म्हणून मान्यता पावली. जगभरात त्याला मान्यताही मिळाली. भारताचे संविधान निर्माण होत असताना संविधान सभेत या कायद्याविषयी विस्तृत चर्चा झाली. दि.१७ ऑक्टोबर १९४९ रोजी संविधान सभेचे सदस्य टी.टी. कृष्णम्माचारी– जे मसुदा समितीचे सदस्य होते– त्यांनी राज्यघटनेचे प्रस्तावित कलम १३ जे नंतर कलम १९ बनले, त्यामध्ये एक दुरुस्ती सुचविली होती. या कलमानुसार नागरिकांना अभिव्यक्ती व आविष्कारस्वातंत्र्य मिळाले होते, त्यावर काही मर्यादा घातल्या होत्या. त्या मर्यादांमध्ये ‘न्यायालयाचा अवमान’ या मर्यादेची भर घालण्याचे सुचविले होते. यावर सभागृहात बराच गदारोळ झाला होता. संविधान सभेचे सदस्य नझरुद्दीन अहमद यांचा अपवाद सोडला, तर बहुसंख्य सदस्य या दुरुस्तीच्या व त्यामागील भूमिकेच्या संपूर्णतः विरोधात होते. संविधान सभेचे सदस्य आर.के. सिधवा यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात या कायद्याच्या झालेल्या गैरवापराचा हवाला देऊन त्याचा राज्यघटनेतील अंतर्भाव टाळण्यास सांगितला. न्यायाधीश हीही हाडामांसाची माणसे असल्याने ती चुकू शकतात. त्यामुळे त्यांच्यावर टीका–टिपण्णी करण्यात काहीही गैर नसल्याचेही त्यांनी नमूद केले होते. संविधान सभेचे सदस्य बी.दास यांनी या प्रकारच्या दुरुस्तीमुळे मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही कठोर टीका करताना अशा कृतीमुळे नागरिकाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य नावालाही शिल्लक उरणार नसल्याचे म्हटले होते. ज्या सदस्यांचा या प्रकारच्या दुरुस्तीला विरोध होता, त्यांचा युक्तिवाद असा होता की, न्यायालयाच्या अवमानासंदर्भात इतके कायदे असताना परत या कायद्याला संविधानात स्थान देण्याचे काय प्रयोजन आहे? यावर उत्तर देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेला सांगितले की, हे सगळे कायदे भारतीय संविधान लागू होण्यापूर्वी अस्तित्वात होते. आता भारतीय संविधान लागू झाल्यानंतर जर संविधानाने या कायद्याला संरक्षण दिले नाही, तर हे सगळे कायदे संविधानाचे प्रस्तावित कलाम ८ नुसार जे नंतर कलम १३ बनले, त्यानुसार असांविधानिक बनतील. जर हे

टाळायचे असेल तर त्याचा अंतर्भाव करणे तांत्रिक दृष्ट्या गरजेचे आहे. या निवेदनानंतर सभागृहातील बहुसंख्य सदस्यांनी त्याला अनुमती दिली. पण इथे लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, या कायद्याला तात्त्विक कारणापेक्षा तांत्रिक कारणामुळे त्याचा अंतर्भाव करण्यास सदस्यांनी परवानगी दिली होती. बदलत्या काळानुसार त्या तांत्रिक गरजा आणि पद्धती यांमध्ये बदल होऊन त्याच्या आवश्यकतेबद्दल व योग्यतेबद्दल फेरविचार करण्याची वेळ आली आहे, असे वाटल्यास ते पूर्णतः गैरलागू नाही.

हा कायदा सरंजामी वृत्ती जोपासणारा असल्याचे, तसेच लोकशाही व्यवस्थेशी विसंगत असल्याचे आरोप ठेवत या कायद्याच्या सांविधानिक वैधतेविषयी प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. ज्येष्ठ पत्रकार एन.राम, ज्येष्ठ लेखक व पत्रकार अरुण शौरी व ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रशांत भूषण यांनी या कायद्याला ऑगस्ट २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कामिनी जैस्वाल यांनी या तिघांच्या वतीने न्यायालयात ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेत न्यायालयाचा अवमान कायदा कलम २(क) (i) च्या सांविधानिक वैधतेला आव्हान दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२० मध्ये दुसऱ्या एका न्यायालयीन अवमान प्रकरणात ॲड.प्रशांत भूषण यांना दोषी मानून एक रुपयाचा दंड ठोठावला. याला कारण ठरले ते त्यांनी केलेले दोन ट्विट! पहिल्या ट्विटमध्ये त्यांनी विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती श्री.शरद बोबडे यांचे संपूर्ण देशात कोरोना महामारीमुळे टाळेबंदी असताना ते सुट्टीवर असताना एका राजकीय नेत्याच्या ५० लाख रुपयांच्या महागड्या दुचाकीवरील विनाहेल्मेट व विनामास्क गाडी चालवितानाचे छायाचित्र ट्विट केले होते. त्या छायाचित्राबरोबर जो मजकूर ट्विट केला होता, त्यात असे म्हटले होते की– टाळेबंदीत सर्वोच्च न्यायालय बंद ठेवून, देशातील नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवून, त्यांचा न्याय मिळविण्याचा अधिकार नाकारून भारताचे सरन्यायाधीश भारतीय जनता पक्षाच्या एका नेत्याच्या मालकीच्या पन्नास लाखांच्या दुचाकीवरून फिरत आहेत. दुसऱ्या एका ट्विटमध्ये त्यांनी असे म्हटले होते की– भविष्यात जेव्हा इतिहासकार मागे वळून पाहतील, आणि गेल्या सहा वर्षांत औपचारिक आणीबाणी न पुकारता भारतीय लोकशाहीचे अधःपतन कसे झाले; त्या वेळी ते यामध्ये प्रामुख्याने सर्वोच्च न्यायालयाची भूमिका आणि त्यातही मागील चार सरन्यायाधीशांची भूमिका अधोरेखित करतील. या दोन ट्विटमुळे ॲड. प्रशांत भूषण यांच्यावर न्यायालयीन अवमानाची याचिका दाखल करण्यात आली. काय अनोखा योगायोग आहे की, इंदिरा गांधी यांनी पुकारलेल्या अन्यायकारक आणीबाणीनंतर काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यावर सत्तेत आलेल्या जनता सरकारमध्ये जनसंघ म्हणजे आत्ताचा भारतीय जनता पक्ष सहभागी होता. या सरकारमध्ये ॲड. प्रशांत भूषण यांचे वडील शांती भूषण हे कायदामंत्री होते. आणीबाणीच्या काळात न्यायव्यवस्थेने राजकीय सत्तेपुढे शरणागती पत्करल्याची टीका झाली होती. या जनता सरकारला अस्तित्वात येण्याला चार दशके उलटून गेल्यावर मित्रपक्षांच्या मदतीने भारतीय जनता पक्ष सत्तेत आल्यावर त्या पक्षावर न्यायव्यवस्थेवर दबावतंत्राचा वापर करत असल्याचा आणि सर्वोच्च न्यायालय केंद्र सरकारला झुकते माप देत असल्याचा तसेच त्याच्या दबावात काम करते, असा आरोप होत आहे. हे आरोप अन्य कुणी नाही तर चार दशकांपूर्वी त्यांच्याच सरकारच्या कायदामंत्र्याच्या पुत्राकडून व्हावा, या योगायोगाला काय म्हणावे?

असे म्हटले जाते की, क्रांती सर्वांत आगोदर जर कुणाचा बळी घेत असेल, तर तो आपल्या पिलांचा! अशा प्रकारच्या प्रसंगांमधून सामाजिक सिद्धांतांचा आपल्याला प्रत्यय येतो. एके काळचे तथाकथित क्रांतिकारक व्यवस्थेचा भाग बनल्यावर आपल्या क्रांतीच्या सिद्धांतांना किती सराईतपणे नख लावतात, हे या प्रसंगांमधून उकलत जाते. सत्ताकारणापुढे सगळी तत्त्वे, मूल्ये, सिद्धांत कसे लुळे-पांगळे बनतात, याचाही प्रत्यय आपल्याला या प्रसंगांमधून येत असतो. सत्तेत असणारे आणि सत्तेत नसलेले, परंतु सत्तेची आस बाळगून जनतेने त्यांना साह्य करण्यासाठी आदर्शवादाची भाषा करणारे असे दोनच गट समाजजीवनात अस्तित्वात असतात. त्यांच्या जागांची अदलाबदली होताच त्यांची भाषा आणि कृती बदलते. तुम्ही कुठल्या वर्गात आहात यावरून तुमची भाषा आणि संवेदना ठरते, या सिद्धांताचाही आपल्याला अनुभव येतो.

दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश ए.पी. शहा यांनी २७ जुलै २०२० रोजी 'द हिंदू' या वर्तमानपत्रात लिहिलेल्या लेखात एक चमत्कारिक योगायोग अधोरेखित केला आहे. ज्या वेळी भारतात सर्वोच्च न्यायालयात ॲड. प्रशांत भूषण यांच्यावर न्यायालयीन अवमानाची याचिका

दाखल करण्यात आली, त्या वेळी पाकिस्तानी सर्वोच्च न्यायालयाने तेथील यु-ट्यूब व इतर सामाजिक संकेतस्थळांवर (ते प्रशासन, न्यायव्यवस्था व लष्कर यांच्याविरुद्ध विद्वेष पसरवत असल्याने) त्यांच्यावर बंदी घालण्यात यावी, असे मत व्यक्त केले. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गाने भारतीय सर्वोच्च न्यायालय जाऊ इच्छिते का, असा अस्वस्थ करणारा प्रश्नही त्यांनी या लेखात उपस्थित केला होता. ॲड.प्रशांत भूषण यांना न्यायालयीन अवमान-प्रकरणी दोषी मानून एक रुपया दंड ठोठावण्याचा निकाल ज्या दिवशी घोषित केला, त्या दिवशी तारीख होती १४ ऑगस्ट २०२०- म्हणजे पाकिस्तानचा स्वातंत्र्यदिन! नागरिकांच्या मूलभूत हक्कांपेक्षा त्यांचा संकोच करणाऱ्या दमनकारी व्यवस्थेला संरक्षण देणे हे आपण पाकिस्तानच्या मार्गाने जायची नांदी ठरू शकते, एवढा धडा आपण या प्रसंगातून घेतला तरी आपण बरेच काही वाचवू आणि सावरू शकू.

भारतीय संविधानाच्या कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालयाला स्वतःच्या वा कनिष्ठ न्यायालयाच्या अवमानप्रकारणी शिक्षा करण्याचे अधिकार दिलेले आहेत. कलम १४२ नुसार सर्वोच्च न्यायालय इतर कायद्यांच्या अधीन राहून न्यायालय अवमानप्रकरणी शिक्षा करू शकते. यासाठी संसदेने तसा कायदा संमत करणे आवश्यक आहे. याच प्रकारचे अधिकार कलम २१५ नुसार राज्यातील उच्च न्यायालयांना दिले आहेत. याव्यतिरिक्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयाच्या अवमान प्रकरणात प्रक्रिया ठरविणारे नियम १९७५ मध्ये बनविले गेले. तसेच मुंबई उच्च न्यायालय, गुवाहाटी उच्च न्यायालय, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने न्यायालयाच्या अवमान प्रकाराची प्रक्रिया ठरविण्यासाठी नियम बनविले आहेत. याव्यतिरिक्त संसदेने संमत केलेला न्यायालय अवमान कायदा १९७१ प्रामुख्याने न्यायालयीन अवमानप्रकारांनी गुन्हा घडला आहे की नाही, याची शहानिशा करण्यासाठी व शिक्षा ठरविण्यासाठी विचारात घेतला जातो. या कायद्याच्या कलम २ (क) नुसार न्यायालयाच्या अवमानाचे दोन प्रकार मानले गेले आहेत- दिवाणी अवमान व फौजदारी अवमान. दिवाणी अवमानात न्यायालयीन निकाल, आदेश, निर्देश यांची हेतुपुरस्पर अवहेलना करणे याचा समावेश होतो. फौजदारी अवमानात शब्द, चिन्हे, दृश्य स्वरूपातील प्रदर्शन वा अशी कृती जी



ॲड्. प्रशांत भूषण

न्यायालयाप्रती वा न्यायालयाच्या अधिकाराप्रती अवमानजनक पद्धतीने वापर केलेली असल्यास वा कायदेशीर प्रक्रियेला बाधा निर्माण करत असल्यास वा न्यायालयाच्या न्यायदानाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करत असल्यास, तो गुन्हा समजला आहे. यात लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, दिवाणी अवमानापेक्षा फौजदारी अवमानप्रकारणी अधिक गोष्टींची पूर्तता झाल्यास मगच तो गुन्हा सिद्ध होतो.

सर्वोच्च न्यायालयाने पी.एन. दुआ विरुद्ध पी.शिवशंकर व इतर या प्रकरणी केवळ न्यायालयावर केलेली टीका ही न्यायालयाचा अवमान होऊ शकत नसल्याचा निर्वाळा दिला होता. जोपर्यंत न्यायदानाच्या प्रक्रियेला बाधा निर्माण होत नाही, तोपर्यंत केवळ न्यायाधीशांवरील टीका ही गुन्हा सिद्ध होण्यास पुरेशी नाही. याबरोबरच सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयाच्या अवमानप्रकरणी दाखल प्रकरणात शिक्षा करण्याचे अधिकार आहेत, तसेच सर्वोच्च न्यायालय स्वतःसुद्धा या प्रकरणाची दाखल घेण्यास सक्षम मानले गेले आहे, असे या निकालात स्पष्ट करण्यात आले.

बरदनाथ मिश्रा विरुद्ध ओरिसा उच्च न्यायालय-कुलसचिव (रजिस्ट्रार) या प्रकरणात न्यायालयीन अवमानप्रकारणी न्यायाधीशांचा अवमान न्यायाधीश म्हणून

झालेला आहे– म्हणजे त्या पदाचा की व्यक्ती म्हणून, हे पडताळून पहिले जाते. जर व्यक्ती म्हणून अवमान झाला असेल, तर व्यक्तिगत स्वरूपाचा खटला दाखल करण्याची मुभा त्या न्यायाधीशाला दिली जाते. परंतु न्यायालयीन अवमानाचा खटला दाखल केला जाऊ नये, असे निर्देश या खटल्यात दिले होते.

प्रीतम लाल विरुद्ध मध्य प्रदेश उच्च न्यायालय या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने न्यायदानाची प्रक्रिया विशुद्ध रहावी, यासाठी न्यायालयाच्या अवमान–प्रकरणी दोषी व्यक्तीला शिक्षा करणे न्यायालयाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले होते. शमशेरसिंग विरुद्ध पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय या प्रकरणात न्यायालयाबद्दल अवमानजनक टिप्पणीमुळे न्यायदानाच्या प्रक्रियेला बाधा निर्माण होत असल्यास न्यायालयीन अवमानासाठी सदर व्यक्ती शिक्षेस पात्र समजण्यात येईल, असा निर्वाळा दिला. डॉ.डी.सी. सक्सेना विरुद्ध माननीय सरन्यायाधीश या प्रकरणात न्यायालयावरील अवमानजनक टीकेमुळे जर लोकांचा न्यायालयावरील विश्वास डळमळीत होणार असेल, अशी टीका फौजदारी स्वरूपाचा अन्यायालयीन अवमान समजण्यात येईल, असे स्पष्ट केले. अरुंधती रॉय विरुद्ध अनामिक या २००२ च्या खटल्यात प्रसिद्ध लेखिका अरुंधती रॉय यांना त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील भाषेमुळे दोषी ठरवून शिक्षा सुनावली होती. ज्या तक्रारीवरून स्थानिक पोलीससुद्धा कारवाई करणार नाहीत, त्यावर सर्वोच्च न्यायालय कारवाई करत असल्याच्या आशयाचे प्रतिज्ञापत्र त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केले होते.

न्या.वाय.के. सबरवाल हे भारताच्या सरन्यायाधीश–पदावरून निवृत्त झाल्यावर ‘मिड डे’ या दैनिकाने काही लेख लिहिले होते. या लेखांमध्ये अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते. न्या.वाय.के. सबरवाल हे सरन्यायाधीश असताना दिल्लीतील अनधिकृत बांधकामांसंदर्भात दिलेल्या निकालाचा त्यांच्या बांधकामक्षेत्रात काम करणाऱ्या मुलांना फायदा झाला, असा आरोप करण्यात आला होता. या सर्व प्रकरणात न्या.वाय.के. सबरवाल यांच्या शासकीय निवासस्थानातून त्यांची मुले आपला व्यवसाय करत होती, असाही आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी या दैनिकाचे संपादक, निवासी संपादक, प्रकाशक, छायाचित्रकार, व्यंगचित्रकार यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. यामध्ये वर्तमानपत्राचे संपादक, पत्रकार यांना शिक्षा होण्यापेक्षा एक गंभीर बाब म्हणजे न्यायालय अवमान कायदा १९७१ च्या कलम १३ मध्ये २००६ च्या कायदादुरुस्तीने पोटकलम (ब)चा अंतर्भाव केला होता. त्यानुसार न्यायालयीन अवमानासाठी ‘सत्य’ हा बचाव म्हणून मान्य केला होता. खरे तर ‘सत्यमेव जयते’ असे न्यायव्यवस्थेचे बोधवाक्य असताना न्यायालयांच्या अवमानासाठी मात्र सत्य हा बचाव होऊ शकत नव्हता, हे किती उपहासात्मक होते! पण संविधान अमलात आणल्यापासून ५६ वर्षांनी का असेना, आपण सत्य हा बचाव न्यायालयीन अवमानासाठी मान्य केला, हे कौतुकास्पदच. आरोपींतर्फे बचाव करताना बचाव पक्षाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ शांती भूषण यांनी त्या लेखात केलेले आरोप सत्य असल्याचा युक्तिवाद केला होता. तसे पुरावे असल्याचेही त्यांनी न्यायालयाला सांगितले, परंतु त्याची दखल न्यायालयाने घेतली नाही. काही उद्देशाने कायद्यात दुरुस्ती झाली होती, परंतु २००६ च्या कायदादुरुस्तीकडे दिल्ली उच्च न्यायायालयाने ‘सोईस्करीत्या’ दुर्लक्ष करून आरोपींना दोषी ठरविले. जर उच्च न्यायालये असे वागणार असतील तर दाद कुठे मागायची, असा प्रश्न उरतो. कायद्याचा आदर न राखणारी न्यायालये कायद्याच्या राज्याच्या अवमानासाठी दोषी ठरत नाहीत का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे! ज्या ब्रिटनच्या धर्तीवर आपण न्यायालय अवमान कायदा १९७१ बनविला होता, त्या ब्रिटनमध्ये तो २०१३ मध्ये रद्दबातल ठरविला आहे. आपण तो रद्द करण्यासाठी कुठल्या क्रांतीची वाट पाहतो आहोत?

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा आणि व्यंगचित्रकार रचित तनेजा यांना सर्वोच्च न्यायालयाने न्यायालय अवमान याचिकेप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. महान्यायवादी ज्येष्ठ विधिज्ञ के.के. वेणुगोपाल यांनी कामरा यांनी केलेले ट्विट फक्त सभ्यतेच्या मर्यादा ओलांडणारेच नव्हे, तर न्यायालयाचा अवमान करणारेही आहे, असे म्हणून या प्रकरणी कारवाईची प्रक्रिया सुरू करण्याची परवानगी दिली. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर अधिक भाष्य करणे उचित होणार नाही. सदर ट्विटमध्ये वापरलेली भाषा, सुचविलेला आशय हा कदाचित सभ्यतेच्या मर्यादावळणावर असू शकतो, ज्याचे समर्थन करता येणार नाही, परंतु काही ट्विटमुळे न्यायदानाच्या प्रक्रियेत अडथळा कसा काय निर्माण होऊ शकतो, अशी

शंका काही कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाला पार्श्वभूमी आहे ती रिपब्लिक वृत्तवाहिनीचे संपादक अर्णव गोस्वामी यांना रायगड पोलिसांनी केलेल्या अटकेची. एका वास्तुरचनाकाराला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप अर्णव गोस्वामी यांच्यावर असताना आणि इतर अनेक महत्त्वाचे खटले प्रलंबित असताना, कनिष्ठ न्यायालयात जामीन अर्जावरील सुनावणी दुसऱ्या दिवशी होणार असताना सुट्टीच्या न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी 'तातडीने' घेऊन जामीन का दिला, असे प्रश्न सर्वसामान्यांच्या मनातही होते. सर्वसामान्यांची प्रकारणे वर्षानुवर्षे प्रलंबित असताना काही मूठभरांचीच प्रकरणे ऐकण्यात सर्वोच्च न्यायालय रस दाखवत असेल, तर प्रश्न पडणे साहजिक आहे. नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९, कलम ३७० संदर्भातील बेकायदा अटकेची प्रकारणे एका वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवून एका फौजदारी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करावा यावरून अनेक कायदेतज्ज्ञ, निवृत्त न्यायाधीश यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. आपण माफी मागणार नाही, वकील देणार नाही, न्यायालयाने आपल्यावरील न्यायालयीन सुनावणी पूर्ण करून आपल्याला शिक्षा द्यावी, असे आवाहन कुणाल कामरा याने समाजमाध्यमांद्वारे केले आहे. येत्या काळात न्यायालयीन अवमान कायदा आणि त्याची लोकशाहीतील सयुक्तिकता याविषयीची चर्चा पुन्हा एकदा केंद्रस्थानी राहील.

जगभरातील न्यायालयांनी न्यायालयीन अवमानाला कसे हाताळले याचा धांडोळा घेतला असता, आपल्याला असे जाणवते की, न्यायालयावरील टीकेबाबत पाश्चात्त्य न्यायालये अतिसंवेदनशील नाहीत. ब्रिटिश न्यायाधीश लॉर्ड डेंनिंग यांनी महानगर पोलीस आयुक्त प्रकरणात असे स्पष्ट केले की, जरी न्यायालयीन अवमानप्रकरणी न्यायालयांना सदर खटले चालविण्याचा अधिकार असला तरी तो त्यांनी कधीच वापरता काम नये. याचे कारणही त्यांनी दिले होते. अशा प्रकरणांमध्ये न्यायाधीशांना व्यक्तिगत रस असू शकतो. त्यामुळे प्रशासन कायद्याच्या नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार स्वतःचे हितसंबंध गुंतलेले असतील अशा प्रकरणात ती व्यक्ती न्यायाधीश असू शकत नाही. यामुळे शक्यतो न्यायालयीन अवमानप्रकरणी न्यायालयांनी आपले अधिकार न वापरणेच अधिक हिताचे आहे. लॉर्ड डेंनिंग यांच्याच शब्दांत सांगायचे तर– आम्ही टीकेला घाबरत नाही आणि आम्हाला त्याची चीडही येत नाही.

ब्रिजेस प्रकरणात अमेरिकेतील लोकांना शांत करून न्यायालयांची प्रतिष्ठा जपली जाऊ शकत नाही; न्यायालयाची प्रतिष्ठा जपण्याच्या नावाखाली लोकांच्या आविष्कार स्वातंत्र्यावर बंधने घालून ती प्रतिष्ठा जपणे शक्य नाही, अशा शब्दांत आविष्कारस्वातंत्र्याचा अमेरिकेतील न्यायमूर्ती ह्युगो ब्लॅक यांनी पुरस्कार केला. लोकांच्या मूलभूत अधिकारांविषयी जेव्हा न्यायालये संवेदनशील असतील, त्या वेळीच लोकांच्या मनात न्यायालयांबद्दल खरा आदर असू शकेल. न्यायालयावर केलेली टीका जोपर्यंत गंभीर स्वरूपाचा धोका न्यायदानाच्या प्रक्रियेला निर्माण होत नाही, तोपर्यंत मुक्तपणे केली जाऊ शकते, असे मत कॅनडामध्ये कॅपटो प्रकरणात व्यक्त केले होते.

ऑस्ट्रेलियात १९७२ मध्ये मुंडाय प्रकरणात न्यायमूर्ती होप यांनी अतिशय महत्त्वपूर्ण अशा बाबींवर आपले मत नोंदविले होते. आपल्या सर्वांच्याच डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारे असे ते शब्द आहेत. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर– सार्वजनिक संस्थांवर कठोर शब्दांत टीका होऊ नये, यासाठी कुठलेच समर्पक स्पष्टीकरण उपलब्ध नाही. सार्वजनिक जीवनात सार्वजनिक संस्था या स्वतःच्या पायावर व स्वतःच्या क्षमतेवर उभ्या असल्या पाहिजेत. सार्वजनिक जीवनात त्यांच्याबद्दल विश्वास नसेल, आदर नसेल; तर कायदा, नियम बनवून त्यांच्यावरील टीका रोखण्याच्या टेकूवर या संस्थांची प्रतिष्ठा जपली जाऊ शकत नाही. न्यायालयाने आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवायला हवा, न्यायालय अवमान कायद्यासारख्या पुरातन कायद्यावर नव्हे! कारण कायदे बनविण्याचा सिद्धांत हेच सांगतो की– कायदा त्याच गोष्टीवर बनतो, जी कृती लोक करतील अशी कायदे करणाऱ्यांना खात्री वाटत नसते! कायदे करून लोक न्यायालयाचा सन्मान करतील, असे समजणे असमंजसपणाचे ठरेल. किमान लोकशाहीत तरी लोकांच्या 'दुष्टबुद्धीपेक्षा' त्यांच्या 'न्यायबुद्धीवर' विश्वास ठेवायला काय हरकत आहे?

**प्रा. डॉ. प्रतापसिंह भीमसेन साळुंके,** पुणे
1982prataps@gmail.com
Mob.. 9960887411

प. रा. आर्डे

# अंनिसपूर्वीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर

''सामाजिक अन्यायाच्या बाबतीतल्या अशा विविध चळवळी दाभोलकरांनी सातारा परिसरात सुरू केल्या होत्या. शेतमजुरांची संघटना बांधण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण अपुऱ्या माहितीमुळं तो त्यांना यशस्वी करता आला नाही. साताऱ्यात हमाल संघटन बांधण्याचा प्रयत्नही असाच फसला; पण एक चांगला यशस्वी प्रयत्न दलितांना पाणवठा खुला करण्याबाबतीत घडला. साताऱ्याजवळच्या त्रिपुटी येथे एक तळं आहे. या तळ्यात गुरांना पाणी प्यायला मोकळीक; पण दलितांना नाही, अशी स्थिती होती. दाभोलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आजूबाजूच्या गावातून जनजागरण केलं आणि या तळ्यातील पाणी वापरण्यासाठी सत्याग्रह केला. या सत्याग्रहात त्यांना यश आलं.

'विवेक परिवारा'तील सर्व युवक आणि युवती बरोबर वेळेत हजर झाल्या. तर्कशीलनं त्याचा मित्र सम्यक्‌ला बरोबर आणलं होतं. 'विवेक मंडळा'त डॉ. दाभोलकरांचं शौर्य आणि कर्तृत्व याबद्दल सर सांगणार आहेत, असं सांगताच सिद्धांतही निर्भयबरोबर यायला तयार झाला होता.

सगळे युवक आणि युवती समोर बसल्या. मी बोलायला सुरुवात करणार एवढ्यात त्यांचं लक्ष श्रद्धेकडं गेलं. तिचे डोळे पाण्यानं भरले होते, रडायचंच तेवढं बाकी होतं. मी तिच्या जवळ गेलो आणि पाठीवरून हात फिरवत तिचं सांत्वन करीत म्हणालो, ''श्रद्धा, अशी डोळ्यांत पाणी आणून अस्वस्थ का आहेस? सांग पाहू- नक्की काय झालंय ते?''

श्रद्धाला कंठ फुटला आणि तिनं सांगायला सुरुवात केली. ''सर, गेल्या रविवारी मी घरी गेल्यावर 'विवेक परिवारा'त तुम्ही काय सांगितलं, ते आईला सांगत होते. आमचं बोलणं पप्पांनी ऐकलं आणि ते माझ्या अंगावर जोरात ओरडले, 'कारटेऽऽ तेथे जाऊन हे ऐकतेस काय? दाभोलकर हिंदू धर्मावर टीका करीत होते. सत्यनारायणाच्या पूजेला नावं ठेवत होते. पंढरपूरच्या वारीला वारकऱ्यांनी जाऊ नये म्हणत होते. हिंदू धर्मातील चाली-रीतींच्या विरोधात कायदा करण्यासाठी ते चळवळ करत होते.'

''मी म्हणाले, नाही पप्पा! सर सांगत होते की, दाभोलकर विचारांची लढाई लढत होते. ते सर्व धर्मांतील अंधश्रद्धांना विरोध करीत होते. चांगले विचार आणि चांगली वर्तणूक यांच्या विरोधात नव्हते. दाभोलकर अंधश्रद्धेच्या विरोधात होते.' एवढ्यात आईनं तोंड मधे घातलं. 'अहो, भारत सरकारनं दाभोलकरांना मरणोत्तर पद्मश्री बहाल केली, हे मी दूरचित्रवाहिनीवर पाहिलंय. दाभोलकर जर वाईट असते, तर सरकार त्यांचा असा गौरव कशाला करेल? आपण दाभोलकरांना नीट समजून घ्यायला हवं. जाऊ द्या तिला. खरं-खोटं ती समजून घेईल.' आईनं

माझी बाजू घेतली. पप्पांनी रागानं पाय आपटत कपडे घातले आणि ऑफिसला जाण्यासाठी स्कूटरवर टांग टाकली. माझी आई मला समजून घेते म्हणून बरं. तिनं मला साथ दिल्यामुळंच मी आज 'विवेक परिवारा'त कार्यक्रमाला येऊ शकले.''

मी श्रद्धाच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हणालो, ''अशीच निर्भय हो आणि इतर काय सांगतात किंवा बोलतात, ते नीट समजून घेऊन मग निर्णय घ्यायला शिक. दाभोलकर हेच सांगत होते. खरंच, दाभोलकर म्हणजे 'पृथ्वीमोलाचा माणूस'!''

एवढ्यात तर्कशीलनं हात वर केला आणि तो म्हणाला, ''सर, माझे वडील असंच म्हणतात. आमच्या घरात त्यांनी छान-छान पुस्तकं विकत आणली आहेत. मी त्यातील मला आवडलेली पुस्तकं वाचतो. कालच मला आमच्या कपाटात दाभोलकरांचा मुखपृष्ठावर फोटो असलेलं पुस्तक मिळालं. त्याचं नाव होतं, 'पृथ्वीमोलाचा माणूस.' दाभोलकरांना एवढा 'ग्रेट' माणूस का म्हणतात, हे आम्हाला सांगा.''

मी मग बोलायला सुरुवात केली...

''पुण्यातील ओंकारेश्वर पुलावर हल्लेखोरांनी दाभोलकरांना पाठीमागून गोळ्या घातल्या आणि त्यांचा निर्घृण खून केला. त्यानंतर केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतातील आणि जगाच्या पाठीवरील विचारवंतांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. अशा विचारवंतांच्या प्रतिक्रियेतून दाभोलकर हे 'पृथ्वीमोलाचा माणूस' कसे होते, त्याची साक्ष पटते. डॉक्टरांच्या हत्येनंतर एका कवीनं त्याच्या कवितेत लिहिलं आहे –

'दाभोलकर ऊन, पाऊस, वारा पीत  
ओठी घेऊन समतेचं गीत  
प्रत्येकाच्या डोक्यातला अंधार झाडत  
मस्तकातले धर्मांध किडे काढत  
अंधश्रद्धेची भूते गाडत  
अहोरात्र चालत राहिले...  
काळोखाच्या साम्राज्यात उजेड पेरत  
मसणवट्यातून भोंदूंच्या मठापर्यंत  
'एक गाव-एक पाणवठ्या'पासून  
जातपंचायतीच्या उच्चाटनापर्यंत  
दाभोलकर अखंड लढत राहिले....  
हा असा एक जगावेगळा माणूस होऊन गेला....

''या कवितेतून दाभोलकरांच्या जीवनकार्याचा परिचय प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. स्वत:चा संसार कावळे-चिमण्याही करतात. कुटुंबाचं रक्षण, शिक्षण आणि विकास यात आपण सगळे गुंतलेले असतो. ते गरजेचं आहेच; पण यात विशेष काय? थोर माणसं आपल्या कुटुंबाच्या परिघाबाहेर पडतात. अवघा समाज हेच त्यांचं कुटुंब बनतं. अशा माणसांना आपण जगावेगळे म्हणतो.''

दाभोलकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याविषयी जाणून घेण्याची तीव्र इच्छा युवकांमध्ये होतीच, पण त्याचबरोबर आणखी काही प्रश्न त्यांच्या मनात होते.

''सर, आम्हाला डॉक्टरांचं बालपण, शिक्षण याबद्दलदेखील उत्सुकता आहे. याविषयी आम्हाला सांगा,'' अशी चौकसरावानं मला विनंती केली. जिज्ञासेला त्यांचं शिक्षण आणि व्यवसायाबद्दल जाणून घेण्याची इच्छा होती. सम्यक्‌ला त्यांच्या कुटुंबातील वातावरण कसं होतं, हे जाणून घेण्याची उत्सुकता होती.

''अंधश्रद्धा निर्मूलन कार्याच्या अगोदर इतर कोणत्या सामाजिक कार्यात दाभोलकर लक्ष घालीत?'' असा प्रश्न तर्कशीलनं विचारला; तर ''सामाजिक कामाबाबत कुटुंबातील पत्नी, मुले, भावंडे व आई-वडील यांचा त्यांना कधी विरोध झाला होता का?'' अशी शंका शबानानं व्यक्त केली.

दाभोलकरांच्या जीवनकार्याबद्दल आणि एकूणच त्यांच्या चरित्राबद्दल मुलांना प्रचंड कुतूहल आहे, हे लक्षात येताच मला आनंद झाला. दाभोलकरांचं कौटुंबिक वातावरण, तसंच शैक्षणिक जडण-घडण आणि 'अंनिस'पूर्वीचं त्यांचं सामाजिक कार्य याविषयी मी बोलायला सुरुवात केली...

''दाभोलकर हे मूळचे साताऱ्याचे. ज्या सातारा जिल्ह्यात नाना पाटील यांनी इंग्रजांच्या विरोधात संग्राम सुरू केला, त्याच जिल्ह्यात दाभोलकरांनी नव्या स्वातंत्र्याची लढाई सुरू केली. शिक्षणक्षेत्रात ज्यांनी दलित, वंचित आणि सामान्य यांच्या शिक्षणाची क्रांती केली, त्या कर्मवीर भाऊराव पाटील यांची कर्मभूमी साताराच. नरेंद्र दाभोलकरांनीसुद्धा एक प्रकारे समाजशिक्षणाचंच कार्य केलं. लोकांचा विवेक जागृत करून सामाजिक परिवर्तन घडून यावं, हीच त्यांच्या कार्याची प्रेरणा होती.

''नरेंद्रचे वडील अच्युत दाभोलकर हे व्यवसायाने वकील होते. सर्व भावंडांत व बहिणीत नरेंद्र हे शेवटचं

अपत्य. नरेंद्रचे एक भाऊ प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू देवदत्त, तर त्यांचे दुसरे भाऊ दत्तप्रसाद हे प्रख्यात वैज्ञानिक आणि साहित्यिक. अंटार्क्टिका संशोधनाची जी मोहीम भारतीय तुकडीने केली, त्यामध्ये त्यांचा सहभाग होता. नरेंद्रचे दुसरे एक भाऊ श्री.अ. दाभोलकर हे प्रख्यात शेतीतज्ज्ञ होते. त्यांनी 'प्रयोग परिवार' ही शेतीशी निगडित संस्था गतिमान करून शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेतीबद्दल गोडी निर्माण केली. सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात द्राक्षशेतीला जो बहर आला आहे, त्याची प्रेरणा नरेंद्रचे भाऊच होते.

''ही सर्व भावंडं आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवणारी होतीच; पण या सर्वांवर कडी केली, ती नरेंद्रनं. स्वत: देवदत्त दाभोलकर यांनी आम्हा भावंडांतील 'सर्वोत्तम कडे' अशी भावना नरेंद्रबद्दल व्यक्त केली. ''

''एकाच कुटुंबातील अशी सर्वच मुलं कर्तृत्ववान निपजणं, याचं खूप कौतुक वाटतं.'' श्रद्धा म्हणाली. ''नाही तर बऱ्याच वेळा एक भाऊ कर्तृत्ववान, तर दुसरा रड्या– अशीच परिस्थिती बघायला मिळते.''

''मग तुझा भाऊ रड्या आहे का? '' चौकसरावानं टोमणा मारला.

''मला भाऊच नाही; पण तुझा भाऊ नक्कीच रड्या असणार!'' श्रद्धेच्या या प्रतिटोल्यानं एकच हशा उडाला.

''बस्स, आता पुरे!'' मी पुढे बोलू लागलो. ''नरेंद्रचा जन्म १ नोव्हेंबर १९४५चा. नरेंद्रच्या बालपणीचे काही किस्से त्यांची बहीण अमरजा नेरूरकर यांनी सांगितले आहेत. नरेंद्रचे कौतुक करायला आलेले लोक त्याची पप्पी घेऊन त्याला हैराण करायचे. एके दिवशी नरेंद्रला यावर नामी युक्ती सापडली. चार–पाच वर्षांचा असताना त्यानं कर्मवीर भाऊराव पाटलांना पाहिलं आणि त्याला त्याच्या प्रश्नाचं उत्तर सापडलं. 'मी या आजोबांसारखीच मोठी दाढी वाढवीन. मग कोण कशी घेईल माझी पप्पी?' लहान मुलाला दाढी येत नाही, हे त्या वयात नरेंद्रला कुठं माहीत होतं!

नरेंद्रचे वडील हे मोठे दत्तभक्त होते. त्यांच्या सर्व भावंडांची नावं दत्तावरून ठेवली होती. शेवटी नाव शिल्लक नाही म्हणून दाभोलकरांचं नाव 'नरेंद्र' ठेवलं गेलं. 'नरेंद्र'मधला इंद्र हा वज्र नावाचे अस्त्र वापरायचा. नरेंद्रनेसुद्धा अंधश्रद्धेवर वज्राप्रमाणे कठोर प्रहार केले आणि आपले 'नरेंद्र' हे नाव सार्थ केले.''

''पण दाभोलकर हे नास्तिक होते, असं माझ्या वडिलांनी मला सांगितलं.''
तर्कशीलच्या या शंकेवर मी होकारार्थी मान हलवली.

''दाभोलकर कुटुंबीयांचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपलं विचारस्वातंत्र्य जपण्यासाठी अनुमती होती. नरेंद्र दहा वर्षांचा असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळं वडिलांचे संस्कार त्याच्यावर झालेच नाहीत. पुढे स्वतंत्र विचारसरणीच्या नरेंद्रनं देव–धर्माबद्दल आपली स्वतंत्र भूमिका स्वीकारली.

''नरेंद्रचं माध्यमिक शिक्षण साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झालं. इतर भावंडांप्रमाणेच नरेंद्रला काव्याची खूप आवड होती. माधव ज्युलियन यांची एक कविता त्यांना खूप आवडे –

''वाघिणीचे दूध प्याला वाघ बच्चे फाकडे
भ्रांत तुम्हा का पडे?
कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला
थांबला तो संपला!''

''पुढं आपल्या खास शैलीत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत भाषण देताना नरेंद्रच्या तोंडून विविध कवींची सुभाषितं अस्खलितपणे श्रोत्यांना ऐकायला मिळत. त्यांना केशवसुतांच्या कविताही खूप आवडायच्या.

''नव्या जगातील नव्या मनूचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे।
हिंदूही नाही, मुस्लिम नाही न मी एक पंथाचा
तोचि पतित की जे आखडती प्रदेश साकल्याचा।।

''अशा कवितांनी नरेंद्रच्या विवेकनिष्ठ विचारांची पायाभरणी झाली असावी. मंगेश पाडगावकर आणि कुसुमाग्रज यांच्या विवेकाला आवाहन करणाऱ्या कविताही नरेंद्रला मुखोद्गत होत्या.''

''शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त डॉक्टरांना साहित्यप्रेमाबरोबरच दुसरा एखादा छंद होता काय?''

सम्यक्च्या या प्रश्नावर मी म्हणालो, ''बरं झालं, तू हा प्रश्न विचारलास. नरेंद्रला खेळाची आवड होती. साताऱ्याला बबनराव उथळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'शिवाजी उदय मंडळ' ही क्रीडा संस्था सुरू होती. या संस्थेत नरेंद्र कबड्डी खेळायला जात असे. वयाच्या अठराव्या वर्षी डॉ. दाभोलकरांनी कबड्डीच्या मैदानावर पाऊल ठेवलं आणि मातीशी इमान राखत या खेळावर विलक्षण प्रभुत्व मिळवलं. 'शिवाजी उदय मंडळा'तर्फे



त्यांनी कबड्डीच्या अनेक स्पर्धा गाजवल्या. अनेक विद्यापीठस्तरीय स्पर्धा, तसंच राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत चतुरस्र खेळ करून मंडळाचा लौकिक भारतभर पोचवला.

''... 'हनुमान उडी' घेत प्रतिस्पर्ध्यांच्या घेऱ्यातून बाहेर पडण्याचं त्यांचं कौशल्य सर्वत्र गाजलं. दाभोलकरांच्या कबड्डीकौशल्याची दखल घेत महाराष्ट्र शासनानं त्यांना छत्रपती पुरस्कारानं सन्मानित केलं. ज्या क्षेत्रात पाऊल टाकायचे, तिथं सर्वोच्च यश प्राप्त करायचे– हे दाभोलकरांचं खास वैशिष्ट्य नंतर त्यांच्या सामाजिक कार्यातही दिसून आलं.''

''डॉक्टरांचं पुढचं शिक्षण कुठं झालं?'' – चौकसरावानं विचारलं.

''नरेंद्रचे थोरले भाऊ देवदत्त दाभोलकर हे सांगलीच्या कॉमर्स कॉलेजमध्ये प्राचार्य होते. नरेंद्र पुढील शिक्षणासाठी देवदत्तांकडे सांगलीला आले. तिथं मिरजेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी एम.बी.बी.एस.चं शिक्षण पूर्ण केलं. ते वर्ष होतं १९७०. त्यानंतर बारा वर्षे त्यांनी सातारा परिसरात वैद्यकीय व्यवसाय केला; पण या व्यवसायात ते फारसं रमले नाहीत. दलित, पीडित आणि अन्यायग्रस्त समाजाबद्दल त्यांच्या मनात प्रचंड कणव होती. परिणामी, वैद्यकीय सेवेच्या छोट्या विश्वात न रमता ते सामाजिक क्षेत्रात उतरले.''

''पण मग नोकरी नाही, तर चरितार्थ कसा चालविला?''

चौकसरावाच्या या प्रश्नाला मी उत्तर दिलं, ''शैलाताईंच्या सहकार्यानं. शैला या नरेंद्रच्या सुविद्य पत्नी. त्यांचा विवाहाचा किस्साही मोठा मजेशीर आहे. जितका मजेशीर, तितकाच आपणासमोर आदर्श ठेवणारा.

''बहुतेक जण आपला सगळा वेळ आपल्या कुटुंबासाठी खर्च करतात. मोठं घर, मुलांचं शिक्षण, चैनीच्या वस्तू हेच त्यांचं विश्व बनतं; पण डॉ. दाभोलकर असे केवळ आपल्या कुटुंबात रमले नाहीत. त्यांनी विवाह केला खरा, त्यांना मुक्ता आणि हमीद अशी दोन मुलेही झाली; पण पत्नी शैला, मुले मुक्ता आणि हमीद एवढ्या परिघातच डॉक्टर रमले नाहीत. शैलाताई यांनी डॉक्टरांच्या व त्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दल खूप चांगली आठवण सांगितली आहे.''

''सांगा आम्हालाऽ सांगा आम्हालाऽऽ'' सगळे जण एकसूरात म्हणाले.

''शैलाताई यांचं एम.बी.बी.एस. शिक्षण बेळगावला झालं. आईनं शैलाताईंच्या पाठीमागे लग्नाचा तगादा लावला. आईच्या मैत्रिणीनं दाभोलकरांचं स्थळ सुचवलं. शैलाताईंची मावस बहीण, आई आणि त्या साताऱ्याला दाभोलकरांच्या घरी पोचल्या. मुलीनं मुलाच्या घरी बघायच्या कार्यक्रमासाठी जाणं हे शैला आणि नरेंद्र दोघांनाही आवडत नव्हतं, तरीदेखील आईच्या हट्टामुळे शैलानं बघण्याच्या कार्यक्रमाला संमती दिली. नरेंद्रनं शैलाला विचारलं, 'तू सगळी प्रॅक्टिस करू शकशील का? मला समाजकार्य करायचं आहे. तुला सगळं येतं का? सिझेरियन करायला येतं का? कारण इथं फक्त बायकांचीच प्रॅक्टिस चालते.'

''यानंतर शैला आणि नरेंद्र सातारा रेल्वे स्टेशनवर जाऊन दोन तास बोलत बसले; पण तिथंही नरेंद्र एकटेच बोलत होते. 'मला पाहिजे तर मी लिखाण करेन, वाचेन– हे वाचेन, ते करेन. तुला हे करावं लागेल, तुला ते करावं लागेल आणि तुला या अटी मान्य असतील; तरच तू माझ्याशी लग्न कर, नाही तर करू नकोस.'

''बेळगावला परतल्यावर शैलाताई आईला म्हणाल्या, 'ब्रह्मदेवानं त्यांच्यासाठी बायको तयार केली असेल; पण ती मी नाही. पुढं अनेक श्रीमंत मुलं शैलांना पाहायला

यायची. शैलाताई म्हणतात, त्यांची त्यांना किळस आली आणि नरेंद्रबरोबर लग्न करायची त्यांनी तयारी दर्शविली. बेळगावला झालेल्या दुसऱ्या भेटीत डॉक्टरांनी आपल्या अटी शैलाताईंना सांगितल्या. 'मी प्रॅक्टिस करणार नाही. मी डॉक्टर झालो, कारण माझ्या मोठ्या भावानं सांगितलंय की, अडी-अडचणीला हातात एक डिग्री असावी. मला पूर्ण वेळ कार्यकर्ताच व्हायचं आहे. महत्त्वाचं म्हणजे, घर चालवण्यासाठी पैसे तुला मिळवावे लागणार आहेत.'

''यावर शैलाताई म्हणाल्या, 'पैसे मिळवायला मला काही अडचण वाटत नाही. कारण माझ्या कुठल्याच गरजा श्रीमंतीच्या नाहीत, त्या आवडतही नाहीत. भाजी-भाकरी खायची सवय आहे. साध्या घरात राहायची सवय आहे. त्यामुळं मला काही प्रॉब्लेम येणार नाही.'

''या संवादानंतर शैला आणि नरेंद्रचं लग्न ठरलं. दोघांनीही हा अलिखित करार आयुष्यभर जसाच्या तसा पाळला.''

एवढ्यात सिद्धांत उठला आणि त्यानं मला एक प्रश्न केला,

''सर, माझी आई दागिन्यांची खूप हौशी आहे. ती सारखे नवनवे सोन्याचे दागिने मिळण्यासाठी पप्पांकडे हट्ट धरते.''

''आमची आईसुद्धा अशीच आहे!'' स्वरदा म्हणाली. ''तिनं जुने मंगळसूत्र मोडून छानपैकी नवे मंगळसूत्र बनवलं आहे. एक नव्हे, तर एक छोटं आणि एक मोठं. शैलाकाकूंना असली हौस नव्हती का?''

''पुढचं ऐका आणि आचरणात आणा.

''साताऱ्यातील शैलाताईंच्या दवाखान्यासमोर सोन्याचं एक दुकान आहे. मनात आणलं असतं, तर शैलाताईंना त्या दुकानातून भरपूर सोनं खरेदी करता आलं असतं; पण त्यांनी विवाहानंतर सबंध आयुष्यात एक गुंजभरही सोनं विकत घेतलं नाही. नवनव्या भरजरी साड्यांची हौस त्यांनी कधी केली नाही. नरेंद्रनंदेखील खादीचा स्वच्छ शर्ट आणि खादीची पँट अन् पायात साधी चप्पल असा पेहराव आयुष्यभर वापरला.''

''ग्रेटच! जगावेगळी बायको आणि जगावेगळा नवरा!'' तर्कशील उद्गारला. ''माझे वडीलसुद्धा साधेच कपडे वापरतात; पण आमचे कपाट आईच्या साड्यांनी गच्च भरलं आहे. परवा तर यावर आईचं आणि बाबांचं कडाक्याचं भांडण झालं. साड्यांनी भरलेल्या कपाटात जागा नाही, हे पाहून आईनं बाबांच्या पुस्तकाच्या कपाटात आहेराच्या साड्या घुसवल्या, त्यावरून हा वाद झाला.''

सगळे जण हसू लागले.

''शैलाताईंना स्वत:लाही समाजकार्याची आवड होती; पण अर्थार्जन, मुलांचे संगोपन आणि इतर कौटुंबिक कर्तव्यं यांची जबाबदारी नरेंद्रने त्यांच्यावर सोपविली होती. ही सल शैलाताईंच्या मनात कायम राहिली. पण आपल्या पतीच्या समाजकार्याला घरची आघाडी सांभाळून त्यांनी दिलेलं योगदान अपूर्व असं आहे. लक्ष्मीबाई पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटलांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात जशी साथ दिली आणि प्रख्यात समाजसेवक बाबा आमटे यांच्या पत्नी साधना यांनी आदिवासी भागात नवऱ्याबरोबर आनंदानं वनवास पत्करला, त्याच तोडीचा शैलाताईंचा हा त्याग प्रेरणादायी आहे. महिन्यातील पंधरा-वीस दिवस डॉक्टर पायाला भिंगरी लावून महाराष्ट्रभर दौरे करीत. साहजिकच मुलांची जबाबदारी शैलाताईंनाच पार पाडावी लागे. हमीद आणि मुक्ता ही नरेंद्र आणि शैलाताईंची दोन्ही मुलं कर्तृत्ववान निघाली. आज ती वडिलांच्या पश्चात अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सक्रिय सहभागी असतात.''

''सर, तुम्ही मघाशी सांगितले की, डॉक्टरांनी एम.बी.बी.एस. झाल्यानंतर बारा वर्षं वैद्यकीय सेवेत काम केलं. नंतर त्यांनी नोकरीतून बाहेर पडून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत झोकून दिले काय?'' सम्यक्‌ने विचारलं.

''नाही! अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत उडी घेण्यापूर्वी डॉक्टरांनी विविध सामाजिक चळवळींत स्वत:ला झोकून दिलं. हे कार्य ते वैद्यकीय व्यवसायाच्या जोडीनेच करत राहिले. वैद्यकीय सेवेतून १९८२ मध्ये बाजूला होऊन त्यांनी 'अंनिस' चळवळीत काम करण्यास सुरुवात केली.''

तर्कशीलनं यावर महात्मा फुलेंची एक आठवण सांगितली-

''आपल्या ब्राह्मण मित्राच्या विवाहाच्या वरातीत महात्मा फुले सहभागी झाले होते. त्या प्रसंगी एका कर्मठ ब्राह्मणानं, 'तू मागून चाल', अशी शेरेबाजी केली. हा प्रसंग त्यांच्या जिव्हारी लागला. महात्मा फुले हे माळी. माळ्यांना ब्राह्मण हीन समजतात. अशा गैरसमजुती नष्ट केल्या पाहिजेत, या विचारानं प्रेरित होऊन महात्मा फुलेंनी जातिभेदाविरोधात आवाज उठविला. असा काही प्रसंग नरेंद्रच्या जीवनात घडला काय- की, ज्यामुळं ते कुटुंबीयांपेक्षा मोठ्या समाजात अन्यायाच्या विरोधात संघर्ष

करू लागले?''

''असं काही घडले नाही. पण नरेंद्रचे थोरले भाऊ देवदत्त हे समाजवादी विचारांचे होते. जयप्रकाश नारायण आणि राममनोहर लोहिया; तसेच नानासाहेब गोरे आणि एस. एम. जोशी यांच्या समाजवादी विचारांवर व चळवळीवर त्यांची निष्ठा होती. भावाच्या सान्निध्यात आणि कदाचित मुळातच अंतरंगातील कणव प्रभावी असल्यानं जिथे अन्याय, तिथे उडी घेण्याचा त्यांचा स्वभाव बनला असावा. या स्वभावानुसार त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक चळवळींमध्ये योगदान देण्यास सुरुवात केली. कुमार सप्तर्षी हे 'युवक क्रांती दल' नावाच्या संघटनेचं तरुण नेतृत्व. त्यांचं नाव पुण्यात गाजत होतं. सांगलीमध्ये त्यांची व्याख्यानं दाभोलकरांनी आयोजित केली. रोखठोक विचार व आकर्षक मांडणी, यामुळं दाभोलकरांवर त्यांचा प्रभाव पडला आणि त्यांनी पुढे साताऱ्यात युवक क्रांती दलाचं काम सुरू केलं.

''जयप्रकाश नारायण १९६९ मध्ये सांगलीला येणार होते. त्यांची राहण्याची सोय देवदत्त दाभोलकरांच्या सांगलीतील बंगल्याजवळच गेस्ट हाऊसमध्ये केली होती. पुढच्या तीन दिवसांच्या वास्तव्यात नरेंद्र देखभालीसाठी जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर होते. शेवटी सांगलीतून निघताना जयप्रकाशजींनी नरेंद्रचा हातात हात घेऊन स्वयंसेवकाच्या सेवेबद्दल त्यांना धन्यवाद दिले आणि ते म्हणाले, 'कुछ बनो.'

''जे. पीं.च्या या वाक्यानं नरेंद्र प्रेरित होऊन एका समर्थ चळवळीचा नायक बनला.''

''दाभोलकरांनी 'एक गाव-एक पाणवठा' या चळवळीत काम केलं आहे, असं माझे बाबा काल मला सांगत होते. या कार्याची प्रेरणा त्यांना कशी मिळाली असावी?''

''दलितांबद्दल असलेली कणव आणि त्यांचे प्रश्न सोडवण्याची प्रामाणिक इच्छा संवेदनशील दाभोलकरांमध्ये होतीच. एक प्रसंग असा घडला की, ते या चळवळीत कार्यरत झाले. त्या वेळी डॉक्टर साताऱ्याजवळचे परळी येथे वैद्यकीय अधिकारी होते. परळीच्या केंद्राला सहा उपकेंद्रे होती. त्यातील मानेवाडी हे एक उपकेंद्र. या उपकेंद्रात काम करणारी आया दलित होती. तिचं नाव कांबळे. तिला गावातल्या विहिरीवर पाणी भरायला मिळत नाही, असे डॉक्टरांना समजलं. त्याच वेळी डॉ. बाबा आढावांची 'एक गाव-एक पाणवठा' चळवळ महाराष्ट्रात गाजत होती. नरेंद्रनं मानेवाडीत 'एक गाव-एक पाणवठा' मोहीम राबवायची ठरवलं. दलित वस्तीत बैठका घेतल्या. गावात दबाव बराच होता. मंडळी तयारच होईनात. शेवटी काही बैठकांनंतर त्यांना विश्वास आला. मिरवणुकीनं जाऊन पाणी भरलं. दुसऱ्या दिवसापासून गावात दलितांवर कडकडीत बहिष्कार! काम मिळेना, गावात धान्य मिळेना. मंडळी सैरभैर होऊन साताऱ्याला आली. त्यांना घेऊन दाभोलकर कलेक्टरकडे गेले, पण कलेक्टरांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही. मग डॉक्टर साताऱ्याच्या आमदारांना भेटले. आमदार म्हणाले, 'महात्मा फुलेंनी या प्रकरणात गुडघे टेकले, महात्मा गांधींनी हात टेकले आणि तुम्ही पोरं निघालात शहाणपणा करायला!'' या उद्गारानं डॉक्टरांच्या लक्षात आले की, मानेवाडीतील मराठा मतदारांना या आमदाराला दुखवायचं नव्हतं. नाव फुले-आंबेडकर यांचं घ्यायचं; पण कृती काहीच नाही! राज्यकर्त्यांचा हा दुटप्पीपणा याच वेळी डॉक्टरांच्या लक्षात आला. अवघा समाज अंधश्रद्धापीडित, तर राज्यकर्ते उदासीन. यातून सामाजिक न्यायाची चळवळ कशी अवघड आहे, याचा हा अनुभव दाहक होता; पण दाभोलकरांनी हार मानली नाही. चारच दिवसांनी समाजकल्याणमंत्री दादासाहेब रूपवते साताऱ्याच्या दौऱ्यावर आले. त्यांनी डी. एस. पी.ला कणखर भूमिका घेण्यास भाग पाडलं. सरकारी नोकरी असल्यानं डॉक्टरांवर कारवाईचा धोका होता; पण तो टळला. असेच जीवावरचे अनेक धोके पुढील आयुष्यात डॉक्टरांनी पत्करले, जीवाची पर्वा न करता.''

''ग्रेटच!'' अमिर उद्गारला

''आणीबाणीच्या काळात डॉक्टरांनी पत्रकं वाटणं, भिंती रंगवणं, भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय देणं, पैसे जमवणं- अशी कामे पार पाडली. खरं तर या काळात सामाजिक काम कसं करावं, याबद्दलची डॉक्टरांची जाणीव अनुभवाविना अपुरी होती; पण ऊर्मी अफाट. त्यामुळे कामात ते स्वत:ला झोकून देत. काही वेळेला यश येत असे, तर काही वेळा काम अर्धवट सोडावं लागे; पण यातूनच धडे घेत एखादी चळवळ करताना काय तयारी करावी, याचं भान डॉक्टरांना आलं- जे पुढं त्यांना अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत उपयोगी पडलं.

''साताऱ्याजवळ गवडी नावाचं गाव. या गावातील दलितांची जमीन एका माणसाच्या ताब्यात गहाण होती. ती

बारा एकर जमीन दलितांना परत मिळवून देण्यासाठी दाभोलकरांनी प्रयत्न सुरू केले. एस. एम. जोशी त्या वेळी साताऱ्याला आले होते. त्यांना या दलितांच्या गावी घेऊन जाण्याचा डॉक्टरांनी प्रयत्न केला. ज्या सहकारी बँकेने दलितांना जमीन कसण्यासाठी मदत केली होती, ती बँक काँग्रेसच्या ताब्यात होती. एस. एम. जोशी हे समाजवादी, म्हणून बँकेने आर्थिक नाडी आवळण्याची दलितांना धमकी दिली. परिणामी, एस. एम. जोशी यांचा कार्यक्रम डॉक्टरांना रद्द करावा लागला. चळवळ करताना राजकीय विचारसरणीतील भिन्नता विचारात घेतली पाहिजे, हा धडा दाभोलकरांना या अनुभवातून मिळाला.

''सामाजिक अन्यायाच्या बाबतीतल्या अशा विविध चळवळी दाभोलकरांनी सातारा परिसरात सुरू केल्या होत्या. शेतमजुरांची संघटना बांधण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण अपुऱ्या माहितीमुळं तो त्यांना यशस्वी करता आला नाही. साताऱ्यात हमाल संघटन बांधण्याचा प्रयत्नही असाच फसला; पण एक चांगला यशस्वी प्रयत्न दलितांना पाणवठा खुला करण्याबाबतीत घडला. साताऱ्याजवळच्या त्रिपुटी येथे एक तळं आहे. या तळ्यात गुरांना पाणी प्यायला मोकळीक; पण दलितांना नाही, अशी स्थिती होती. दाभोलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आजूबाजूच्या गावातून जनजागरण केलं आणि या तळ्यातील पाणी वापरण्यासाठी सत्याग्रह केला. या सत्याग्रहात त्यांना यश आलं.

''दाभोलकरांनी स्त्रियांवरील अत्याचारांबाबत एक यशस्वी मोहीम राबवली. सातारा जिल्ह्यात फलटण येथे महानुभाव पंथाचं मोठं केंद्र आहे.''

''महानुभाव म्हणजे काय?'' स्वरदेनं शंका विचारली.

''हा एक धार्मिक पंथ आहे. या पंथात अल्पवयीन मुलींचे देवाबरोबर लग्न लावतात. त्यानंतर मुलीचं कुंकू पुसून तिच्या अंगावर काळी वस्त्रे चढवली जातात. केसांचा चमनगोटा केला जातो आणि स्त्रीसुलभ भावनांचा होम करीत आयुष्यभर संन्यासी वृत्तीनं कुढत राहावं लागतं. दाभोलकरांनी यासंदर्भात देवदासी प्रतिबंधक कायदा १९३२ शोधला आणि या प्रथेविरोधात कोर्टात गुन्हा दाखल केला. महानुभाव पंथाच्या लोकांनी दाभोलकरांच्या निषेधाचे मोर्चे काढले, दहशतही घातली; पण दाभोलकर घाबरले नाहीत. या घटनेतून कायद्याचा आधार घेऊन सामाजिक चळवळ यशस्वी करता येते, हा अनुभव डॉक्टरांना मिळाला.''

''दाभोलकरांच्या धैर्याची कमाल आहे!'' शबाना उद्‌गारली.

''खरं तर लहान मूल मोठं होत असताना धडपडतं, रांगतं, पडतं... उत्साहाच्या भरात पुढे तारुण्यात, भावना आवेगात धाडस करतं; तसंच नरेंद्रचे अनुभव त्याला सजग करत गेले. या अनुभवांच्या सामर्थ्यावर नरेंद्र एका यशस्वी चळवळीचा नायक बनला.

''कायद्याचा आधार नसलेली झुंज तर अधिकच अवघड असते. अशी झुंज ज्या व्यक्तिविरोधात करायची, ती व्यक्ती पूजनीय असेल, तर अधिकच अवघड बनते. कांची कामकोटीचे शंकरचार्य म्हणजे 'वॉकिंग गॉड.' ते साताऱ्याला आले होते. शंकराचार्य हे वर्णव्यवस्थेचे समर्थन करीत. भारतीय घटनेने वर्णव्यवस्थेस नकार दिलेला आहे, म्हणून नरेंद्रनं साताऱ्यात शंकराचार्यांना विरोध करायचं ठरवलं. यासाठी त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मदतीने शंकराचार्यांची मुलाखत मागितली. पण शंकराचार्यांनी आपल्या विरोधात ही मुलाखत जाईल, हे ओळखलं आणि मुलाखतीचा टेप बंद करायला सांगितला; पण त्यांनी पिशवीमध्ये टेप गुपचूपपणे तसाच सुरू ठेवला आणि शंकराचार्यांचं वर्णव्यवस्थेचं समर्थन टेपद्वारे पुरावा म्हणून हाती आल्यावर साताऱ्यात त्या संबंधात बोर्ड लागले गेले. जाहीर सभा पुकारली. काहींनी अंडी फेकून मारण्याचा प्रयत्न केला, पण सामान्य लोकांनी त्यांना साथ दिली नाही. हा अनुभव आश्वासक होता. चळवळीचा विचार प्रामाणिक असला, तर बहुसंख्य लोक त्याला साथ देतात आणि परिवर्तन घडू शकते, असा हा अनुभव होता.''

''अशा अनुभवातून शिकत-शिकत दाभोलकर अखेरीस अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीकडे वळले असावेत.'' तर्कशीलचा निष्कर्ष बरोबर होता.

''दाभोलकरांनी या चळवळीला साताऱ्यातून १९८२ पासून सुरुवात केली. पुढं काय घडलं, त्याचा इतिहास आपण प्रत्येक रविवारी समजून घेऊ या.''

**प्रा. प. रा. आर्डे,** सांगली
Mob. 9822679546

('तरुणाईसाठी डॉ.नरेंद्र दाभोलकर' हे पुस्तक या आठवड्यात साधना प्रकाशनाकडून येत आहे, त्यातील एक प्रकरण प्रसिद्ध करीत आहोत. संपादक)

# प्रतिसाद

## हरित क्रांतीची कास धरली ती बरोबर होती, पण...

दि. २६ डिसेंबरच्या साधना अंकात रमेश जाधव यांनी सध्याच्या शेतकऱ्यांच्या दीर्घ आंदोलनाविषयी नेमके निदान नोंदविले आहे. रमेश जाधव शेतीप्रश्नांची मांडणी नेहमी व्यवस्थित करतात. 'पंजाब का धुमसतोय?' या प्रश्नांकित शीर्षकानेच त्यांनी सध्याच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाची बाजू अधोरेखित केली आहे. या आंदोलनात पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेशाच्या काही भागातील शेतकऱ्यांचा जास्त सहभाग व पुढाकार आहे. सरकारी तांदूळ, गहू खरेदीतून अनुदानाचा जास्तीत जास्त लाभ या क्षेत्रांतील शेतकऱ्यांना होतो, हे उघड आहे. म्हणून हमीभाव व सरकारी खरेदी हे दोन्ही झाले नाही तर त्यांची शेती तोट्यात जाईल, असे तेथील शेतकऱ्यांना वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळे त्यांनी तीव्र व दीर्घ आंदोलन करणे साहजिक आहे. याची दुसरी बाजू म्हणजे– त्यांची शेती तोट्यात जाणार नाही, याची कोणतीही शाश्वती न देता व पर्यायी व्यवस्था नीट न करता, न दाखवता, सरकार भरीव अनुदानाचे मोठे ओझे झटकण्याचा प्रयत्न करीत आहे, हे काही ठीक नाही. श्री.जाधव म्हणतात, तशा बऱ्याच सुधारणा राज्यातील बऱ्याच क्षेत्रांत उपयुक्त व आवश्यक आहेत, असे दिसते. पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेशाच्या काही भागात अल्पभू व अत्यल्पभू शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर नाहीत. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना नव्या सुधारणा, बदल यांचे विशेष महत्त्व वाटत नाही. गंमत म्हणजे, अकाली दलाव्यतिरिक्त जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांनी कृषी कायद्यांत बदल व सुधारणांची गरज असल्याची भाषा व मागणी केली होती. पण आंदोलन सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांनी त्याला पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्रात सध्याच्या सत्ताधारी पक्षांनी प्रथम पाठिंबा व नंतर विरोध केला. यात सर्वांना अल्पभू व अत्यल्पभू शेतकऱ्यांचे काही विशेष पडले आहे, असे दिसत नाही. त्याचबरोबर हेही खरे आहे की, या नव्या कायद्यांत शेतीच्या मालकीहक्काविषयी काळजी घेणाऱ्या सुधारणा, बदल केले पाहिजेत. आपली मालकी जाऊन आपण मजूर-गुलाम होणार, अशी भीती वाटता कामा नये. तसे तर आताही शेती परवडत नाही, म्हणून बरेच शेतकरी गावाबाहेर पडत आहेत किंवा बाहेर फेकले जात आहेत. याला सरकारी कायद्याचा पाठिंबा असू नये, अन्यथा या स्थित्यंतरातून बेरोजगारी वाढेल व विनानियोजित शहरेही वाढतील. परवडणारी शेती करणे हाच यावर खरा उपाय आहे.

या लेखात मुख्य प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे, तो प्रश्न फार महत्त्वाचा आहे. पंजाब, हरियाणा राज्यातील क्षेत्रात तांदूळ, गहू जास्तीचे पिकवून तेथील शेतकऱ्यांपुढे पुढे नवे प्रश्न निर्माण होत आहेत. पाण्याचा व रासायनिक खतांचा अतिवापर सध्या पीकबहर देत असला तरी ते पुढे जाऊन त्रासदायक ठरणार आहे. हीच परिस्थिती महाराष्ट्रातील ऊसशेतीची आहे. उपलब्ध पाण्यातील ६० टक्के पाणी आपण ऊसशेतीसाठी वापरतो. त्यातूनही प्रश्न निर्माण होत आहेत. उसाचे व साखरेचे प्रचंड प्रमाणात उत्पादन होत आहे. शिवाय जमिनी खारवट होत आहेत. या प्रश्नाकडे श्री.देसरडा, श्री.साळुंखे हे शेतीतज्ज्ञ वारंवार लक्ष वेधतात, पण उपयोग नाही. कारण ऊसशेतीची झळाळी व ऊसउत्पादकांची लॉबी चांगली स्ट्राँग आहे. दीर्घ काळाचा विचार केला तर, ऊसशेती मर्यादित व कमी प्रमाणात, कमी पाण्यात केली पाहिजे. त्याऐवजी डाळी, कडधान्ये व तेलबिया यांचे क्षेत्र व उत्पादन वाढविले पाहिजे.

एकूणच, सत्तरच्या दशकात हरित क्रांतीने पाणी व रासायनिक खतांचा अतिवापर करून प्रचंड उत्पादनाची कास आपण धरली, ती त्या वेळी बरोबर व आवश्यक होती. पण आता तिच्या मर्यादा दिसून वाईट परिणाम होत आहेत. म्हणून आता

कमी पाण्यात सेंद्रिय खते वापरून व क्षेत्रवार पीकनियोजन करून शेती केली जाणे गरजेचे झाले आहे. नव्या कृषी कायद्यांनी या दिशेने वाटचाल सुरू झाली, तर फार बरे होईल.

**अरुण वि. कुकडे,** नाशिक

## त्या दोन सूचना दुर्लक्षित केल्या नसत्या तर...

पुण्याच्या लक्ष्मी रोडवरील काकाकुवा mansion समोरील ४९/३ बुधवार पेठ हा माझ्या आत्याबाईंचा पत्ता कायम स्मरणात राहील. एक सोडून बाकी सर्व सात लिमये भावंडाना आणि सतत गाणं गुणगुणत फेऱ्या मारणाऱ्या त्यांच्या पपांना या घरी अनेकदा भेटलो. प्रसिद्ध संसदपटू आणि समाजवादी नेते मधू लिमये म्हणजे आपले भाई यांची मात्र या घरी कधी भेट झाली नाही. ते देशासाठी जगले. अतुल देऊळगावकर यांनी रेखाटलेले (साधना, ९ जानेवारी) त्यांचे शब्दचित्र भावले.

राजकारणातून सत्ता आणि सत्तेतून 'कुटुंबाचा विकास' या भाईंनीच वर्णन केलेल्या पार्श्वभूमीवर ह्या एकाहून एक लोकोत्तर समाजवादी नेत्यांचे कार्य आणि जीवनातील साधेपणा खूपच उठून दिसतो.

आपल्या देशापुढील समस्यांची अभ्यासपूर्ण, निष्णात उकल सुचविणाऱ्यांना बेदखल करणे, ही आपली परंपरा पूर्वापार चालत आली आहे. मधू लिमये यांनी केलेल्या दोन आग्रही सूचना दुर्लक्षित केल्याची जबर किंमत राष्ट्राला भरावी लागली. आणीबाणी पश्चात, जनता दलाची उभारणी करताना भाईंनी दुहेरी निष्ठेचा उपस्थित केलेला मुद्दा गंभीरपणे न घेतल्याचे फळ आपण आज लव्ह जिहाद, गोवंशहत्याबंदी आणि इतर अनेक प्रकारे भोगत आहोत. ह्या प्रश्नाला बगल देताना जनसंघाने 'आमची विद्यार्थी संघटना आणि मजदूर संघटना अराजकीय आहेत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडित नाहीत' वगैरे नेहमीचे भ्रामक प्रतिवाद केले आणि त्या जनता पक्षात सामील होणार नाहीत, असा आग्रह धरला. अशा सर्व पक्षांची मोट बांधून जनता पक्षाचा प्रयोग अल्पजीवी ठरला.

दुसरी अत्यंत उचित सूचना इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या शिखांच्या हत्याकांडावेळी मधू लिमये यांनी केली होती. देशाची राजधानी हे अत्यंत संवेदनशील क्षेत्र आहे. आणि तेथे अविलंब लष्कर पाचारण करणे सहज शक्य आहे. त्यासाठीची कळकळीची सूचना लिमये यांनी सरकारदरबारी केली. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. घेतली असती तर भारताच्या लोकशाहीवरील हा धब्बा आणि काँग्रेस पक्षाची नाचक्की टळली असती. पुढे पक्षाने झाल्या प्रकारची माफी मागितली, परंतु त्या वेळी देशभर अस्तित्व असलेल्या अशा एकमेव पक्षाची झालेली हानी टळली नाही, त्यामुळे त्याची जब्बर किंमत देशाला भरावी लागली.

**प्रभा पुरोहित,** मुंबई

## गागर में सागर असे संपादकीय

दि. ९ जानेवारी २०२१ साधना अंक मिळाला. नेहमीप्रमाणे सर्वप्रथम संपादकीय वाचायला सुरुवात केली व इतर मजकूर/ लेख वाचण्यापूर्वी जरा थांबायचे ठरवले. आपले हे संपादकीय म्हणजे प्रिंट मीडियातील नियतकालिकांच्या संपादकांसाठीची नित्यपाठ आहे, असे माझे अल्पमतीचे आकलन आहे. संपादकीयात आपण मांडलेल्या विचारांशी पूर्ण सहमत आहे.

रामदास स्वामी यांच्या दासबोधमधील मूर्खांच्या लक्षणांपैकी एका लक्षणाचे, आत्मस्तुतीचे, अनुकरण/अनुसरण करून सांगू इच्छितो की, मी माझ्या वयाच्या चौदाव्या वर्षापासून 'ललित'चा नियमित वर्गणीदार-वाचक आहे. ललितच्या वाचनाच्या व्यसना(?)तूनच धर्मभास्कर, गीतादर्शन, प्रज्ञालोक, पुरुषार्थ, वाङ्मयशोभा, पंचधारा, मराठी संशोधन पत्रिका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, युगवाणी, सत्यकथा, ... आदी मराठी नियतकालिकांचा मी १९७०-७१ पासूनच वर्गणीदार वाचक झालो. त्यानंतर आलोचना, ज्ञानेश्वर, घरदार, अनुष्टुभ, अंतर्नाद, मनोरा, कविता-रती इत्यादींचासुद्धा मी वर्गणीदार वाचक झालो. माझ्या या भस्म्यारोगी वाचनभुकीने प्राप्त स्वानुभवाने मला नियतकालिकांच्या भवितव्याचा अचूक(?) वेध घेऊ शकणारा जणू ज्योतिषी(?)च करून टाकले. आजवर बंद पडलेल्या(?) काही नियतकालिकांना ते बंद पडण्यापूर्वी/तीनेक वर्षांपूर्वीच ते नियतकालिक बंद पडणार असे मी वारंवार (सप्रमाण कारणमीमांसेसह) कळविले होते. ती नियतकालिके बंद का पडली, याची सविस्तर कारणमीमांसा (पंचसूत्रीसहित) आपल्या या 'गागर में सागर' अशा संपादकीयात स्पष्टपणे सापडते. म्हणूनच मला संपादकीयात नमूद प्रिंट मीडियाच्या भवितव्याबद्दल मांडलेले विचार पूर्णपणे पटतात.

**लखनसिंग कटरे,** बोरकन्हार, जि.गोंदिया


महाराष्ट्र शासन
संस्मरण दर्पणकारांचे
आचार्य बाळशास्त्री जांभेकर
(१८१२-१८४६)
दर्पणकार
आचार्य बाळशास्त्री जांभेकर
यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!
६ जानेवारी
पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Date of Posting : 12-1-2021 / Date of Publication : 12-1-2021

# १२ जानेवारी (राष्ट्रीय युवकदिन) रोजी प्रकाशित होत आहे साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

## तरुणाईसाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर

### प. रा. आर्डे




डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हयातीत आणि नंतरच्या कालखंडातही अनेक युवक-युवती अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सहभागी झाले आहेत. या तरुणाईला डॉक्टरांच्या कर्तृत्वाचा अधिक तपशीलवार परिचय व्हावा आणि अंधश्रद्धा निर्मूलनच्या चळवळीला प्रेरणा मिळावी, हा या पुस्तक लेखनामागचा मुख्य हेतू आहे. १९८५ पासून २० ऑगस्ट २०१३ पर्यंत म्हणजे जवळजवळ २८ वर्षे मी डॉ. दाभोलकरांचा चळवळीतील साथी होतो, त्यामुळे त्यांचा स्वभाव, त्यांचे विचार आणि समाजाप्रती असलेली तळमळ हे सर्व मी जवळून अनुभवत होतो. माझे व इतर सहकाऱ्यांचे अनुभव एकत्र करून हे पुस्तक साकार झाले आहे.

**– प्रा. प. रा. आर्डे**

पृष्ठे २५६ । किंमत २५० रुपये
सवलतीत १५० रुपये (ट.ख. वेगळा)

ऑनलाईन प्रकाशन हस्ते

सूरज येंगडे
आणि सोनाली कुलकर्णी

१२ जानेवारी
सायंकाळी ५ वाजता

संपर्क

**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhana@gmail.com

also available at amazon.in

इ-बुक स्वरुपात किंडलवर उपलब्ध